


१९२७-२०२६ वर्ष ९०

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शनिवार | दि. १७ ऑक्टोबर २०२६ | अंक १३१ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in



**विकणे आहे**

अलिबाग ब्राह्मणआळी युनियन बँकेशेजारील नवीन इमारतीमधील ९५० स्क्वे. फूट क्षेत्रफळाचा व्यापारी गाळा विकणे आहे.

मोहनिश जोग
मो.9970666203







## वेधक

### विद्यार्थिनीसोबत छेडछाड

**पोलादपूर :** लोहारे येथील माध्यमिक शाळा सुटल्यानंतर घरी चालत जाणाऱ्या अल्पवयीन मुलीसोबत छेडछाड केल्याची घटना घडली. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तरूणाला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी (दि.१४) लोहारे माध्यमिक शाळेतून गावठाण विहीरीजवळून बौद्धवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावरून इयत्ता नववीतील १४ वर्षीय पिडीतेसह दोन शाळकरी मित्र आणि तिचा भाऊ घरी जात होते. त्यावेळी महाड तालुक्यातील •➤पान २ वर

### टेम्पोच्या धडकेत एकजण जखमी

**रसायनी :** खालापूर तालुक्यातील वांवढळ गावाजवळ जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर टेम्पो, रिक्षा आणि दुचाकी यांच्यात अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात दुचाकीस्वार स्वप्नील चौधरी (४०) हे जखमी झाले असून, तीनही वाहनांचे नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वांवढळ येथील जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर मुंबईकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या टेम्पो चालकाने बेदरकारपणे वाहन चालवून समोरून जात असलेल्या रिक्षाला पाठीमागून धडक दिली. त्यानंतर टेम्पो चालकाचे •➤पान २ वर

### कळंबोलीत पतीकडून पत्नीची हत्या

**पनवेल :** कळंबोली सेक्टर ४-ई येथील जनता मार्केट परिसरात गुरुवारी (दि.१५) सायंकाळी कौटुंबिक वादातून पत्नीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. पिंकी गोप ऊर्फ सोनिया मोहम्मद अबू खातून असे मृत महिलेचे नाव असून, या प्रकरणी तिचा पती मनीष गोप याला कळंबोली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. प्राथमिक तपासानुसार, पत्नीच्या गूगल पे आणि बँक खात्यात इतर व्यक्तींकडून पैसे जमा होत असल्याच्या कारणावरून •➤पान २ वर

### अवैध खैर वाहतुकीवर कारवाई

**म्हसळा :** तालुक्यातून होणाऱ्या अवैध वनउपज वाहतुकीविरोधात वनविभागाने कडक कारवाई केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे वनविभागाच्या पथकाने आंबेत पोलीस ठाण्याजवळ धडक कारवाई करत टाटा कंपनीचे इंट्रा ३० हे वाहन जप्त केले. या वाहनातून अवैधरीत्या खैर वनउपज वाहतूक केली जात असल्याचे उघडकीस आले असून, याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वनविभागाने केलेल्या कारवाईत खैर सोलिव नग २६२, ज्याचे एकूण घनफळ १.००३ घनमीटर असून अंदाजे किंमत १० हजार ५९८ रुपये आहे. तसेच, खैर सोलीव •➤पान २ वर


## शेतकरी होणार उद्ध्वस्त; पंतप्रधान भूमीपूजनाला येणार का?

# 'टोरंट'मुळे पेज संकटात?

**। कर्जत/नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील पेज नदीच्या उगम स्थानावर टोरंट कंपनी धरण बांधणार आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातून बारमाही वाहणारी पेज नदी कोरडी पडेल. त्याचा परिणाम पूर्णपणे अवलंबून असलेल्या उल्हास नदीच्या पाणी पुरवठा देखील बंद होणार आहे. दरम्यान, पेज नदीच्या पाण्याच्या उपलब्धतेवर तसेच कर्जत शहर, नेरळ परिसर आणि आसपासच्या गावांच्या पाणीपुरवठ्यावर काय परिणाम होणार, असा गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यामुळे कर्जत आणि ठाणे जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेल्या उल्हास नदीचा विनाश तसेच शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणाऱ्या प्रकल्पाच्या भूमिपूजन सोहळ्याला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार का? असा सवाल कर्जत पर्यावरण बचाव समितीचे ॲड. कैलास मोरे यांनी उपस्थित केला आहे.**

कर्जत तालुक्याची पाण्याची वाहिनी असलेली पेज नदी वाचविण्यासाठी कर्जत पर्यावरण बचाव समितीने पुढाकार घेतला आहे. याच नदीच्या उगम स्थानावर पंप स्टोरेज धरण बांधून त्या पाण्यावर वीज निर्मिती केली जाणार आहे. त्यामुळे बारमाही वाहणारी पेज नदी कोरडी राहणार असून, त्याचा थेट परिणाम ठाणे जिल्ह्याला पाणी पुरवठा करणाऱ्या उल्हास नदीवर देखील होऊ शकतो.टोरंट कंपनीच्या प्रस्तावित सायडोंगर-१ प्रकल्पाची क्षमता ३,००० मेगावॅट असून, प्रस्तावित वरच्या जलाशयाची •➤पान २ वर




### ..तरीही भूमीपूजनाचा घाट?

स्थानिकांचा विरोध, पर्यावरणाच्या ऱ्हासाची भीती, जमिनीच्या मोजणीवरून निर्माण झालेला संघर्ष असे चित्र असतानाही कर्जत तालुक्यातील टोरंट ऊर्जा प्रकल्प पुढे रेट हालचाली सुरू आहेत. या प्रकल्पाच्या भूमीपूजनाचा घाट घातला जात असून, त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी दि.३ नोव्हेंबरला कर्जतमध्ये येणार असल्याची चर्चा आहे. मात्र, कर्जत तालुक्याचे पाणी संपुष्टात आणणाऱ्या पेज नदीवरील प्रकल्पामुळे पुढे ठाणे जिल्ह्यातील नळपाणी योजना उल्हास नदी कोरडी राहिल्याने मोठा गंभीर निर्माण होऊ शकतो. अशा प्रकल्पाच्या भूमिपूजन सोहळ्याला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

> पेज नदीचे संरक्षण, कर्जत व नेरळच्या पाणीपुरवठ्याची सुरक्षितता आणि शेतकऱ्यांच्या पाण्याच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी अधिकृत माहिती सार्वजनिक करून लोकशाही मार्गाने चर्चा घडवून आणावी, असे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.
> – ॲड. कैलास मोरे, पर्यावरण बचाव संघर्ष समिती, कर्जत

### मागण्यांची स्पष्टता द्या

प्रकल्प सुरू करताना सुरुवातीला किती पाणी लागणार, पाण्याची भरपाई कोणत्या स्रोतांतून केली जाणार, बाष्पीभवन व झिरपणामुळे होणाऱ्या संभाव्य पाण्याच्या नुकसानीचा अंदाज किती आहे, उन्हाळ्यात किती पाणी उपलब्ध राहणार आणि कर्जत व नेरळच्या पाणीपुरवठ्याचा प्रकल्पाच्या जलनियोजनात विचार करण्यात आला आहे का, दोन्ही प्रकल्पांच्या एकत्रित जलवैज्ञानिक परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे का, जलसंतुलन अहवाल आणि पर्यावरणीय मंजुरीतील संबंधित अटी नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणार का, याबाबत स्पष्टता मागण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांना पाच हजारांची भीक नको

- **चित्रलेखा पाटील यांचा सरकारवर घणाघात**
- **दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हक्काची मदत देण्याची मागणी**

**। मुंबई । विशेष प्रतिनिधी ।**

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकारकडे पैसे नसल्याचे चित्र उभे केले जाते; मग मोठमोठ्या प्रकल्पांच्या भूमीपूजन आणि उद्घाटन सोहळ्यांवर एवढा खर्च कशासाठी? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणाऱ्या कार्यक्रमांसाठी थाटामाटाची तयारी करायची, मात्र संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीच्या नावाखाली अवघे ५ हजार रुपये द्यायचे, हा कोणता न्याय? सरकारचा हा दुटप्पीपणा संतापजनक असून, शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत नव्हे, तर त्यांच्या नुकसानीच्या प्रमाणात हक्काची आर्थिक मदत मिळाली पाहिजे, अशी घणाघाती टीका शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केली.

दुष्काळाचे संकट गडद होत असताना शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. पिकांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि महागाई यामुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला आहे. दिवाळी तोंडावर असताना कुटुंबाचा खर्च भागवायचा कसा, मुलांचे शिक्षण आणि शेतीचा पुढील हंगाम उभा करायचा कसा, असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहेत. अशा परिस्थितीत ५ हजार रुपयांची मदत जाहीर करून •➤पान २ वर

### शेतकऱ्यांच्या मदतीला अटी कशाला?



सरकारकडे निधीची कमतरता असल्याचे सांगायचे आणि दुसरीकडे मोठमोठ्या प्रकल्पांच्या भूमीपूजन व उद्घाटन सोहळ्यांसाठी भव्य आयोजन करायचे. विकासाच्या नावाखाली होणाऱ्या खर्चाइतकीच संवेदनशीलता सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबतही दाखवली पाहिजे. शेतकऱ्यांना मदत देणे ही सरकारची कृपा नसून, त्यांच्या नुकसानीची भरपाई आणि त्यांना पुन्हा उभे करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली जबाबदारी आहे. त्यामुळे मदतीच्या रकमेचा फेरविचार करून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी चित्रलेखा पाटील यांनी केली.

## तलाठ्याचा कारभार संशयास्पद!

- **निलंबनासह फौजदारी कारवाईची मागणी**
- **अनिल ढवळे यांची तहसीलदारांकडे तक्रार**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलतालुक्यातीलदेहरंगयेथील मिळकतीच्या वारसनोंदीवरून महसूल यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. वारसनोंदीच्या अर्जाची पडताळणी न करणे, इच्छापत्र व खरेदीखतातील तपशीलांकडे दुर्लक्ष करणे, कागदपत्रांतील विसंगती आणि तहसीलदारांची दिशाभूल केल्याचे आरोप शेतकरी कामगार पक्षाच्या शेतकरी महासभेचे रायगड जिल्हाध्यक्ष अनिल ढवळे यांनी केले आहेत. संबंधित तलाठ्याचे निलंबन करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, तसेच श्रीमती रेखा सदर यांची सातबारा उताऱ्यावर वारसनोंद करावी, अशी मागणी त्यांनी पनवेलच्या अपर तहसीलदारांकडे केली आहे.

तक्रारीनुसार, मुग्धा सातारकर यांनी २२ सप्टेंबर २०२५ रोजी वारसनोंदीसाठी अर्ज केला होता. या अर्जासोबत वारसांची नावे, आधारकार्डे आणि आवश्यक कागदपत्रे जोडली होती का, याची तपासणी करण्यात आली नसल्याचा आरोप आहे. अर्ज अपूर्ण असल्यास कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मुग्धा सातारकर यांच्याशी पत्रव्यवहारही करण्यात आला नसल्याचे ढवळे यांनी म्हटले आहे. वारस पुणे येथे राहात असतानाही पुणे येथील जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्या माध्यमातून वारसांची पडताळणी करण्यात आली नसल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच, अर्जासोबत सातबारा उतारा व फेरफार नोंद जोडण्यात आली होती का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.


तक्रारीतील माहितीनुसार, ईरीन मेरी अल्बर्ट फ्रॉन्सीका यांनी २३ एप्रिल २००८ रोजी पुणे येथील दुय्यम निबंधक कार्यालयात इच्छापत्राची नोंदणी केली होती. या इच्छापत्रात विश्राम को-ऑपरेटिव्ह सोसायटी, १००८/१ नाना पेठ, पद्मजी मार्ग, पुणे; वर्षा अपार्टमेंट कंडोमि नियम, ६८९ नानापेठ, पुणे; तसेच सेंट प्रॅक्टिस टाउन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, सर्व्हे क्रमांक २९, वानवडी, पुणे येथील मालमत्तांचा उल्लेख असल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. इच्छापत्रात आठ अपत्यांचा उल्लेख असून, ख्रिस्तोफर, त्यांची सून प्रॅक्टिस, टेरेन्स •➤पान २ वर

## जि.प. शाळेत स्वयंपाकी महिलांचे हाल

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

एकीकडे राज्य शासन शाळांमधील शालेय पोषण आहार योजनेत दररोज नवनवीन पदार्थ समाविष्ट करून विविध प्रयोग करत असल्याचे भासवत आहे, तर दुसरीकडे प्रत्यक्ष परिस्थिती अत्यंत भीषण असल्याचे समोर आले आहे.

जिल्हा परिषद शाळांमध्ये हजारो विद्यार्थ्यांसाठी कष्टपूर्वक भोजन शिजवणाऱ्या स्वयंपाकी महिलांना शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून म्हणजे जून महिन्यापासून तब्बल पाच महिन्यांचे मानधन मिळालेले नाही. जेमतेम अडीच हजार रुपये महिन्याच्या अत्यल्प मानधनावर काम करणाऱ्या या महिलांची गैरसोय होत आहे. परिणामी शिक्षकांसह स्वयंपाकी महिलांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या गंभीर समस्येबाबत



• (छायाचित्र: धम्मशील सावंत)

> जिल्हा परिषदेकडून संबंधित महिला स्वयंपाकी यांना मानधन दिले जात नाही, ते राज्य शासनाकडून दिले जाते याबाबत तेथून माहिती घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल.
> – नेहा भोसले, मुख्याधिकारी, राजिप

> शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त शाळाबाह्य कामे करावी लागतात. त्यातच आता स्वयंपाकी महिलांचे मानधन आलेले नाही. दोन महिन्यांपासून धान्य व डाळी देखील उपलब्ध नाहीत. तसेच, इंधन व भाजीपाला मानधन देखील वेळेवर मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना पोषण आहार कसा उपलब्ध करून द्यायचा याबाबत चिंता असल्याने संघटनेच्या माध्यमातून निवेदन दिले आहे. भाजीपाला व इंधन स्वखर्चाने आणतो.
> – मोरेश्वर कांबळे, जिप शिक्षक, सुधागड

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (शाखा सुधागड) व सुधागड तालुका प्राथमिक शिक्षक •➤पान २ वर

**बुरसटलेल्या प्रथा परंपरांना आव्हान** | **महिला अन् बालकांच्या आरोग्यासाठी कार्य**

## रूढींच्या बेड्या तोडून वैद्यकीय क्षेत्रात झेप घेणारी दुर्गा : रखमाबाई राऊत

**मिलिंद मधुकर जाधव**
**श्रीवर्धन**

बावीस नोव्हेंबर १८६४ साली मुंबईत तिचा जन्म झाला. वयाच्या दुसऱ्याच वर्षी वडील जनार्दन पांडुरंग यांचं निधन झालं. आई जयंतिबाई यांनी समाजसुधारक आणि डॉक्टर असलेल्या सखाराम अर्जुन यांच्याशी पुनर्विवाह केला. जे त्या काळात पाप समजलं जात होतं. वयाच्या अकराव्या वर्षी त्या मुलीचं लग्न दादाजी भिकाजी या एकोणीस वर्षांच्या तरुणाशी लावून दिलं. पण लग्न झाल्यावरसुद्धा तिने नाव बदललं नाही, शाळा सोडली नाही. सासरी जायची वेळ आली तेव्हा ती कडाडली.''माझं लग्न झालं म्हणून काय झालं? माझ्या इच्छेविरुद्ध मला नवऱ्याकडे पाठवण्याचा कुणालाही अधिकार नाही!'' तिच्या या निर्णयावर टीकेची झोड उठली. त्या बाणेदार मुलीचं नाव होतं रखमाबाई राऊत.

इथूनच एका वेगळ्या इतिहास पर्वाला सुरुवात झाली. साल होतं १८८४. जेव्हा लग्न झालेल्या मुलीने नवऱ्याकडे जायला नकार देणं म्हणजे त्याकाळी समाज विघातक कृत्य मानलं जायचं. बायकोने नांदायला यावं म्हणून नवऱ्याने न्यायालयात धाव घेतली. इच्छा नसेल तर जबरदस्ती करता येणार नसल्याचा निर्णय न्यायमूर्तींनी दिला. या निर्णयाने धर्ममार्तंडांच्या उरात धडकी भरली. पण पुढच्याच खटल्यात न्यायालयाने आधीच्या न्यायमूर्तींचा निकाल बदलून ''नवऱ्याकडे जा, नाहीतर सहा महिने तुरुंगवास भोग'' असा सनसनाटी निर्णय दिला.

या निर्णयावर ''मी तुरुंगात जाईन पण माझ्या इच्छेविरुद्ध लावलेलं लग्न मान्य करणार नाही!'' अशी गर्जना करून रखमाबाईंनी बुरसटलेल्या प्रथा परंपरांना आव्हान दिलं. यामुळे समाजात फूट पडून दोन गट निर्माण झाले. या संघर्षाच्या वादळात पुरोगामी वर्ग त्यांच्यामागे ठामपणे उभा राहिला.

दरम्यान, ''हिंदू लेडी'' या टोपण नावाने त्यांनी वर्तमानपत्रातून आपली बाजू समाजासमोर मांडली. इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीसमोर हे प्रकरण गेलं. या प्रकरणाची अन्य देशात सुद्धा चर्चा होऊ लागली. घटस्फोटाच्या प्रकरणात नवरा बायकोला पोटगी देतो, पण या प्रकरणात रखमाबाईंना आपल्या नवऱ्याला त्याकाळी दोन हजार रुपये देऊन सुटका विकत घ्यावी लागली. बायकोने नवऱ्याला पैसे देऊन, स्वतःची सुटका करून घेतलेला तो पहिला खटला होता. या खटल्याने हादरलेल्या इंग्रज सरकारला, शारीरिक संबंधांच्या संमतीचं किमान वय •➤पान २ वर




## रायगड जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करा!



**। महाड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात केवळ श्रीवर्धन तालुका दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आल्याने महाडसह संपूर्ण रायगड जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे महाड तालुकाध्यक्ष संदीप सकपाळ यांनी दि.२१ ऑक्टोबर रोजी महाड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठिय्या आंदोलन आयोजित केले आहे.

- **महाडमध्ये २१ ऑक्टोबरला संदीप सकपाळ यांचे ठिय्या आंदोलन**

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना •➤पान २ वर

# मोरबे धरणातील गाळाचे शास्त्रीय सर्वेक्षण करा!

## नॅटकनेक्ट फाउंडेशनची महापालिकेकडे मागणी; २५ वर्षांत गाळ काढला नसल्याची माहिती

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबईच्या जलसुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना मोरबे धरणातील साचलेल्या गाळाचे शास्त्रीय सर्वेक्षण करून तो काढण्याच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्याची मागणी नॅटकनेक्ट फाऊंडेशनने महापालिका प्रशासनाकडे केली आहे. धरणाची सध्याची साठवण क्षमता, गाळाचे प्रमाण आणि गाळ काढल्यानंतर उपलब्ध होऊ शकणारा अतिरिक्त पाणीसाठा याबाबत वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी हे सर्वेक्षण आवश्यक असल्याचे फाऊंडेशनने म्हटले आहे. नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी.एन. कुमार यांनी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना निवेदन दिले आहे.



### संकट येण्यापूर्वी नियोजनाची गरज

नवी मुंबई नागरिक मंचाचे संयोजक श्रीकांत पाटकी यांनी म्हंटले की, प्रशासक आणि राजकीय नेते संकट निर्माण झाल्यानंतरच जागे होताना दिसतात. जलसुरक्षेसाठी संकटाच्या वेळी धावपळ करण्याऐवजी आधीपासून उपाययोजना करणे आवश्यक आहे. 'हर घर जल संचय अभियान'चे संस्थापक सुभाजित मुखर्जी यांनीही दीर्घकालीन पर्यावरणीय संवर्धनावर भर दिला.

### जलसुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

मोरबे धरणातील पाणीसाठा, पाणीपुरवठ्यातील व्यत्यय आणि विकासकांकडून कथित अनधिकृत पाणीउपसा या मुद्द्यांवर आमदार मंदा म्हात्रे यांनी चिंता व्यक्त केल्यानंतर शहराच्या जलसुरक्षेचा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. नॅटकनेक्ट फाऊंडेशनने दिलेल्या माहितीनुसार, मे २०२५ मध्ये मोरबे धरणाची निर्धारित साठवण क्षमता १९०.८९० दशलक्ष घनमीटर असताना प्रत्यक्ष पाणीसाठा ८२.५५७ दशलक्ष घनमीटर होता. हा साठा एकूण क्षमतेच्या ४३.२४ टक्के होता. त्यातून एका महिन्याचा आपत्कालीन साठा वजा केल्यानंतर वापरण्यायोग्य पाणी ५१.९५७ दशलक्ष घनमीटर, म्हणजेच २७.२२ टक्के शिल्लक होते. धरणातील पाणीसाठ्याची सद्यस्थिती स्पष्ट होण्यासाठी फाउंडेशनने महापालिकेकडे अद्यायावत आकडेवारी मागितली आहे.

माहितीच्या अधिकाराखाली मिळालेल्या महापालिकेच्या उत्तरानुसार, मोरबे धरण महापालिकेच्या ताब्यात आल्यापासून गेल्या सुमारे २५ वर्षांत त्यातील गाळ काढण्यात आलेला नाही. त्यामुळे धरणातील गाळाचे प्रमाण आणि त्याचा पाणीसाठ्यावर होणारा परिणाम यांचा शास्त्रीय अभ्यास करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे. केंद्र सरकारच्या गाळ व्यवस्थापनविषयक राष्ट्रीय मार्गदर्शक चौकटीतही जलाशयातील गाळामुळे साठवण क्षमता कमी होण्याची शक्यता मान्य करण्यात आली आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असताना गाळ काढण्याच्या कामात अडचणी येऊ शकतात. त्यामुळे पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर उघड्या पडणाऱ्या भागांतील गाळ काढणे शक्य आहे का, याचा महापालिकेने अभ्यास करावा, अशी सूचना कुमार यांनी केली.

# साळाव-सुपेगाव रस्त्यावर दिशादर्शक फलकांची गरज

## ■ काही ठिकाणी संरक्षक रेलिंग बसविण्याची मागणी

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

मुरूड तालुक्यातील पर्यटनस्थळांकडे जाण्यासाठी महत्त्वाचा असलेल्या साळाव ते सुपेगाव फाटा या सुमारे १४ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण काम जवळपास पूर्ण झाले आहे. मात्र, या मार्गावर अलिबाग, मुरूड व रेवदंडा येथील अंतर दर्शविणारे दिशादर्शक फलक तसेच विविध गावांच्या नावांचे फलक लावण्याची गरज निर्माण झाली आहे. याशिवाय काही ठिकाणी संरक्षक रेलिंग बसविण्याची मागणी होत आहे.

मागील वर्षी पावसाळ्यात महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास मंडळाच्या माध्यमातून या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाला सुरुवात करण्यात आली होती. या मार्गामुळे मुरूड तालुक्यातील पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या पर्यटकांना अधिक सुरक्षित प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे. अलीकडे कुंडलिका खाडी पूल, नागाव बाह्यवळण मार्ग आणि नवेदर बेली येथील पुलावरून अवजड वाहतुकीस बंदी असल्याने मुरूडकडे जाणाऱ्या वाहनचालकांकडून साळाव मार्गाला पसंती दिली जात आहे. मागील काही महिन्यांत सुपेगावमार्गे जाणारा रस्ता खचल्यानेही या मार्गाचा वापर वाढला होता. पुण्यासह विविध भागांतून खासगी वाहने आणि ट्रॅव्हल्समधून येणारे पर्यटक नागाव, काशिद, रेवदंडा, कोर्लई किल्ला आणि विक्रम विनायक मंदिर या पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी या रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी अलिबाग, मुरूड आणि रेवदंडा येथील अंतर दर्शविणारे फलक लावणे आवश्यक आहे. तसेच, गायब झालेले गावांच्या नावांचे फलक आणि संरक्षक रेलिंग उभारावे, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# टीव्ही चोरीच्या तपासातून ३५ गुन्ह्यांचे घबाड उघड

## चौघे सराईत गुन्हेगार गजाआड

। कळंबोली । प्रतिनिधी ।

घरातून चोरीला गेलेल्या टीव्हीचा तपास करताना उरण पोलिसांनी गुन्हेगारी जगतातील मोठे घबाड उघडकीस आणले आहे. एका घरफोडीच्या तक्रारीचा तपास करताना पोलिसांनी चार संशयितांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांचा अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याचे समोर आले. या चारही आरोपींवर विविध पोलीस ठाण्यांमध्ये हाफ मर्डर, जबरी चोरी, चाकूचा धाक दाखवून सोनसाखळी लुटणे तसेच घरफोडीचे तब्बल ३५ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.



उरणमधील एका घरातून २५ सप्टेंबर रोजी टीव्ही चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली होती. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी उरण पोलिसांनी विशेष पथक तयार करून चोरट्यांचा शोध सुरू केला. तपासादरम्यान संशयित चार जण पोलिसांच्या हाती लागले. त्यांची सखोल चौकशी केली असता चोरीच्या एका गुन्ह्यापेक्षा हा तपास मोठ्या गुन्हेगारी साखळीपर्यंत पोहोचला. तपासात मोहित कोळी आणि स्वप्नाली उर्फ सोनू पाटील या दोघांनी उरण परिसरात अनेक घरफोड्या केल्याचे समोर आले. या दोघांवर प्रत्येकी १४ गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तर महेश पवार याच्यावर सहा गंभीर गुन्हे दाखल आहेत. चौथा आरोपीदेखील एका घरफोडीच्या गुन्ह्यात सहभागी असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

पोलिसांच्या तपासानुसार, या टोळीने घरफोड्या करून मिळालेला चोरीचा मुद्देमाल स्वतःच्या वापरासाठी ठेवण्याबरोबरच सोनार तसेच इतर व्यक्तींना विकून त्यातून पैसे मिळवले. या टोळीच्या गुन्हेगारी कारवायांचा तपास सुरू असून, आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. नवी मुंबईचे सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा तपास करण्यात आला असता विविध पोलीस ठाण्यांमध्ये त्यांच्यावर एकूण ३५ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. चारही आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना १७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच, आणखी चोरीचा किती मुद्देमाल हस्तगत होतो, याचा तपास उरण पोलीस करीत आहेत.

# सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातील अनेक भागांत पावसाअभावी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, त्याचा परिणाम शेतीसह पशुधनावरही होत आहे. अनेक ठिकाणी जनावरांसाठी चारा आणि पाण्याची टंचाई जाणवत असताना डोंगराळ भागात वणवे लावण्याच्या प्रकारांमुळे परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे डोंगराळ भागात आग लावू नका, असे आवाहन सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरणप्रेमींकडून करण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील अनेक शेतकरी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन करतात. मात्र, पावसाचे प्रमाण कमी झाल्यास हिरवा चारा आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता घटते. अशा परिस्थितीत जनावरांचे संगोपन करणे शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरते. त्यातच डोंगरावरील गवत जाळण्यासाठी किंवा अन्य कारणांसाठी आग लावल्यास जनावरांसाठी उपलब्ध असलेला चारा नष्ट होतो. डोंगराळ भागातील वणव्यांमुळे झाडे, वनस्पती आणि वन्यजीवांच्या अधिवासाचे नुकसान होते. कोरडे वातावरण आणि वाऱ्यामुळे आग वेगाने पसरून मोठ्या क्षेत्रातील वनसंपत्ती जळून खाक होण्याची भीती असते. त्यामुळे पर्यावरणाचा समतोलही बिघडू शकतो.ह्वतुमच्याकडे जनावरे नसतील, तरी जनजागृतीचे एक पाऊल उचला!फ हा संदेश देत नागरिकांनी पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

पान १ वरुन

## 'टोरंट'मुळे पेज संकटात?

साठवण क्षमता १५.८७ दशलक्ष घनमीटर, तर पेज नदीवर प्रस्तावित खालच्या जलाशयाची क्षमता २८.९६ दशलक्ष घनमीटर असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकल्पात दोन जलाशयांदरम्यान पाण्याची ने-आण करून वीजनिर्मिती केली जाणार आहे. मात्र, या प्रक्रियेदरम्यान नदीच्या नैसर्गिक प्रवाहाचे नियमन कसे होणार, उन्हाळ्यात खालच्या प्रवाहात किती पाणी उपलब्ध राहणार आणि स्थानिक जलस्रोतांवर त्याचा काय परिणाम होऊ शकतो, याबाबत स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक असल्याचे समितीने म्हटले आहे. तसेच, सायडोंगर-२ प्रकल्पाची स्वतंत्र जलाशय रचना, पाण्याचा स्रोत, साठवण क्षमता आणि जलसंतुलन याबाबतची अधिकृत माहितीही सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे. दोन्ही प्रकल्पांचा एकत्रित विचार न करता केवळ स्वतंत्र प्रकल्पांचा अभ्यास केल्यास परिसरातील जलस्रोतांवरील संभाव्य परिणामांचे संपूर्ण चित्र स्पष्ट होणार नाही, अशी भूमिका समितीने मांडली आहे.

या वीज निर्मितीच्या वेळी पाणी वरच्या जलाशयातून खालच्या जलाशयाकडे सोडले जाते. त्यानंतर पंपांच्या साहाय्याने पाणी पुन्हा वर नेले जाते. तर दुसऱ्या उच्चंचन प्रकल्पाची स्वतंत्र जलाशय रचना, साठवण क्षमता, पाणी घेण्याचा स्रोत यामुळे जलाशयाची साठवण क्षमता यामुळे नदीचे पाणी संपुष्टात येणार आहे. या प्रकल्पामुळे नदीतील पाण्याची उपलब्धता कमी झाली किंवा पाणी सोडण्याच्या वेळापत्रकात बदल झाला, तर नदीवर अवलंबून असलेल्या जलस्रोतांवर त्याचा परिणाम होणार आहे. तसेच, पेज नदीच्या प्रवाहात बदल झाल्यास शेती, सिंचन व्यवस्था आणि नदीकाठच्या विहिरींच्या पाणीपातळीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच संभाव्य धोके ओळखून पाण्याच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना निश्चित कराव्यात, असे समितीचे म्हणणे आहे.

## तलाठ्याचा कारभार संशयास्पद!

आणि अल्फेया डायस यांच्यासह विविध व्यक्तींच्या हक्कांचा व अधिकारांचा संदर्भ देण्यात आला आहे.

इच्छापत्रातील परिच्छेद क्रमांक १० मध्ये अल्फेया डायस आणि टेरेन्स फ्रॉन्सीका यांना कार्यकारी विश्वस्त म्हणून काही अधिकार दिल्याचे नमूद आहे. परिच्छेद क्रमांक १२ मध्ये यापूर्वी मुलांना हस्तांतरित केलेल्या मालमत्ता त्यांच्या वैयक्तिक मालकीच्या राहतील आणि त्यांचा इच्छापत्रातील एकूण संपत्तीत समावेश होणार नाही, असा मजकूर असल्याचे ढवळे यांनी निदर्शनास आणले आहे. मात्र, देहरंग येथील सर्व्हे क्रमांक १/८/२३ या मिळकतीचा इच्छापत्रात स्पष्ट उल्लेख नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. इच्छापत्रातील इरीन मेरी अल्बर्ट फ्रॉन्सीका आणि इरीन मेरी प्रॉन्सेकर या नावांबाबतही संभ्रम असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

तक्रारीनुसार, २४ नोव्हेंबर १९६५ रोजी इरीन मेरी फ्रॉन्सीका यांनी पनवेल तालुक्यातील देहरंग येथे हरी माधव गुरूजी यांच्याकडून १,२०० रुपयांना बिगरशेती प्लॉट खरेदी केला होता. या व्यवहारातील फेरफार क्रमांक २०७ मध्ये तुरा आणि वेरनॉन या अल्पवयीन मुलांचा तसेच त्यांच्या आईचा अज्ञानपालनकर्ती म्हणून उल्लेख असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तुरा, वेरनॉन आणि सलीना यांच्या मृत्यूचे दाखले, खरेदीखत, सातबारा उतारा, फेरफार नोंदी व इतर कागदपत्रे सादर केल्याचेही ढवळे यांनी नमूद केले आहे.

इरीन मेरी फ्रॉन्सीका यांचा मृत्यू १४ डिसेंबर २००२ रोजी दिल्ली येथील इंदिरा गांधी रुग्णालयात झाल्याचा दाखला उपलब्ध असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तसेच, ५ जानेवारी २०२६ रोजी पनवेल दिवाणी न्यायालयातील अर्ज क्रमांक १०५४/२०२४ च्या आदेशातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये संबंधित मालमत्तेचा आजीच्या मालमत्तेच्या संदर्भात उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला आहे. मुग्धा सातारकर यांच्या अर्जावरील छायाचित्र आणि आधारकार्डावरील छायाचित्र यांत मोठी तफावत असल्याचेही ढवळे यांनी म्हटले आहे.

तलाठ्यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी तहसीलदारांना दिलेल्या पत्रात चुकीची माहिती दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. अनिल ढवळे यांनी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधित मिळकतीसंदर्भातील कागदपत्रे मागितली असता, मुग्धा सातारकर यांचा एकच अर्ज देण्यात आला; मात्र २९ नोव्हेंबर २०२५, २२ सप्टेंबर २०२५ आणि इतर तारखांच्या अर्जांचा संपूर्ण तपशील उपलब्ध करून देण्यात आला नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. इच्छापत्राची सत्यता, अर्जांमधील विसंगती आणि वारसनोंदीच्या प्रक्रियेची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या प्रकरणात तलाठ्याने बनावट कागदपत्रांच्या आधारे कार्यवाही केल्याचा, न्यायालयीन आदेशांकडे दुर्लक्ष केल्याचा आणि संबंधितांना मानसिक त्रास दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तक्रारीत २५ लाख रुपयांच्या मागणीचाही उल्लेख करण्यात आला आहे. या आरोपांची चौकशी करून संबंधित तलाठ्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी, निलंबित करावे आणि कायद्यानुसार फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या शेतकरी महासभेचे रायगड जिल्हाध्यक्ष अनिल नामदेव ढवळे यांनी केली आहे. तसेच श्रीमती रेखा सदर यांच्या वारसाहक्काची कायदेशीर पडताळणी करून सातबारा उताऱ्यावर वारसनोंद करावी, अशी मागणी त्यांनी अपर तहसीलदारांकडे केली आहे.

## रूढींच्या बेड्या तोडून वैद्यकीय क्षेत्रात झेप घेणारी दुर्गा : रखमाबाई राऊत

निश्चित करण्याचा कायदा करावा लागला. १८९१ च्या त्या कायद्याअंतर्गत मुलींच्या लग्नाचं आणि संबंधांच्या संमतीचं वय दहावरून बारा वर्ष करण्यात आलं. हे रखमाबाईंनी महिलांसाठी केलेल्या संघर्षाचं फळ होतं.

त्यांचा संघर्ष चालूच होता. पुरुष डॉक्टरांकडे उपचारासाठी जायला महिला संकोच करतात आणि आजार अंगावर काढतात, हे भयाण वास्तव अनुभवलेल्या रखमाबाईंनी महिलांसाठी डॉक्टर होण्याचा निश्चय केला. ध्येय अवघड होतं, वाट बिकट होती पण निर्धार मात्र पक्का होता. याच निर्धाराने झपाटलेल्या रखमाबाईंनी लंडनला जाऊन लंडन स्कूल ऑफ मेडिसिन फॉर वुमन मधून १८९४ साली वैद्यकीय पदवी प्राप्त केली. मायदेशात परतल्यावर महिला डॉक्टर म्हणून सुरत, राजकोट आणि पुढे पुण्याच्या ससून रुग्णालयात पस्तीस वर्ष त्यांनी महिला व बालकांच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केलं. त्यांच्या आधी आनंदीबाई जोशी आणि कादंबीनी गांगुली यासुद्धा महिला डॉक्टर झाल्या, पण एम.डी. ही वैद्यकीय क्षेत्रातली रीतसर पदवी मिळवून रखमाबाई शेवटपर्यंत कार्यरत होत्या. १८९७ साली पुण्यामधल्या प्लेगच्या महाभयंकर साथीत अहोरात्र झटून, रुग्णांना डॉक्टरांमधल्या देवाची अनुभूती देऊन त्या कृतकृत्य झाल्या.

महिलांच्या सुदृढ आरोग्याचा मार्ग सुकर करणारी, वैद्यकीय सेवेतील दुर्गा रखमाबाई राऊत यांच्या चरणी नवरात्रीची सातवी माळ कृतज्ञतापूर्वक अर्पण.

## शेतकऱ्यांना पाच हजारांची भीक नको

सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. सरकारने सरसकट दुष्काळ जाहीर करण्याबाबत ठोस भूमिका घ्यावी. मदत कोणाला मिळणार, त्यासाठी कोणते निकष लावले जाणार आणि प्रत्यक्ष खात्यात पैसे कधी जमा होणार, याची स्पष्ट माहिती द्यावी. केवळ घोषणा करून स्वतःची पाठ थोपटून घेण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष मदत पोहोचविणे महत्त्वाचे आहे, असेही चित्रलेखा पाटील म्हणाल्या.

**कर्जतमधील शेतकऱ्यांच्या विरोधाचे काय?**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील ३७७ हेक्टर जमिनीवरील टोरंट ऊर्जा प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असल्याचा मुद्दाही चित्रलेखा पाटील यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता त्यांच्या जमिनीवर प्रकल्प लादण्याचा प्रयत्न का केला जात आहे? भूमिपूजनाच्या तयारीपूर्वी सरकारने शेतकऱ्यांच्या आक्षेपांना उत्तरे द्यावीत आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करावे. विकासप्रकल्प महत्त्वाचे असले, तरी त्यासाठी शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करता येणार नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी हव्यात, त्यांच्या कष्टावर उभे राहिलेले प्रकल्प हवेत; पण संकटाच्या काळात त्यांना मदत देताना सरकारचा हात आखडता का? सरकारने हा प्रश्न गांभीर्याने घ्यावा. शेतकऱ्यांच्या हक्कांशी खेळण्याचा प्रयत्न झाल्यास शेतकरी कामगार पक्ष रस्त्यावर उतरून सरकारला जाब विचारेल, असा इशाराही चित्रलेखा पाटील यांनी दिला.

## जि.प. शाळेत स्वयंपाकी महिलांचे हाल

संघटनेच्या वतीने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पाली यांना गुरुवारी (दि.१५) निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, थकीत मानधनामुळे स्वयंपाकी महिलांनी अन्न शिजवण्यास नकार दिला आहे. तसेच, तालुक्यातील शाळांमध्ये पोषण आहाराचा साठा संपला असून, प्रशासनाने तातडीने यावर योग्य मार्ग न काढल्यास शालेय पोषण आहार शिजवणे पूर्णपणे बंद होईल, असा इशाराही देण्यात आला आहे. शासनाच्या ढिसाळ कारभारामुळे मुलांच्या आरोग्याशी व स्वयंपाकी महिलांच्या हक्काशी खेळ सुरू असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. अनेक ठिकाणी केवळ विद्यार्थ्यांच्या तोंडी चार घास जावेत आणि लहान मुलांची सोय व्हावी या संवेदनशील भावनेपोटी स्वयंपाकी महिला तोंड दाबून काम करत आहेत; मात्र, पोटापाण्याचा प्रश्न आ वासून उभा राहिल्याने त्या हतबल झाल्या आहेत.

## रायगड जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करा!

राबविण्याची मागणी या आंदोलनातून करण्यात येणार आहे. कोकणातील चारा वनव्यामध्ये जळून खाक होण्यापूर्वी रोजगार हमी योजनेतून कापून घेण्यात यावा, जेणेकरून स्थानिकांना रोजगार मिळेल आणि चारा टंचाईवर मात करता येईल, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याशिवाय वाहत्या ओढ्या-नाल्यांवर श्रमदानातून तातडीने मातीचे बांध घालावेत, यासाठी ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेऊन ग्रामस्थांना कामासाठी प्रोत्साहित करावे. शाळा व महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) आणि राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांची शिबिरे आयोजित करून श्रमदानातून मातीचे बांध घालावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

कुंभमेळ्यावरील खर्च कमी करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत द्यावी, तसेच शेतकऱ्यांच्या मुलांची शैक्षणिक फी माफ करावी, या मागण्यांचाही आंदोलनात समावेश आहे. महाडसह रायगड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी संदीप सकपाळ यांनी केली आहे.

## विद्यार्थिनीसोबत छेडछाड

चांढवे येथील झिशान अब्दुल बारी पानसारी (२८) याने पिडीत मुलगी अल्पवयीन असल्याचे माहिती असूनही तिला वाटेत गाठून तिचा हात पकडून बाजुल्या असणाऱ्या गवतात जबरदस्तीने खेचून तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले. याबाबत झिशान अब्दुल बारी पानसारी याच्याविरोधात पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला मध्यरात्रीच्या सुमारास अटक केली. याप्रकरणी अधिक तपास महाड उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप काळे करत आहेत.

## टेम्पोच्या धडकेत एकजण जखमी

वाहनावरील नियंत्रण सुटले आणि टेम्पो महामार्गाचा दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेच्या मार्गावर गेला आणि समोरून येणाऱ्या स्वप्नील चौधरी यांच्या दुचाकीला धडकला. या अपघातात स्वप्नील चौधरी यांच्या दोन्ही खांद्यांना तसेच पाठीच्या मणक्यांना गंभीर दुखापत झाली असून, अपघातात तिन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी टेम्पो चालकाच्या विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कळंबोलीत पतीकडून पत्नीची हत्या

पतीच्या मनात संशय निर्माण झाला होता. तसेच, पत्नीचे अन्य व्यक्तींशी संबंध असल्याचा संशय त्याला होता. याच कारणावरून दोघांमध्ये वाद झाल्याची माहिती समोर आली आहे. या वादातून पतीने पत्नीला मारहाण केल्याने तिला गंभीर दुखापत झाली. या दुखापतींमुळे तिचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच कळंबोली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पतीला ताब्यात घेतले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## अवैध खैर वाहतुकीवर कारवाई

किटा १.२३८ घनमीटर, अंदाजे किंमत २ हजार ८४ रुपये, असा वनउपज साठा आढळून आला. त्यासोबत सुमारे ३ लाख रुपये किमतीचे वाहनही जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी मंडणगड तालुक्यातील अरविंद काते याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई वनविभागाच्या पथकाने केली असून, पुढील तपास वनपरिमंडळ अधिकारी तुळशीदास चावरेकर, मंडणगड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, आंबेत मार्गावरील मंडणगड परिसरातून होणाऱ्या अवैध खैर वाहतुकीला आळा घालण्यासाठी वनविभागामार्फत आंबेत येथे चेकपोस्ट उभारण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गावरील वनउपज वाहतुकीवर अधिक प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होणार आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टमध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टमध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे भोईरवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| १) पुजा संदेश भोईर<br>२) श्री संदेश राजाराम भोईर | ३६ | ६ | ०-६८-३० | ९ | ९४ |
| | सदरील मिळकतीपैकी मालकांचे नावे नमुद हे. आर.चौमी ०-३०-०० या क्षेत्रापैकी श्री संदेश राजाराम भोईर यांचे मालकीचे क्षेत्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-१७/१०/२०२६
मो.नं.९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

### पाहिजेत

**व्यावसायिक वापरासाठी जागा/जमीन भाड्याने घेणे आहे.**

- पळस्पे फाटा ते शेडुंग टोल प्लाझा दरम्यान राष्ट्रीय महामार्गालगत डावीकडे, उजवीकडे
- पळस्पे फाटा ते पेण दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गालगत डावीकडे, उजवीकडे
- भेंडखळ, खोपटा कचेरपाडा, सोनारी, द्रोणागिरी, जेएनपीटी परिसर, चिर्ले, धुतूम, जासई, गव्हाणफाटा डावीकडे, उजवीकडे
- नवी मुंबईमधील कळंबोली, पनवेल शहर, उलवे, खारघर, कळंबोली ते डोंबिवली शिळफाटा रोड. तसेच उरण तालुका, पनवेल तालुका, रायगड जिल्हा या भागातच मुख्य रस्त्याजवळ १८ ते ६० गुंठे जागा/जमीन व्यवसायायिक वापरासाठी दीर्घकालीन मुदत तत्वावर भाड्याने हवी आहे.

जमीन मालक, रिअल इस्टेट एजंट यांनी संपर्क करावा.
**मोबाईल व्हॉटसॲप नंबर : ९८३३१३८१११**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-21/26-27/ Rfx No.7000041867 | Supply, Installation, Commissioning Programmable of Testing & portable, battery charger (Universal Charger) with DC Voltage monitoring usable for various s/s under 400 kV R.S. Division Nagothane Under EHV O&M Circle, Panvel | **Rs. 9,96,510/-** | **26.10.2026 up to 23.59 hrs** |

**EMD 1% of estimate cost i.e. Rs. 9,965.10/-** and **Tender fee** Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 **Email ID: ee7230@mahatransco.in Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | *Esti. Cost* |
|---|---|---|
| **Tend-31/26-27 7000041861** | AMC for the work of supply repair and restoration of EHV cable faults and various emergency works of EHV cable under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee : Rs. 5000/- + GST** | Rs. 200.00 Lakhs including taxes. |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 16.10.2026 at 11:00 Hrs. to 26.10.2026 up to 11:00 hrs, Opening date:-26.10.2026 @11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Mobile No. 8412050202, E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## निवडक



### शारदोत्सवात गंधार म्हात्रे यांच्या गायनाची मैफल

**अलिबाग :** सार्वजनिक वाचनालय अलिबाग (डोंगरे हॉल) यांच्या शारदोत्सवात गुरुवारी (दि.१५) गंधार म्हात्रे यांच्या 'स्वरगंधार' गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भक्तीगीते, अभंग, गवळण, देवीचा जोगवा आणि देवीच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. शास्त्रीय संगीतावर आधारित गायनाला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. सार्वजनिक वाचनालय ही संस्था गेली अनेक वर्षे नवरात्रोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत आहे. अनेक नामांकित गायक आणि कलाकारांनी या उत्सवात सहभाग घेतला आहे. या मैफलीत गंधार म्हात्रे यांना तबल्यावर श्रीधर पाटील, पखवाजवर सिद्धेश तोडणकर, तर स्वर साथ नरदास ठाकूर, गणेश म्हात्रे, अजय निषाद यांनी केली. कार्यक्रमाचे निवेदन म्हात्रे यांनी केले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा शैला पाटील, सचिव संतोष बोंद्रे, नंदू तळकर, संगीत शिक्षक सुनील म्हात्रे, वाचनालयाच्या संचालक मंडळाचे सदस्य, कर्मचारी वर्ग, महिला प्रेक्षक आणि संगीतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अमृतांजन पुलाजवळ वाहतूक कोंडी

**पाताळगंगा :** मुंबई-पुणे एक्सप्रेस मार्गावरील अमृतांजन पुलाजवळ अज्ञात वाहनातून ऑईल सांडल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला होता. ही घटना रात्री दहाच्या सुमारास घडली. पोलीस पेट्रोलिंग दरम्यान रस्त्यावर ऑईल सांडल्याचे निदर्शनास आल्यानंतर आयआरबी कर्मचारी आणि वाहतूक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. रस्त्यावर ऑईल सांडल्यामुळे वाहनांचे नियंत्रण सुटून अपघात होण्याची शक्यता होती. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी खबरदारी घेत ऑईल सांडलेल्या ठिकाणी माती टाकण्याचे काम हाती घेतले. माती टाकून रस्ता सुरक्षित करण्यासोबतच वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. या घटनेमुळे काही काळासाठी द्रुतगती मार्गावर वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. मात्र, वाहतूक पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवत वाहनांची वाहतूक सुरळीत केली. पोलिसांच्या तत्परतेमुळे आणि आयआरबीच्या सहकार्यामुळे मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. दरम्यान, द्रुतगती मार्गावरून प्रवास करताना वाहनचालकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन करण्यात आले होते.

# संविधानिक मूल्यांवर अभ्यासक्रमाचा देखावा!

**। मुंबई । विशेष प्रतिनिधी ।**

एकीकडे संविधानाच्या मूल्यांना पायदळी तुडवायचे, नागरिकांच्या लोकशाही हक्कांवर गदा आणायची आणि दुसरीकडे नागरिकशास्त्र आणि संवैधानिक मूल्यांवर आधारित अभ्यासक्रमाचा देखावा निर्माण करायचा. एकीकडे विद्यार्थी आंदोलनावर अमानूष दडपशाही-लाठीमार करायचा आणि दुसरीकडे विद्यार्थी प्रेरणा या नावाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे प्रकाशन करायचे, हा सरकारचादुटप्पीपणा आहे असा घणाघात शेतकरी कामगार पक्षाचे कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे यांनी केला आहे.

संविधानाचा जयघोष करायचा आणि त्याच संविधानाने दिलेल्या लोकशाही अधिकारांवर गदा आणायची, हा विरोधाभास जनतेच्या नजरेतून सुटणार नाही. संविधान हे केवळ पुस्तकात छापलेले शब्द नाहीत, तर ते देशाच्या लोकशाहीचा आत्मा आहे. त्यामुळे संविधानाच्या गौरवाचे सोहळे करण्यापेक्षा संविधानाच्या तत्त्वांनुसार राज्यकारभार चालविण्याची हिंमत सरकारने दाखवावी.

पुस्तक प्रकाशनाचे सोहळे करण्यापेक्षा संविधानाच्या रक्षणाची ठोस कृती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावी, अशी भूमिका शेतकरी कामगार पक्षाने मांडली आहे. शेतकरी कामगार पक्षाची भूमिका स्पष्ट आहे. संविधानाचे महत्त्व सांगणाऱ्या कार्यक्रमांना विरोध करण्याचा प्रश्न नाही; मात्र, अशा कार्यक्रमांमधून व्यक्त होणारी संविधाननिष्ठा प्रत्यक्ष कारभारातही दिसली पाहिजे. जनतेचे मूलभूत अधिकार, लोकशाही स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय यांचे संरक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. संविधानाचा जयघोष करायचा आणि संविधानातील मूल्यांच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित झाले की त्याकडे दुर्लक्ष करायचे, हा विरोधाभास दूर झाला पाहिजे. सरकारने असंविधानिक असल्याचा आरोप होणाऱ्या निर्णयांचे समर्थन करण्याऐवजी त्यांची घटनात्मक वैधता स्पष्ट करावी. लोकशाही हक्कांवर गदा आणणारे निर्णय असल्यास त्यांचा फेरविचार करावा आणि संविधानाच्या चौकटीत राहून प्रशासन चालवावे, असे खडेबोलही कोरडे यांनी सरकारला सुनावले.




### संविधानातील तत्त्वांचे पालन करा

संविधान हे सत्ताधाऱ्यांच्या सोयीसाठी नसून देशातील प्रत्येक नागरिकाच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आहे. त्यामुळे पुस्तक प्रकाशनाचे सोहळे साजरे करण्याबरोबरच संविधानातील तत्त्वांचे पालन करण्याची जबाबदारीही सरकारने स्वीकारली पाहिजे. संविधानाचा सन्मान शब्दांत नव्हे, तर कृतीतून सिद्ध करा; लोकशाहीचा गळा घोटणारे नव्हे, तर लोकशाहीला बळ देणारे निर्णय घ्या, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाकडून करण्यात येत आहे.

> संविधानाचे पुस्तक प्रकाशित करून संविधान वाचत नसते; संविधानातील मूल्ये प्रत्यक्ष कृतीतून जपावी लागतात. लोकशाही हक्कांवर मर्यादा आणणारे निर्णय, दडपशाहीची प्रवृत्ती आणि हुकूमशाही पद्धतीला खतपाणी घालणारा कारभार थांबविणे हीच संविधानाप्रती खरी निष्ठा आहे.
> -ॲड. राजेंद्र कोरडे, शेतकरी कामगार पक्षाचे कार्यालयीन चिटणीस

# वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीचा कारभार अधिकाऱ्यांविना

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडा येथे कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी उपलब्ध नसल्याने प्रशासकीय कामकाजाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या ग्रामपंचायतीच्या हद्दीत सुमारे ७२ हजार लोकसंख्या असल्याचे सांगण्यात येते.

एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीत अधिकारीच नियमित उपलब्ध नसल्याने नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांना विविध प्रशासकीय कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीकडे गटविकास अधिकारी आणि वरिष्ठ प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असून, नागरिकांना विविध दाखले, शासकीय योजनांशी संबंधित कागदपत्रे आणि इतर प्रशासकीय कामांसाठी ग्रामपंचायत कार्यालयात जावे लागते. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामांसाठी आवश्यक कागदपत्रे मिळविताना विलंब होत असल्याच्या तक्रारी आहेत.

मात्र, कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी उपलब्ध नसल्यास नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यात वेळ आणि पैशांचा अपव्यय होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीत नियमित अधिकारी उपलब्ध असणे ही केवळ प्रशासकीय गरज नसून नागरिकांच्या दैनंदिन कामांसाठी आवश्यक बाब आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १० जुलै २०२६ रोजी ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी कायमस्वरूपी अधिकाऱ्याची नियुक्ती झालेली नसल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात ग्रामपंचायत अधिकारी वैशाली जाधव यांच्याकडे कार्यभार सोपविण्यात आला होता. मात्र, त्यांनीही गटविकास अधिकाऱ्यांकडे राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून त्या कार्यालयात येत नसल्याचा दावा करण्यात येत असल्याने ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजाबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

या परिस्थितीत ग्रामपंचायतीचा नियमित कारभार कोण सांभाळत आहे? नागरिकांची प्रलंबित कामे कोण मार्गी लावणार? कायमस्वरूपी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामपंचायतीतील प्रशासकीय अडचणींचा परिणाम विकासकामांवरही होत असल्याच्या तक्रारी आहेत. गेल्या चार महिन्यांपासून ग्रामपंचायत हद्दीतील अनेक विकासकामे थांबल्याचा दावा काही सदस्यांकडून करण्यात येत आहे. तसेच यापूर्वी केलेल्या कामांची बिले रखडल्याची तक्रारही काही सदस्यांनी केली आहे.

गेल्या अडीच वर्षांत कोकण विभाग, राज्य आणि केंद्रस्तरावर शासकीय पुरस्कार मिळविल्याचे सांगितल्या जाणाऱ्या या ग्रामपंचायतीच्या विकासाला आता प्रशासकीय अडचणींमुळे खीळ बसली आहे.

संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन ग्रामपंचायतीला नियमित अधिकारी उपलब्ध करून द्यावा, नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावावीत आणि विकासकामांच्या सद्यस्थितीबाबत स्पष्टता द्यावी, अशी मागणी होत आहे.



■ कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी कधी मिळणार?

■ नागरिकांसह विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय

> ग्रुप ग्रामपंचायत वासांबे करिता वरिष्ठांकडून नव्याने ग्रामपंचायत अधिकारी येणार असल्याचे समजते.परंतु अद्याप स्पष्ट नाही. या ग्रामपंचायतीत सोमवारी (दि.१९) ऑक्टोबरपासून वेळेवर ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित राहील.
> -संदिप कराड, गटविकास अधिकारी, खालापूर पंचायत समिती

> आम्हाला ग्रामपंचायतीत शासकीय योजनांशी संबंधित कागदपत्रे आणि इतर प्रशासकीय कामासाठी ग्रामपंचायतीत आलो असता ग्रामपंचायत अधिकारीच जागेवर नसल्याने दाखल्यासाठी हेलपाटे मारावे लागत आहेत.
> - सुज्ञ नागरिक


# मोरब्याचे पाणी पनवेलकरांची तहान भागवण्यासाठी वापरा

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर आणि परिसरात सध्या तीव्र पाणीटंचाई जाणवत असून, नागरिकांना पुरेसा आणि नियमित पाणीपुरवठा मिळण्यात अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर मोरबे गावातील पाटबंधारे विभागाच्या धरणातील पाण्याचा वापर पनवेलकरांची तहान भागवण्यासाठी करण्यात यावा, अशी मागणी पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी केली आहे. यासाठी त्यांनी मोरबे धरणाला भेट देऊन पाहणी केली. या वेळी नगरसेवक हरेश केणी आणि नगरसेवक तुषार पाटील तसेच योगेश चिले उपस्थित होते.

पनवेल शहरासह परिसरातील लोकसंख्या वाढत असताना पाण्याची गरजही वाढत आहे. मात्र, सध्या अनेक भागांत पाणीटंचाईची समस्या जाणवत असल्याने नागरिकांना पाण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. काही भागांत अपुरा आणि अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने रहिवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पाण्याचे पर्यायी स्रोत शोधून उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे.

मोरबे धरणाची साठवण क्षमता ३.२२ दशलक्ष घनमीटर असल्याचे सांगितले जाते. धरण प्रामुख्याने सिंचनासाठी बांधण्यात आले आहे. मात्र, पनवेल परिसरातील सध्याची पाणीटंचाई लक्षात घेता या धरणातील पाण्याचा काही भाग पिण्याच्या पाण्यासाठी वापरणे शक्य आहे का, याचा अभ्यास संबंधित विभागाने करणे गरजेचे आहे.



■ पाणीटंचाईवर विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांची मागणी

### बांधकाम साईटवरून प्लेटची चोरी

**पनवेल :** पुष्पकनगर येथील बालाजी व्हेंचरच्या बांधकाम साईटवरून २ लाख १० हजार रुपये किमतीच्या १४ ॲल्युमिनियमच्या प्लेट चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तीन तरुणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, सम्राट डाकी, अनिल चव्हाण, दत्ता जाधव, साईनाथ मोकल, विशाल दुधे, यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे प्रेम पाटील, कलीम अन्वर मलिक, रोहन शर्मा यांना ताब्यात घेतले. प्रत्येकी १५ हजार रुपये किमतीच्या १४ प्लेट असा एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. या कारवाईमुळे चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे.








● अलिबागमधील श्रीबाग २ मध्ये अंबामाता मंदिरात गुरुवारी संध्याकाळी संगीत खुर्ची, साडी लकी ड्रा, तसेच गरबा या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### बॅटऱ्यांच्या चोरीप्रकरणी तरुण ताब्यात

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल जवळील विठ्ठलवाडी मंदिर परिसरातील मैदानातं दोन हायवा डम्परच्या चार बॅटऱ्या चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अक्षय राठोड याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ६२ हजार रुपये किमतीच्या चार बॅटऱ्या हस्तगत करण्यात आल्या. रात्रीच्या सुमारास विठ्ठलवाडी, आवटी मैदान, आवळेगाव परिसरात ही चोरी झाली होती. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण सम्राट डाकी, अनिल चव्हाण, दत्ता जाधव, साईनाथ मोकल, विशाल दुधे, अभिजित गडकरी यांनी तांत्रिक माहिती आणि तपासाच्या आधारे आरोपीला ताब्यात घेत चोरीस गेलेल्या बॅटऱ्या हस्तगत केल्या.

# पालीत कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

महिलांचे कर्तृत्व, जिद्द, संघर्ष आणि सामाजिक योगदानाचा गौरव करणारा 'नारी शक्ती सन्मान सोहळा' पाली येथे गुरुवारी (दि.१५) ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडला. हॉटेल एडिशियाच्या वतीने आयोजित या विशेष सोहळ्यात प्रशासन, पोलीस सेवा, सामाजिक कार्य, आरोग्य, राजकारण, कृषी, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्य आणि जिल्ह्यातील २२ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास पोलीस अधीक्षक आँचल दलाल, यांच्यासह डॉ. राजश्री कटके, शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, अंकशास्त्रज्ञ श्वेता जुमानी, स्वप्निता उपेंद्र गिरी, लता कळंबे आदी विविध क्षेत्रांतील महिलांच्या कार्याचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी नारी शक्ती सन्मान सोहळा आयोजनाचे कौतुक केले.

या नारी सन्मान सोहळ्यात अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, वर्षा राजेश मोरे, शीतल गायकवाड, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, ॲड. आरती गुप्ता, लता कळंबे, कांचन जाधव, तनुजा घरत, नाजुका गुरव, अश्विनी गाडगीळ, यांचा सन्मान करण्यात आला. संमोहनतज्ज्ञ डॉ. महेश काटे आणि डॉ. आरती काटे यांच्या पुढाकारातून आयोजित या सोहळ्याचा उद्देश केवळ महिलांचा सन्मान करणे एवढाच नव्हता, तर त्यांच्या संघर्षमय प्रवासातून समाजाला प्रेरणा देणे आणि महिला सक्षमीकरणाचा विचार अधिक व्यापक करणे हाही होता.




**पंचनामे होत नसल्याने शेतकरी हवालदिल** | **तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी**

# कर्जत तालुक्यात भाताची शेती करपली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका भाताचे कोठार म्हणून संबोधला जात होता. या तालुक्यातील शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन भाताची शेती आहे. भाताच्या शेतीमधून विक्रमी उत्पादन करणारे शेतकरी कर्जत तालुक्यात आहेत. मात्र, हे सर्व शेतकरी यावर्षीच्या खरीप हंगामातील पावसाच्या अनियमिततेमुळे संकटात आले आहेत. भाताची शेती पाऊस सप्टेंबर महिन्याचे अर्ध्यावर आपल्या परतीच्या प्रवासाला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. दरम्यान, आतातर भाताची पिके शेतातच करपून जाऊ लागली असून शेतकऱ्यांपुढे मोठे आर्थिक संकट डोकावत आहे. मात्र, शासनाने कर्जत तालुका दुष्काळी जाहीर केलेला नाही आणि तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानाची पंचनामे देखील केले जात नाही.



तालुक्यात यावर्षी साधारण ९००० हेक्टर जमिनीवर भाताची शेती केली गेली आहे. भाताचे क्षेत्र यापेक्षा जास्त आहे, पण यावर्षी पावसाळा उशिरा सुरू झाला आणि त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतात भाताची रोपे उगवली नाहीत. तेंव्हापासून शेतकरी अडचणीत येऊ लागला होता. त्यानंतर ज्या शेतकऱ्यांनी नैसर्गिक परिस्थितीवर मात करून भाताची शेती केली, त्या शेतकऱ्यांच्या पिकाची पूर्ण तयारी होण्याची वेळ आली आणि पाऊस गायब झाला. अनेक वर्षांनी यावर्षी खरीप हंगामात भाताचे पिक चांगले बहरले होते. १५ सप्टेंबर नंतर आजपर्यंत पाऊस झालेला नाही आणि त्यामुळे भाताचे पिक शेतात पिवळे धमक होण्याऐवजी आजही हिरवेगार आहे.

भाताची कोंब तयार होण्याची कृती यावर्षी सप्टेंबर महिन्यात सुरू झाली आणि त्याच काळात पाऊस कर्जत तालुक्यातून निघून गेला. त्यामुळे भाताचे कोंब पूर्ण भरात आलेले नाही. तालुक्यातील अर्ध्याहून अधिक भागात तर भाताचे कोंब देखील पावसाच्या जाण्याने तयार झालेले नाहीत.

दरम्यान, भाताची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतात निर्माण झालेले भाताचे पिक आज अंतिम घटका मोजत आहे. भाताच्या पिकासाठी लागणारे पाणी निसर्गाने दिलेले नाही आणि त्यामुळे भाताची शेती संकटात आली आहे.

शेतीमधील नुकसान बद्दल तालुक्यातील अनेक सामाजिक संघटनांनी शासनाकडे दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली. तालुक्यातील माळरानावर आणि डोंगराच्या उतारावर लावलेली शेती धोक्यात आली आहे. त्या या ठिकाणच्या भाताचे पिक शेतात करपून गेले आहे.

> आमच्या सर्व भागातील शेती दुबार पिकाची आहे. मात्र, गतवर्षी मे महिन्यात पाऊस आल्याने रबी शेतीचे पिक घेता आले नव्हते. आता सप्टेंबर महिन्यात पाऊस गेल्याने खरीपमधील पीक घेता येणार नाही.
> -दशरथ मुने, शेतकरी

> नेरळ विविध कार्यकारी सोसायटी आमच्या सोसायटीच्या अंतर्गत येत असलेल्या ३५ हून अधिक गावातील शेतकऱ्यांनी मागणी केल्यानंतर भाताची पिकाची नुकसानी लक्षात घेता कर्जत तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा अशी मागणी आम्ही शासनाकडे केली आहे.
> -राजेंद्र विरले, सभापती

# नवरात्रोत्सवात नारळाच्या किमतीत वाढ

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली असून, शहरात देवीचा जागर मोठ्या उत्साहात सुरू आहे. घरोघरी घटस्थापना, देवीची पूजा आणि मंदिरांमध्ये ओटी भरण्यासाठी महिलांची लगबग सुरू झाली आहे. मात्र, सणाच्या उत्साहातच पूजेसाठी आवश्यक असलेल्या नारळाच्या आणि सुक्या खोबऱ्याच्या किमती वाढू लागल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसत आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवाचा खर्च भागवायचा की पुढील महिन्यात येणाऱ्या दिवाळीचे बजेट सांभाळायचे, असा प्रश्न महिलांसमोर निर्माण झाला आहे.

नवरात्रोत्सवात अनेक महिला श्रद्धेने देवीच्या मंदिरात जाऊन ओटी भरतात. या ओटीमध्ये नारळ, सुके खोबरे,याचा समावेश असतो. धार्मिक परंपरेनुसार देवीची ओटी भरण्याला विशेष महत्त्व असल्याने या काळात नारळ आणि खोबऱ्याला मागणी वाढते. मात्र, घाऊक बाजारातील दरांमध्ये वाढ झाल्यास त्याचा परिणाम किरकोळ विक्रीवरही होण्याची शक्यता आहे.आधीच वाढत्या महागाईमुळे घरखर्चाचे गणित सांभाळताना सर्वसामान्य कुटुंबांची दमछाक होत आहे.

# दागिने मोडण्याचे धंदे

पिढ्यानपिढ्यांचे दागिने माणसे जपून ठेवतात. अगदीच भिकेला लागण्याची वेळ आली तर हे दागिने मोडले जातात. आयडीबीआय या सरकारी बँकेची विक्री म्हणजे असाच एक दागिना मोडून खाण्याचा प्रकार आहे. वास्तविक आपल्या देशाचे उत्तम चालले आहे. मोदी सरकारच्या म्हणण्यानुसार जीडीपीची वाढ ७.४ टक्के आहे आणि २०४७ ला भारत विकसित करके रहेंगे असा नारा मोदींनी दिला आहे. तर मग आयडीबीआय एका खासगी कंपनीला, तेही कॅनडातील खासगी वित्तीय संस्थेला फुंकून टाकण्याची अशी काय मजबुरी होती हे सर्वांसमोर यायला हवे. आयडीबीआय ही बँक कॅनडाच्या फेअरफॅक्स फिनान्शियल होल्डिंग्ज या कंपनीला ५२ हजार ८७८ रुपयांना विकली गेली आहे. केंद्र सरकारने या बँकेतले आपले तीस टक्के आणि एलआयसीचे तीस टक्के असे शेअर्स विकण्याला परवानगी दिली असून त्यामुळे फेअरफॅक्सची मालकी ६० टक्के होईल. एलआयसीची मालकी नंतर आणखी कमी करून १५ टक्क्यांपर्यंत खाली आणली जाणार आहे. तोट्यात असलेल्या सरकारी कंपन्यांमधील मालकी विकून टाकण्याच्या अर्थात निर्गुंतवणुकीकरण किंवा डिसइन्व्हेस्टमेंटच्या धोरणानुसारच ही विक्री केली गेली आहे, असे याबाबतचे सरकारचे म्हणणे आहे. एअर इंडियासारख्या पांढऱ्या हत्तींच्या बाबतीत ते मान्य करता येऊ शकते. पण आयडीबीआय ही वित्तीय व बँकिंग क्षेत्रातील एक मोक्याची संस्था होती. तिला उद्योगांचे नियम लावता येऊ शकत नाहीत. ही बँक बराच काळ अडचणीत व तोट्यात होती हे खरे आहे. पण गेल्या तीन वर्षात तिला सुमारे २८ हजार कोटींचा नक्त नफा झाला होता. यंदाचा तिचा नफा सुमारे नऊ हजार कोटींच्या घरातला आहे. मालक म्हणून हा नफा सरकारलाच मिळत होता. बँक तोट्यात असताना तिच्यात सरकारने व एलआयसीने तो भरून काढण्यासाठी बरेच नवीन भांडवल टाकले होते. त्यामुळेच ही बँक फायद्यात येऊ शकली होती. आता इथून पुढच्या काळात आपणच गुंतवलेल्या भांडवलावरच्या नफ्याचा लाभ घेण्याची वेळ आली तेव्हा ही बँक विकली जात आहे. म्हणजे तोट्याचे मालक सरकार आणि फायद्याचे मालक खासगी धन्नासेठ असा हा व्यवहार आहे, मोदी सरकार स्वतःच्या हाताने ही दुभती होऊ लागलेली गाय दुसऱ्यांच्या गोठ्यात नेऊन बांधत आहे.

## नेहरुंची दूरदृष्टी

आयडीबीआय ही इतर सामान्य व्यापारी बँकांहून वेगळी होती. तिची स्थापना १९६३ साली झाली. सामान्य माणसाला घर किंवा स्कूटर वा कार खरेदीसाठी लागणारे कर्ज आणि उद्योगधंदे उभारण्यासाठी लागणारे कर्ज यात बराच फरक असतो. सामान्य माणसाच्या कर्जाचा आकार लहान असतो. शिवाय त्याच्या वेतनातून वा उत्पन्नातून अमुक हप्त्यांमध्ये त्याची परत फेड होईल अशी हमी असते. उद्योगांना यंत्रसामग्री, जमीन, कारखाने उभारणी इत्यादींसाठी शेकडो कोटींच्या भांडवलाची गरज असते. शिवाय त्याची परतफेड तातडीन सुरू करणे शक्य नसते. उत्पादन सुरू झाल्यानंतरच ही परतफेड होऊ शकते. शिवाय या सगळा व्यवहार बाजारात त्या उद्योगाचे उत्पादन खपण्यावर अवलंबून असतो. ते खपले नाही तर कर्ज फेडण्यात अडचणी येतात. म्हणजे जोखीम मोठी असते. अशा मोठ्या जोखमीच्या औद्योगिक कर्जांचे व्यवहार नेहमीच्या बँका करू शकत नाहीत. त्यांच्याकडे अशी कर्जे देण्याइतके पैसे नसतात आणि कोणत्या उद्योगांना कोणत्या अटीशर्तींवर आणि किती कर्जे द्यायला हवीत हे ठरवण्याचे विशेष तांत्रिक ज्ञान नसते. थोडक्यात अशी मोठी कर्जे देणे हा एक विशेष किंवा स्पेशलाईज्ड व्यवसाय आहे. त्याला डेव्हलपमेंट बँकिंग म्हणतात. पंडित नेहरूंच्या काळात आयडीबीआय आणि आयसीआयसीआय या दोन बँकांची स्थापना या डेव्हलपमेंट बँकिंगसाठी करण्यात आली. टाटा, बिर्ला, अंबानी यासह सर्व बड्या उद्योगांचे मोठमोठे प्रकल्प या बँकांनी दिलेल्या कर्जांच्या आधारानेच आकाराला आले आहेत. त्यामुळे राष्ट्र उभारणीच्या कामात या बँकांचे मोठे योगदान आहे. १९९१ मध्ये उदारीकरण झाल्यानंतर अशा बँकांमध्ये सरकारी मालकी ठेवण्याची गरज नाही असे मत पुढे आले. वाजपेयी सरकारने त्यावर शिक्कामोर्तब केले आणि या दोन प्रमुख बँका इतर कोणत्याही व्यापारी बँकांप्रमाणे सामान्य ग्राहकांची खाती उघडून घेऊ लागल्या व घरकर्जे घ्या म्हणून त्यांच्या मागे लागू लागल्या.

## परदेशी मालकांच्या दावणीला

मधल्या काळात आयडीबीआयने विजय मल्ल्या, व्हिडिओकॉन वगैरेंना दिलेली कर्जे बुडाली व बँक संकटात आली. २०१५ च्या दरम्यान या बँकेचे बुडित कर्जांचे प्रमाण २० टक्क्यांवर गेले होते. त्यामुळे ती विकून टाका असा ओरडा होऊ लागला. पण मल्ल्या, धूत, नीरव मोदी इत्यादी कर्जबुडव्यांनी स्टेट बँकेपासून सर्वच बँकांना चुना लावला आहे. आता खासगी क्षेत्रात असलेल्या आयसीआयसीआय बँकेच्या माजी प्रमुख चंदा कोचर यांनी भानगडी केल्यामुळे त्यांना तुरुंगात जावे लागले. एक्सिस बँक किंवा एचडीएफसी बँकेतही असे प्रकार घडले आहे. या बँकांतून अनेक वरिष्ठांनी अलिकडे राजीनामे दिले. त्यामुळे कर्जे बुडणे वा भानगडी होणे हे सार्वत्रिक आहे. सरकारी बँकांमध्ये ते ठळकपणे समोर येते इतकेच. मुद्दा असा की, आयडीबीआय अशा भानगडींमधून बाहेर पडून आता रुळावर येत असतानाच तिला विकून टाकले जात आहे. त्यामुळे सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायले हवे. आयडीबीयचे डेव्हलमेंट बँक हे स्वरुप बदलून तिला कमर्शियल किंवा व्यापारी बँक करण्याचा उद्योग वाजपेयी सरकारने केला. त्यावेळी तेव्हाचे अर्थमंत्री जसवंतसिंग यांनी संसदेत असे आश्वासन दिले होते की कोणत्याही स्थितीत या बँकेतील सरकारची मालकी संपवली जाणार नाही व तिचे खासगीकरण केले जाणार नाही. आता मोदी सरकारने आपल्याच पूर्वसुरींचे हे आश्वासन मोडून टाकले आहे. यामध्ये दुसरी एक शंका व्यक्त केली जात आहे. आपल्या सध्याच्या कायद्यानुसार देशातील खासगी उद्योगपतींना बँकांची मालकी घेता येत नाही. पण अदानीसाठी मोदी सरकार कोणत्याही थराला जाऊन नियमात बदल करत असते. विमानतळाचे व्यवस्थापन करीत असलेल्यांना विमान कंपनी चालवता येणार नाही असा पूर्वीचा नियम होता. पण आता त्यातही बदल करायचे किंवा तसा नियम नव्हताच असे सांगण्याचे चालू आहे. ते अदानीसाठीच आहे असे म्हणतात. त्याच धर्तीवर सरकारी बँका अदानीशेठला नजराणा म्हणून पेश करण्याची पूर्वतयारी तर सध्या चालू नाही ना अशी शंका सध्या घेतली जात आहे. आयडीबीआयची मालकी उद्या फेअरफॅक्सकडून अदानी किंवा तत्समांकडे उघड वा छुप्या रीतीने जाईल अशी त्यातली उपशंका आहे. व्यापारी बँका पैशाला पासरी आहेत. पण डेव्हलपमेंट बँका कमी आहेत. खासगी क्षेत्रात तर अजूनही अपवादात्मकच आहेत. एकीकडे आत्मनिर्भर भारत असा नारा द्यायचा आणि दुसरीकडे उद्योगांना कर्जे देणाऱ्या आपल्याच एका जुन्या बँकेला परदेशी खासगी कंपनीला विकून टाकायचे हा मोदी सरकारचा उफराटा व्यवहार आहे. आता या बँकेतले निर्णय हे परदेशी मालकांच्या हितांना लक्षात घेऊन व त्यांना भरपूर लाभांश मिळावा या उद्देशाने घेतले जातील. त्यात भारताच्या अर्थव्यवस्थेचा विचार किती असेल हे सांगणे कठीण आहे.

**विचार**

# इथेनॉल उद्योग धोरणात्मक कोंडीत

***देशाला हरित ऊर्जेकडे नेणारा आणि परकीय चलनाची अब्जावधींची गळती रोखणारा इथेनॉल प्रकल्प हा भारताच्या भविष्यासाठी अत्यंत गरजेचा आहे; मात्र उत्पादित होणाऱ्या प्रत्येक थेंबाला बाजारपेठ मिळवून देणे आवश्यक आहे. धोरणात्मक समन्वयाच्या अभावामुळे ही हजारो कोटींची गुंतवणूक बुडाली, तर हा देशाच्या हरित ऊर्जा संकल्पावरच आघात ठरेल. शासनाने या धोरणातील 'स्पीड ब्रेकर' तातडीने बाजूला करायला हवेत.***



प्रा.अशोक ढगे

भारताच्या कृषी-औद्योगिक अर्थकारणाला नवी दिशा देणारा, शेतकऱ्यांना समृद्धीचा नवा मार्ग दाखवणारा आणि कच्च्या तेलाच्या आयातीवरील परकीय चलन वाचवणारा 'हुकमी एक्का' म्हणून देशात इथेनॉल निर्मितीकडे पाहिले गेले. साखर उद्योगाला साखरेच्या जागतिक चढ-उतारांवरून बाहेर काढून ऊर्जानिर्मितीच्या स्थिर व्यासपीठावर आणण्याचा केंद्र सरकारचा मानस नक्कीच स्वागतार्ह होता. याच धोरणात्मक प्रेरणेतून देशभरात विशेषतः महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि बिहारमध्ये इथेनॉलच्या अत्याधुनिक डिस्टिलरीजचे जाळे वेगाने उभारले गेले. साखर कारखान्यांनी कोट्यवधी रुपयांची कर्जे काढून विस्तार केला, धान्य-आधारित नव्या प्रकल्पांनी देशात कोट्यवधींची गुंतवणूक ओतली; परंतु गेल्या काही महिन्यांमध्ये या स्वप्नवत वाटणाऱ्या क्षेत्राला धोरणात्मक धरसोडीचे तीव्र ग्रहण लागले आहे. उत्पादनाची क्षमता अवाढव्य वाढली; मात्र प्रत्यक्ष खरेदीचे गणित आणि मागणीचा वेग त्या प्रमाणात टिकून राहिला नाही. परिणामी, कोट्यवधी लिटर इथेनॉल टाक्यांमध्ये पडून सडण्याची वेळ आली असून, बँकांचे हप्ते थकल्याने संपूर्ण उद्योगच आज गंभीर आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर उभा ठाकला आहे. इथेनॉल मिश्रणाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरकारने दिलेल्या सबसिडी आणि सवलतीच्या कर्जांमुळे देशात डिस्टिलरी क्षमतेचा अभूतपूर्व स्फोट झाला. मात्र या वाटचालीपुढे नवी आव्हाने उभी ठाकत आहेत.

आज देशातील इथेनॉल निर्मितीची स्थापित क्षमता सुमारे १,५०० ते १,६०० कोटी लिटरच्या घरात जाऊन पोहोचली आहे. साखर कारखान्यांच्या मळी-आधारित क्षमतेने सुमारे एक हजार कोटी लिटरचा टप्पा गाठला, तर उर्वरित ६०० ते ७०० कोटी लिटर क्षमता ही मका, निकृष्ट दर्जाचा तांदूळ आणि इतर धान्यांवर आधारित नवीन प्लांटद्वारे निर्माण झाली. उत्पादनाचा आलेखही वेगाने उंचावला. २०१३-१४ मध्ये जेमतेम ३८ कोटी लिटर असलेले उत्पादन २०२३-२४ पर्यंत ५०० कोटी लिटरच्या पुढे गेले आणि देशाने सरासरी १२ ते १५ टक्के मिश्रणाचा टप्पा गाठून दाखवला; परंतु या विस्तारामागे असणारा समतोल मात्र बिघडला. सरकारने उभारणीला गती दिली; मात्र तयार झालेल्या इथेनॉलचा उपसा करण्याची यंत्रणा त्या वेगाने विकसित होऊ शकली नाही. आज प्रत्यक्ष उत्पादन क्षमता कागदावर प्रचंड असली, तरी प्रत्यक्ष मागणी आणि पुरवठ्यातील विसंगतीमुळे शेकडो डिस्टिलरीजना आपले उत्पादन ३० ते ४० टक्क्यांनी कमी करावे लागले आहे. इथेनॉलची एकमेव आणि सर्वात मोठ्या ग्राहक म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील ऑइल मार्केटिंग कंपन्या. या कंपन्यांकडून जाहीर होणाऱ्या कोट्यानुसार इथेनॉल उत्पादक पुरवठा करतात. विसंगती अशी, की देशात निर्माण झालेली इथेनॉल उत्पादन क्षमता आणि तेल कंपन्यांची प्रत्यक्ष सामावून घेण्याची क्षमता यात प्रचंड तफावत निर्माण झाली आहे.

पेट्रोलमध्ये १५ टक्क्यांपर्यंत मिश्रण पोहोचले, तरीही संपूर्ण देशाची वार्षिक इथेनॉल मागणी साधारण ६०० ते ६५० कोटी लिटरच्या आसपास मर्यादित राहते. जर २० टक्के मिश्रणाचा टप्पा संपूर्ण देशात गाठला, तरीही वार्षिक मागणी साधारण ९०० ते १,००० कोटी लिटरच्या पुढे जात नाही. म्हणजेच, सध्या अस्तित्वात असलेल्या एकूण क्षमतेपैकी ५०० ते ६०० कोटी लिटर क्षमतेसाठी देशात कोणतीही देशांतर्गत मागणीच उपलब्ध नाही. या अतिरिक्त क्षमतेचा आणि पुरवठ्याचा थेट फटका कारखान्यांना बसला आहे. महाराष्ट्रातील आणि उत्तर प्रदेशमधील अनेक साखर कारखान्यांच्या साठवणूक टाक्या इथेनॉलने तुडुंब भरल्या आहेत. तेल कंपन्यांच्या डेपोमध्ये साठा ठेवण्यासाठी जागा नाही. पुरवठ्याचे वेळापत्रक विस्कळीत झाले आहे आणि नवीन खरेदीचे आदेश संथ गतीने येत आहेत. ज्वलनशील उत्पादन असल्याने ते वर्षानुवर्षे टाक्यांमध्ये सुरक्षित ठेवणे कारखान्यांसाठी धोक्याचे आणि अतिशय खर्चिक बनले आहे. या संपूर्ण संकटाची सर्वात भीषण बाजू आर्थिक आहे. केंद्र सरकारच्या 'इथेनॉल इंटरेस्ट सबव्हेंशन स्कीम'वर (व्याजसवलत योजना) विश्वास ठेवून देशभरातील साखर कारखान्यांनी आणि स्वतंत्र उद्योजकांनी कोट्यवधी रुपयांची कर्जे काढली. एका ५० ते १०० केएलपीडी क्षमतेच्या प्रकल्पासाठी किमान ५० ते १५० कोटी रुपयांचे भांडवल लागते. खासगी आणि सहकारी बँकांकडून हा निधी उभारला गेला.

आज उत्पादित इथेनॉलची वेळेत विक्री न झाल्याने कारखान्यांचे शेकडो कोटी रुपये टाक्यांमध्ये अडकून पडले आहेत. प्रकल्पांसाठी घेतलेल्या कर्जांचे हप्ते सुरू झाले आहेत. उत्पन्न ठप्प असताना मासिक कोट्यवधींचे व्याज भरणे व्यवस्थापनाला अशक्य होत आहे. अनेक स्वतंत्र डिस्टिलरी प्रकल्प दिवाळखोरीच्या मार्गावर असून त्यांच्या खात्यांवर 'अनुत्पादित मालमत्ता' (एनपीए) म्हणून शिक्का बसण्याची वेळ आली आहे. धान्य उत्पादक शेतकरी किंवा मका पुरवठादारांचे पैसे थकल्यामुळे स्थानिक पुरवठा साखळीमध्ये अविश्वासाचे वातावरण तयार झाले आहे. ज्या प्रकल्पांना कारखान्यांची 'कमावती मुले' म्हटले जात होते, तेच प्रकल्प आज त्यांच्या गळ्यातील आर्थिक फास बनताना दिसत आहेत. या संकटाला बाह्य कारणांपेक्षा सरकारी धोरणातील टोकाची अनिश्चितता अधिक कारणीभूत ठरली आहे. उसाचे उत्पादन भरपूर होते, तेव्हा साखरेचे रूपांतर इथेनॉलमध्ये करण्यास प्रोत्साहन दिले जाते; मात्र २०२३ च्या अखेरीस देशांतर्गत साखरेचे दर वाढण्याची भीती निर्माण झाली, तेव्हा सरकारने एका रात्रीत 'ऊस रस' आणि 'बी-हेवी मोलासेस'पासून इथेनॉल बनवण्यावर अचानक बंदी किंवा कठोर मर्यादा लादल्या. या निर्णयामुळे कारखान्यांचे संपूर्ण आर्थिक नियोजन कोलमडले. ज्या कारखान्यांनी उसाच्या रसावर चालणारी कोट्यवधींची युनिट्स उभारली होती, ती अचानक बंद पडली. नंतर धोरणात किंचित शिथिलता आणली गेली खरी; परंतु अशा धरसोडीच्या धोरणांमुळे उद्योगातील विश्वासार्हता नष्ट झाली.

धान्यआधारित डिस्टिलरीजसाठी सुरुवातीला 'एफसीआय'चा निकृष्ट तांदूळ देण्याचे मान्य करण्यात आले. नंतर ते अचानक बंद करून मक्यावर अवलंबून राहण्यास सांगण्यात आले. मक्याचे बाजारभाव अचानक कडाडल्याने उत्पादन खर्च वाढला आणि सरकारने दिलेला इथेनॉलचा खरेदी दर अपुरा पडू लागला. 'दीर्घकालीन शाश्वत धोरण' नसणे ही या क्षेत्राची मुख्य शोकांतिका ठरली. केंद्र सरकारने पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट २०२५-२६ पर्यंत पूर्ण करण्याचा संकल्प सोडला होता; मात्र ई-२० च्या पुढे काय, हा प्रश्न आता धोरणकर्त्यांसमोर यक्षप्रश्न बनून उभा राहिला आहे. सध्या रस्त्यावर धावणाऱ्या बहुतांश जुन्या दुचाकी आणि चारचाकी गाड्या या कमाल १० ते १५ टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलसाठी अनुकूल आहेत. २० टक्क्यांपेक्षा जास्त मिश्रणाचा वापर केल्यास वाहनांच्या इंजिनमधील रबर, प्लास्टिक आणि काही धातू खराब होण्याचा धोका तज्ज्ञ व्यक्त करतात. ब्राझीलसारख्या देशात ८० टक्क्यांहून अधिक गाड्या फ्लेक्स-फ्युएलवर धावतात, जिथे शंभर टक्के इथेनॉलही वापरता येते. भारतात मात्र वाहन उत्पादक कंपन्यांनी 'फ्लेक्स-इंधन' वाहने मोठ्या प्रमाणावर बाजारात आणण्यास अपेक्षित उत्साह दाखवलेला नाही. अशा वाहनांवर आकारला जाणारा जीएसटी आणि ग्राहकांची अनास्था यावर अजूनही ठोस मार्ग निघालेला नाही. देशातील पेट्रोल पंपांवर शंभर टक्के इथेनॉलचे स्वतंत्र पंप किंवा स्वतंत्र वितरण वाहिन्यांची व्यवस्था अजूनही प्राथमिक अवस्थेत आहे.

थोडक्यात सांगायचे, तर कारखाने इथेनॉल तयार करण्यास सक्षम आहेत; परंतु देशातील इंजिने आणि पेट्रोल पंप ते सामावून घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे 'ई-२०'च्या टप्प्यावर पोहोचताच भारताचा इथेनॉल प्रवास एका अदृश्य भिंतीला धडकून थांबला आहे. इथेनॉलमधील मंदीचा थेट परिणाम देशातील पारंपरिक साखर उद्योगावर होत आहे. खरे तर, इथेनॉलमुळे साखर उद्योगाला एक सुरक्षा कवच मिळाले होते. बाजारात साखरेचे उत्पादन जास्त झाल्यास साखर न बनवता ऊस रस इथेनॉलकडे वळवायचा. त्यामुळे साखरेचे दर कोसळत नाहीत आणि कारखान्यांची रोखता टिकून राहते; परंतु इथेनॉलची खरेदीच थांबल्याने किंवा मर्यादित झाल्याने कारखान्यांना नाईलाजाने संपूर्ण उसाची साखर बनवावी लागत आहे. देशात साखरेचा अतिरिक्त साठा निर्माण झाल्यास साखरेचे दर देशांतर्गत बाजारात घसरतील. कारखान्यांची आर्थिक तरलता संपली, की पहिला फटका ऊस उत्पादक शेतकऱ्याला बसतो. उसाचे पैसे वेळेवर देणे कारखान्यांना अशक्य होईल. त्यामुळे शेतकरी आंदोलनांची ठिणगी पडू शकते. ग्रामीण अर्थव्यवस्था सहकारी साखर कारखानदारीवर अवलंबून असताना कारखाने डबघाईला आल्यास संपूर्ण ग्रामीण पतसंस्था आणि जिल्हा बँकांची अर्थव्यवस्था धोक्यात येऊ शकते. या संकटातून मार्ग काढायचा असेल, तर सरकारला धाडसी पावले उचलावी लागतील. अतिरिक्त इथेनॉल जागतिक बाजारात निर्यात करण्यासाठी तात्काळ धोरण आखले पाहिजे.

**चर्चा आजची**

# स्त्रीशक्तीचा आदरही करा...



अष्टभुजा दुर्गेचे रूप असलेली नारी दिवसरात्र मेहनत करत असते. घराची जबाबदारी संभाळताना, व्यावसायिक जीवनात आणि मातृत्वाची भावना जपताना ती कसलीही कसर करत नाही. ही कर्तव्य पार पाडताना तिला पदोपदी निरनिराळ्या समस्यांना सामोरे जावे लागते. परंतु, चेहऱ्यावर नेहमी गोड हसू ठेऊन ती वावरत असते. एवढं करूनही तिला पुरुषापेक्षा कमीच लेखले जात आहे. नोकरी, व्यवसाय सांभाळून घराला एकत्र बांधण्याचे काम करतानाच घराची आर्थिक स्थितीही ती सावरत असते. याचा तिळमात्रही अहंकार तिच्यामध्ये नसतो. तिच्या या संघर्षासाठी तरी तिचा सन्मान, आदर करायलाच हवा.

अंतरा पारंगे

स्त्रीची एक देवता म्हणून खरंच पूजा केली जाते का? अहो देवता म्हणून पुजणे सोडाच पण तिचा आदर तरी केला जातो का? आजवर सिरीयल, चित्रपट यामधून एक घर सांभाळणारी, नवऱ्याचा हुकूम ऐकणारी, मुलं सांभाळणारी एक दुबळी स्त्री रेखाटली गेली. सासू-सुना, नणंद भावजय याची भांडणे रेखाटली जातात. हे सारे आपण मनोरंजन म्हणून बघत असतो आणि हीच तर खरी शोकांतिका आहे. आणि याहून काही ऐकायला किंवा बघायला मिळते ते कौटुंबिक वादातून तिची हत्या... तिला आजवर सहज असा मान कधी मिळालाच नाही. घरातील लक्ष्मी म्हणून कधी पुजली गेलीच नाही. सध्या सर्वत्र नवरात्री साजरी केली जात आहे. दररोज आरती, पूजन करून देवीची वेगवेगळी रूपं पुजली जात आहेत. नाच गाण्यांतून रात्रभर जागून स्त्री शक्तीचा जागर केला जात आहे. श्रद्धा, रितीरिवाज, परंपरा, संस्कृती म्हणून हे सगळं करणे बरोबर आहे. परंतु, आज स्त्री शक्तीचा जागर करण्याबरोबरच स्त्रीचा सन्मान करणे, तिचा आदर करणेही तितकेच गरजेचे आहे.

आज असे कोणतेही क्षेत्र नाही ज्यात महिलांचा नावलौकिक नाही. हाताला चटके खाऊन चुलीवर जेवण शिजवण्यापासून ते अंतराळात भरारी घेण्यापर्यंतची यशस्वी कामगिरी महिलांनी केली आहे. मात्र यात सगळ्यात मान मिळवण्यासाठी तिला कठोर परिश्रम, अवहेलना, समाजाचा त्रास सहन करावा लागत आला आहे. आजच्या एकविसाव्या शतकात स्त्री-पुरुष समानता असूनही घराच्या वंशाच्या दिव्यासाठी एका पणतीला सहजपणे विझविले जात आहे. कोणत्याही क्षेत्रात कमी न पडणाऱ्या आजच्या स्त्रीला मात्र मनाप्रमाणे जगात येत नाही. तिला जसे हवे तसे स्वातंत्र्य नाही, तिला हवं तिथे मुक्तपणे फिरता येत नाही. कारण बाहेर पडताच तिच्या अब्रूचे लचके तोडणारे असंख्य जण वावरत असतात. आज आपण पाहतो महिलांच्या सुरक्षेसाठी सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले दिसतात. निर्जन जागीच नाही तर गर्दीच्या ठिकाणीही कॅमेरे लावलेले असतात. याचाच अर्थ आजही स्त्री सुरक्षित नाही.

समाजाचा दृष्टिकोन बदलणेही आज खूप गरजेचे झाले आहे. आपण म्हणतो की स्त्रिया सर्व क्षेत्रात पुढे जात आहेत. परंतु, बऱ्याच वेळेला पुढे जाणाऱ्या स्त्रीला मागे खेचण्याचे काम समाजातील काही मंडळी करत असतात. स्वतःच्या हिंमतीवर आपले करियर घडवणाऱ्या महिला खूपच कमी आहेत. कारण त्यांना त्यांच्या घरातून, समाजातून न मिळणार पाठिंबा. बऱ्याच घरातील मंडळी आपल्या मुलींना स्वातंत्र्य देतात. परंतु समाजातील काही लोक येऊन घरच्यांचे कान भरतात. मुलांनी शिकावं, मुली शिकून काय करणार? अशी विचारसरणी बऱ्याच ठिकाणी पाहायला मिळते. त्यांच्या विचारानुसार मुलींना काय तर फक्त संसार करायचा असतो. घर सांभाळायचं असतं. का मुली घराची सर्व जबाबदारी घेऊ शकत नाही का? परंतु हे कळणार कस, कारण त्यांना कधी संधीच दिली जात नाही. मुलींनी प्रत्येक परिस्थितीशी जुळवून घ्यायचं, असं का? आपण जर स्त्री-पुरुष समानता आहे असे मानत असू तर त्याचा अवलंब करणार कधी? मुलींनी मोकळेपणाने बोलले तर ती फटकळ आहे, मुक्तपणे वावरले तर ती बेफिकीर आहे, तिच्यावर घरच्यांचे संस्कार नाहीत असे बोलले जाते. समाजाचा हा दृष्टिकोनच बदलणे आवश्यक झाले आहे. आजही बऱ्याच ठिकाणी महिलेला गृहीत धरले जाते. याची सुरुवात मुलीच्या लहानपणापासूनच होते. ती मुलगी आहे, तिला काही कळतच नाही असे म्हणून निर्णय घेण्याचा तिचा हक्क हिरावला जातो. लहानपणी वडिलांच्या धाकात, तरुणपणी सासरच्यांचा दडपणाखाली आई उतार वयात मुलांच्या भीतीने आयुष्य काढणं राहतात. ही परिस्थिती बरीच बदललेली दिसते. महिला वेगवेगळ्या क्षेत्रात, मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. शिक्षक, वकील, पायलट, डॉक्टर अशा अनेक पदांवर त्या काम करतात.

मात्र याठिकाणी तरी त्या सुरक्षित आहेत का? तर नाही हे उत्तर ठामपणे सांगता येत. फसवणूक, अत्याचार, हत्या अशा अनेक घटनांना या महिला बळी पडलेल्या आपण ऐकतो. जरी ती गृहिणी असली किंवा अन्य कोणत्याही मोठ्या पदावर कार्यरत असली तरीही ती आजही सुरक्षित नाही. कारण एका महिलेकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला नाही. स्त्री शक्ती म्हणून तिचा आदर करणे आवश्यक झाले आहे. रस्त्यावर चालताना, प्रवासात किंवा इतर कोणत्याही ठिकाणी मुलीकडे वाकड्या नजरेने पाहणे, तिच्यावर टीका करणे असे घाणेरडे प्रकार सुरु असतात. अशातच ती जर एकटी असेल तर तिच्याबाबत नको तो प्रकार घडतो. यामुळे मुलींना बाहेर पडणे अशक्य होत आहे. हे प्रकार थांबण्यासाठी एका स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. स्त्रीचा आदर, सन्मान करणे गरजेचे आहे.

**लोकसंसद**

## एशियाड मधील कामगिरीबद्दल क्रीडा मंत्रालयात मंथन होणार

नुकत्याच जपानमध्ये संपलेल्या एशियाड क्रीडा स्पर्धांचा आढावा बैठक आज नवी दिल्ली येथे होत आहे वास्तविक क्रीडा मंत्रालयाने या स्पर्धेसाठी जवळपास ७०० कोटी रुपये गेल्या तीन वर्षात खर्च केले होते. या स्पर्धेत भारताला एकूण ८५ पदकांची कमाई झाली. खेळाडूंची संख्या ५०१ एवढी होती आपणास एकूण २१ सुवर्ण पदके मिळाली. मागील एशियाड स्पर्धेत आपणास एकूण १०६ पदके मिळाली होतीविशेष म्हणजे या सुवर्ण पदकात शेवटच्या दोन दिवसात ११ सुवर्ण पदकांची कमाई झाली. याला तिरंदाजी, बॉक्सिंग. गोल्फर यांची कामगिरी कारणीभूत आहे. या वेळी ऍथलेटिक्स, बॅडमिंटन, शुटिंग, या खेळात एकूण कामगिरी निराशाजनक ठरली. बॅडमिंटन मध्ये केवळ पुरुषांच्याच संघाला एक कांस्यपदक मिळाले. शूटिंग व पिस्तूल प्रकारात कामगिरी अत्यंत खालावलेली होती. यात अलिम्पिक विजेती मनूला पदक मिळाले नाही. ऍथलेटिक्समध्ये केवळ एकाच सुवर्ण पदक मिळाले यात मागील वेळी ६ पदके होती. एकूण पदक पालिकेत भारताचा क्रमांक चौथा होता. केवळ पैसे खर्च केले म्हणजे खेळाडू तयार होतील असे नाही. इतर अनेक देशात अगदी लहान पणापासून खेळाडूवर लक्ष असते त्यांना जागतिक प्रशिक्षकडून वारंवार व सतत प्रशिक्षण दिले जाते. आज आपणाकडे अनेक खेळाडू कडे कौशल्य आहे पण योग्य प्रशिक्षक, याची संख्या खूपच कमी आहे . एक एशियाड स्पर्धा किंवा ऑलिम्पिक स्पर्धा संपली कि पुढच्या स्पर्धेची तयारी पाहिजे. आज अमेरिका, चीन या देशाची तयारी त्या दिशेने चालू असते त्यामुळे त्यांना अलिम्पिक किंवा एशियाड स्पर्धेत वरचे क्रमांक मिळतात आपणास सुद्धा हे शक्य आहे येथील लोक टॅलेन्ट आहेत मेहनत करण्याची तयारी आहे.

-शांताराम वाघ पुणे

**दिनविशेष**

# व्याकरणकार, ग्रंथकार दादोबा पांडुरंग तर्खडकर



दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचा आज स्मृतिदिन. दादोबा तर्खडकर हे अव्वल इंग्रजीतील मराठी व्याकरणकार, ग्रंथकार आणि कळकळीचे धर्मसुधारक होते. त्यांचा जन्म ९ मे १८१४ रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण घरी वडिलांजवळ तसेच खासगी शाळांतून आणि माध्यमिक शिक्षण 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' च्या शाळेत झाले. गुजराती व फार्सी भाषा त्यांना अवगत होत्या. सरकारी नोकरीत शिक्षक, अधीक्षक, उपजिल्हाधिकारी अशा विविध हुद्यांवर त्यांनी काम केले, सेवानिवृत्तीनंतर अल्पकाळ ओरिएंटल ट्रान्स्लेटरच्या हुद्यावर ते होते.

संस्कृत व इंग्रजी भाषांच्या व्याकरणाचे अध्ययन करून आणि मराठी भाषेच्या रूपविचाराची स्वतंत्र प्रज्ञेने व्यवस्था लावून मराठी भाषेचे व्याकरण (१८३६) त्यांनी सिद्ध केले. या व्याकरणाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. १८८१ मध्ये त्यांनी आपल्या व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीची पूरणिकाही प्रसिद्ध केली. विद्यार्थ्यांसाठी शालोपयोगी लघुव्याकरणही (१८६५) त्यांनी लिहिले. त्याच्याही अनेक आवृत्त्या निघाल्या. मोरोपंतांच्या केकावलीवर 'यशोदापांडुरंगी' (१८६५) ही गद्य टीका त्यांनी लिहिली. त्यांचे '१८४६ पर्यंतचे आत्मचरित्र' (१९४७, संपा. अ. का. प्रियोळकर) महत्त्वाचे आहे. अव्वल इंग्रजीतील जवळजवळ एकमेव आत्मचरित्र म्हणून त्यांच्या आत्मचरित्राचे महत्त्व आहे. दादोबांचे जीवन सामाजिक चळवळींशी निगडित झालेले होते. त्यामुळे त्यांच्या आत्मचरित्रात धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय स्थितीचे पडलेले प्रतिबिंबही दिसून येते. त्यायोगे मराठी गद्याला प्रमाणरूप प्राप्त झाले असल्याने ममराठी भाषेचे पाणिनीफ हे रास्त बिरुद त्यांना लावले गेले. वर्ष १८७८ मध्ये त्यांनी लिहिलेल्या स्वीडिश तत्त्वज्ञ स्वीडनबॉर्ग यांच्या ग्रंथावर ''अ हिंदू जंटलमन्स रिफ्लेक्शन्स रिस्पेक्टिंग द वर्क्स ऑफ एमानुएल स्वीडनबॉर्ग' या ग्रंथाची युरोपात प्रशंसा झाली होती. ते पुरोगामी विचारांचे होते. विधवापुनर्विवाहाचे समर्थन करण्यासाठी त्यांनी लिहिलेला ''विधवाश्रुमार्जनफ हा संस्कृत निबंध बाबा पद्मजी यांच्या ''यमुनापर्यटन' या कादंबरीत अंतर्भूत करण्यात आला. मराठी भाषेचे पाणिनींना अभिवादन.

साधी भाषाशैली आणि प्रांजळ निवेदन ही या आत्मचरित्राची काही उल्लेखनीय वैशिष्ट्ये होत. यांशिवाय मराठी नकाशांचे पुस्तक (१८३६), 'इंग्रजी व्याकरणाची पूर्वपीठिका' (१८६०), 'धर्मविवेचन' (१८६८), 'पारमहंसिक ब्राह्मधर्म' (१८८०), अशी विविध प्रकारची त्यांची ग्रंथरचना आहे, तसेच काही मराठी आणि इंग्रजी स्फुट निबंधही त्यांनी लिहिले. ग्रंथलेखनाप्रमाणेच समाजसुधारणेचे कार्यही त्यांनी केले. सरकारी नोकरी करीत असतानाच लोकहिताच्या कार्यात त्यांनी भाग घेतला. दुर्गाराम मनसाराम मेहेता यांनी सुरतला स्थापन केलेली मानवधर्मसभा (१८४४) आणि राम बाळकृष्ण जयकर यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली परमहंस सभा या धर्मसुधारक संस्थांमागे त्यांची प्रेरणा होती. अशा या थोर व्याकरणकाराचे १७ ऑक्टोबर १८८२ रोजी निधन झाले.

# कर्मचाऱ्यांचे भत्ते थकविले

## ■ निवडणूक होऊन अकरा महिने पूर्ण; माथेरान नगरपरिषदेकडून दुर्लक्ष



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम पूर्ण होऊन ११ महिने पूर्ण झाले आहेत. तरी देखील नगरपरिषद प्रशासनाने निवडणुकीच्या कामी सहकार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना दैनंदिन भत्ते दिलेले नाहीत. दरम्यान, माथेरान पालिका निवडणुकीत नियुक्ती करण्यात आलेल्या कर्जत तालुक्यातील महसूल कर्मचारी आणि शिक्षक यांच्यावतीने प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. माथेरान पालिकेने निवडणुकीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे भत्ते ठरविल्याने माथेरान पालिकेने कर्जत तालुक्यातून पायपीट करून जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना गंडावले आहे, अशी चर्चा सुरू झाली आहे.

माथेरान नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा धुरळा २ नोव्हेंबर २०२५ रोजी उडाला. दोन वर्षे उशिरा या निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ वापरण्यात आले. माथेरानमध्ये महसूल अधीक्षक कार्यालयात महसूल विभागाचे केवळ तीन कर्मचारी आहेत. त्यामुळे तत्कालीन निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी माथेरान येथील महसूल अधीक्षक सुरेंद्र सिंह ठाकूर यांनी कर्जत तालुक्यातील तलाठी, मंडळ अधिकारी तसेच जिल्हा परिषद आणि खासगी शाळांचे शिक्षक यांची मदत घेतली. त्या सर्वांची माथेरान नगरपरिषदसाठी रीतसर निवड निवडणूक यंत्रणेसाठी झाली होती. त्या सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या निवासस्थानवरून माथेरान येथे जाऊन प्रसंगी पायपीट करीत जात निवडणुकीचे व्यवस्थापन कार्य कोणत्याही अडथळाविना पूर्ण केले. निवडणूक प्रक्रिया २ नोव्हेंबर रोजी पूर्ण झाली आणि मतदान यंत्र ताब्यात देऊन ही सर्व कर्मचारी रात्री अकरा बारा वाजता माथेरान येथून घरी परतण्यासाठी निघाले.

निवडणुकीत मदत करणाऱ्या त्या सर्व कर्मचारी अधिकारी यांना आजतगत माथेरान नगरपरिषदकडून केलेल्या कामाचा भत्ता दिलेला नाही. त्यामुळे कर्मचारी वर्गामध्ये नाराजी पसरली असून निवडणूक कामासाठी किमान महिनाभर कर्जत तालुक्यातून माथेरानमध्ये पोहोचणारे कर्मचारी यांनी माथेरान नगरपरिषदमध्ये जाऊन भत्ता मागण्याचा प्रयत्न केला. मात्र तेथे पालिका मुख्याधिकारी यांनी या महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांना पळवून लावल्याने अनेक कर्मचारी संतप्त झाले आहेत.

### प्रांत अधिकारी, तहसीलदारांना निवेदन

तब्बल ११ महिन्यानंतर देखील माथेरान नगरपरिषदकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नसल्याने अखेर कर्जत येथे प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन देत भत्ता देण्यासाठी सूचना देण्याची विनंती केली आहे. कर्जत येथे तहसीलदार यांच्या दालनात माथेरान निवडणुकीत काम करणारे मंडळ अधिकारी, अव्वल कारकून, तलाठी, कारकून आणि शिक्षक मुख्याध्यापक यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## कष्टकरी नगर येथे आरोग्य तपासणी शिबीर

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनीतील कष्टकरी नगर येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'क्षयरोगमुक्त भारत १०० दिवस मोहिमे'च्या अनुषंगाने मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचे आयोजन गुरुवारी (दि.१५) कष्टकरी नगर येथील समाज मंदिर हॉलमध्ये भारतीय महाक्रांती सेना, महाराष्ट्र राज्य आरोग्य विभाग, अष्टविनायक फाउंडेशन, अष्टविनायक हॉस्पिटल (मोहोपाडा, रसायनी), जिल्हा क्षयरोग केंद्र रायगड, जिल्हा आरोग्य विभाग आणि ग्रामपंचायत तुराडे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ६२ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या पाच रुग्णांना अष्टविनायक हॉस्पिटल, मोहोपाडा (रसायनी) येथे संदर्भित करण्यात आले.

या शिबिरात नागरिकांची रक्तदाब, रक्तातील साखर आणि ईसीजी यांसह विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय सल्ला देण्यात आला. क्षयरोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेत निदानाचे महत्त्व आणि उपलब्ध उपचार याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

## मोबाईलचा अतिवापर टाळा



### ■ सपोनि भारत फार्णे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**। खांब । प्रतिनिधी ।**

मोबाईल फोनचा अतिवापर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हानिकारक ठरत असून, मोबाईलच्या माध्यमातून होणाऱ्या विविध गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर जपून व गरजेपुरताच करावा. विद्यार्थी जीवनात शिस्तीला अनन्यसाधारण महत्त्व असून, जीवनात यशस्वी होण्यासाठी नियमित अभ्यास, मेहनत आणि एकाग्रता आवश्यक आहे, असे प्रतिपादन कोलाड पो. स्टेशन सहायक पोलीस निरीक्षक भारत फार्णे यांनी केले.

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी पो. अधिकारी नितीन गायकवाड, चेतन कुथे, मुख्याध्यापक दिपक जगताप व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मोबाईलच्या माध्यमातून होणारी फसवणूक आणि इतर गुन्हेगारी प्रकार लक्षात घेता विद्यार्थ्यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. सोशल मीडिया आणि इतर अनावश्यक गोष्टींमध्ये वेळ वाया न घालवता ज्ञान संपादनासाठी आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वेळ द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

जीवनात मोठे यश संपादन करता आले नाही, तरी हरकत नाही; मात्र एक चांगला माणूस आणि जबाबदार नागरिक नक्की बना, असा मोलाचा संदेश सपोनि भारत फार्णे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

## तेजस्विता पाटील यांचे निधन

**। भाकरवड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत श्रीगाव हद्दीतील भाकरवड गावच्या तेजस्विता (कुंदा) जयवंत पाटील यांचे बुधवारी (दि.१३) वयाच्या



५९व्या वर्षी निधन झाले. त्या अत्यंत शांत प्रेमळ स्वभावाच्या होत्या. अतिशय कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय अशी त्यांची ख्याती होती. वकृत्वाच्या जोरावर त्यांनी गावातील सामाजिक अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात नेहमी सूत्रसंचालनाचे काम पाहत होत्या. त्यांच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण भाकरवड परिसरावर शोकांतिका पसरली. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी अध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचे दहावे गुरुवार दि.२२ ऑक्टोबर रोजी ओंकारेश्वर मंदिर दिवलांग येथे, तर तेरावे रविवार दि.२५ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी होणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, मुलगी सोनाली, श्रद्धा, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप



### ■ वाघोशीच्या शिक्षकाचा नवा आदर्श

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा वाघोशी येथील निसर्गप्रेमी शिक्षक जनार्दन भिलारे यांनी आपला वाढदिवस पर्यावरण रक्षणाचा संदेश देत साजरा केला.

आपल्या वाढदिवसानिमित्त भिलारे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना तब्बल ६० रोपांचे वाटप केले. कोलियस, तुती, गवती चहा, सिंघोनियम, लाल ड्रेसिना, जास्वंद, स्पायडर प्लांट यांसारखी विविध शोभिवंत व औषधी रोपे विद्यार्थ्यांना भेट म्हणून देण्यात आली. विशेष म्हणजे ही सर्व रोपे त्यांनी स्वतः शाकीय प्रजननाद्वारे (कटींग पद्धतीने) तयार केली होती. विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम व पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश होता. केवळ रोपे वाटून न थांबता, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी रुजाव्यात, यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला हातरुमाल भेट देण्यात आला. तसेच शालेय पोषण आहारात विद्यार्थ्यांना लाडू देण्यात आले. शाळेच्या परिसरात ४ औदुंबर व १ पिंपळ अशा एकूण ५ वृक्षांची लागवडही यावेळी करण्यात आली. यामुळे शाळेचा परिसर अधिक हिरवागार होणार आहे.

## सिमेंट पाईप कामांमुळे रस्ते बंद



### ■ पनवेलकरांची गैरसोय वाढली

**खांदेश्वर :** पनवेल शहरात विविध ठिकाणी सिमेंटच्या पाईप लाइन्स टाकण्याची कामे सुरू आहेत. या कामांसाठी काही भागांतील रस्ते बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे स्थानिक रहिवाशांसह वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. पनवेलमधील गावदेवी मंदिराकडे जाणारा रस्ता बंद करण्यात आल्याने परिसरातील नागरिकांची गैरसोय होत असून, शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

पनवेल शहरात सध्या ड्रेनेज लाइन तसेच सिमेंट पाईप लाईन्सची कामे विविध ठिकाणी सुरू आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ही कामे आवश्यक असली, तरी ती करताना नागरिकांना कमीत कमी त्रास होईल, याची काळजी घेणे गरजेचे आहे. मात्र, काही ठिकाणी रस्ते बंद केल्यामुळे स्थानिक रहिवाशांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः गावदेवी मंदिराकडे जाणारा मार्ग बंद असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

या परिसरात शाळा असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाताना आणि सुट्टी झाल्यानंतर घरी परतताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. अशा वेळी रस्ते बंद असल्यामुळे पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पालकांच्या मनात चिंता निर्माण होण्याची शक्यता आहे.

सिमेंटच्या पाईप लाईन्स कामांसाठी खोदण्यात आलेले रस्ते, वाहतुकीतील बदल आणि पर्यायी मार्गांची अपुरी व्यवस्था यामुळे नागरिकांच्या दैनंदिन हालचालींवर परिणाम होत आहे.

## आगरी, बेलदार लोकवस्तीत नवरात्रीची धूम

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर गावात नवरात्र उत्सवाची धूम सुरू असून, चिरनेर परिसरात सर्वत्र भक्तिमय वातावरण दिसून येत आहे. या विभागात मोडणाऱ्या कातळपाडा येथील आगरी, बेलदार व अन्य समाज लोकवस्तीतील समाजबांधव एकत्र येत, नवरात्र उत्सव मंडळाची स्थापना २०१०-११ साली केली. यंदा हे मंडळ सोळाव्या वर्षात पदार्पण करीत आहे.

नवरात्र उत्सव मंडळाचे ८० वर्षीय ज्येष्ठ रहिवासी तथा संस्थापक खजिनदार मारुती पांडुरंग रेवसकर यांच्या मार्गदर्शनाखाली रेवसकर



गल्लीत हा आदिशक्तीचा नवरात्र उत्सव मोठ्या दिमाखात व भक्तीमय वातावरणात साजरा होत आहे. या नवरात्र उत्सवाच्या पूर्वतयारीची धावपळ, मेहनत घेण्याचे काम मारुती रेवसकर या वयातही करत आहेत. मंडळाने प्रतिष्ठापना केलेली दुर्गामाता ही वाघावर विराजमान झाली आहे. वाघ हे शक्तीचे व निर्भयतेचे प्रतीक मानले गेले आहे. दरम्यान परिसरातील आगरी बेलदार व येथील विविध समाजाच्या

### ■ ८० वर्षीय मारुती मामांच्या कार्याचे परिसरात कौतुक

नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे धार्मिकतेबरोबर सांस्कृतिक भावनेला रंग चढला असून, भक्तीबरोबर सांस्कृतिक परंपरेचा सुंदर संगम या नवरात्र उत्सवाच्या माध्यमातून अनुभवास मिळत आहे. दरम्यान देवीचा जागरण गोंधळ, देवीची गाणी, ढोलावरची पारंपरिक नृत्य, वेशभूषा असे विविध मनोरंजनाचे खेळ या नवरात्र उत्सवात दररोज सादर होत असल्याची माहिती मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दिली.

**विचारवंत, कवींसह कलावंतांची मांदियाळी** | **साहित्यप्रेमींसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी**

# परिवर्तनवादी साहित्य संमेलनाचे आयोजन

**। छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी ।**

निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन रविवार, दि.१८ ऑक्टोबर रोजी तापडिया नाट्यमंदिर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ.श्रीपाल सबनीस हे संमेलनाध्यक्ष असून, महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. उद्योजक ॲड. रामेश्वर तायडे हे स्वागताध्यक्ष आहेत. साहित्य, सामाजिक परिवर्तन, लोकशाही, संविधान, काव्य आणि प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी या संमेलनातून साहित्यप्रेमींना अनुभवता येणार आहे.

संमेलनाची सुरुवात सकाळी ८ वाजता ग्रंथदिंडीने होणार आहे. महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या औरंगपुरा येथील पुतळ्यापासून ग्रंथदिंडीला प्रारंभ होऊन ती तापडिया नाट्यमंदिरातील महात्मा जोतीबा फुले साहित्यनगरीत पोहोचेल. यावेळी ऑल इंडिया समता सैनिक दलाच्या छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने मानवंदना देण्यात येणार आहे.

या संमेलनात राज्यभरातील कवींचा सहभाग असणार आहे. याशिवाय विविध क्षेत्रांतील साहित्यप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, प्राध्यापक, पत्रकार आणि कार्यकर्त्यांचा समावेश असलेली संयोजन समिती संमेलनाच्या यशस्वितेसाठी प्रयत्नशील आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनवादी विचारांची साहित्यिक अभिव्यक्ती यांना केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनात साहित्यिक, कवी, विचारवंत, कलावंत आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संमेलनाचे मुख्य आयोजक तथा दैनिक निळे प्रतीकचे संपादक रतनकुमार साळवे यांनी केले आहे.

### लोकशाहीसमोरील आव्हानांवर परिसंवाद

दुपारी २ वाजता लोकशाहीसमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाय या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. साहित्यिक व समीक्षक डॉ. ऋषिकेश कांबळे हे परिसंवादाचे अध्यक्षस्थान भूषवतील. ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, व्याख्याते प्रा. सुधीर अनवले आणि सुप्रसिद्ध व्याख्यात्या मनीषा तोकले हे सहभागी होणार आहेत. श्रावण कोळनूरकर सूत्रसंचालन करतील, तर रत्नाकर खंडागळे आभार मानतील.

### उद्घाटन सत्रात मान्यवरांची उपस्थिती

सकाळी १० वाजता उद्घाटन सत्र होणार आहे. या सत्रात संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, उद्घाटन संजय शिरसाट आणि स्वागताध्यक्ष ॲड. रामेश्वर तायडे यांच्यासह ॲड. धनंजय बोरडे, नाट्यकलावंत प्रदीप आडगावकर, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त बालाजी सोनटक्के, मुख्य लेखाधिकारी संतोष वाहुळे, अधीक्षक अभियंता एस. एस. भगत, मनपा उपायुक्त नंदकिशोर भोंबे, कवी व सामाजिक कार्यकर्ते इंजि. राजधर दांडगे आणि उद्योजक चेतन राऊत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## निवडक



### स्वामी समर्थ ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

**अलिबाग :** अभिजात मराठी भाषा दिन आणि डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त चेंढरे येथील स्वामी समर्थ सार्वजनिक ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी 'तिमिरातुनी तेजाकडे' या पुस्तकाच्या लेखिका स्वाती संजय कुलकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. स्वाती कुलकर्णी यांनी स्वतःच्या आजारावर मात करत आनंदी वृत्ती जागृत ठेवून कौटुंबिक वातावरण बिघडू न देता केलेला प्रवास म्हणजेच हे पुस्तक असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी वाचनाचे महत्त्व विशद केले. डॉ. सुवर्णा पाटील यांनी 'आरोग्य हीच संपत्ती' या विषयावर विचार मांडले. प्रारंभी ज्योती आमले यांनी प्रमुख पाहुण्या स्वाती कुलकर्णी व सुवर्णा पाटील यांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. अदिती धाट, रजनी लिगाडे, माधवी खराडे, अनुराधा गुळवणी, वृंदा मोकल, महानंदा भोसले यांच्यासह बहुसंख्य वाचक उपस्थित होते.

### सुवर्ण महोत्सवानिमित्त रक्तदान शिबीर

**मुंबई :** मिरा रोड (पूर्व) येथील पेणकरपाडा विभागातील आई निर्बादेवी सार्वजनिक नवरात्र उत्सव यंदा सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. यंदा या उत्सवाचे ५० वे वर्ष असून १९७६ पासून हा उत्सव अविरतपणे सुरू आहे. मिरा रोडच्या पेणकरपाडा येथील निर्बादेवी युवा मित्र मंडळाने देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली असून 'पेणकर पाड्याची माऊली' अशी देवीची ओळख आहे. गेल्या पन्नास वर्षांपासून मंडळाने सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक, शैक्षणिकसह विविध उपक्रम सातत्याने राबवले आहेत. या सुवर्ण महोत्सवानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत निर्बादेवी युवा मित्र मंडळ व सक्षम युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर रविवार, दि.१८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत आई निर्बादेवी मंदिर पटांगण, पेणकरपाडा येथे होणार आहे. या शिबिरात सर्व वैद्यकीय सुविधा, डॉक्टर व अधिकृत रक्तपेढीचे पथक उपलब्ध असणार आहे. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून या समाजसेवी उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.





### तळा बाजारपेठेत पार्किंगचा बोजवारा

**तळा :** तळा बाजारपेठेत खासगी वाहनधारकांच्या बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला आहे. भर बाजारपेठेत वाहने आडवी-तिडवी लावली जात असल्याने नागरिकांना भर उन्हात ताटकळत त्रास सहन करावा लागत आहे. सध्या नवरात्र उत्सव सुरू असल्याने बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची मोठी वर्दळ आहे. त्यातच चारचाकी आणि दुचाकी चालकांकडून कोठेही वाहने पार्क केल्याने मुख्य रस्त्यावरच कोंडी होत आहे. महिला, शालेय विद्यार्थी आणि वृद्धांना या कोंडीतून वाट काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. या गंभीर समस्येकडे तळा पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. नवरात्र काळात विशेष वाहतूक नियोजन करण्याची गरज असताना कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करून बाजारपेठेतील वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.



(छायाचित्र – संजय गायकवाड)

### कर्जत मेडिकल असोसिएशनला ३१ वर्षे पूर्ण

**कर्जत :** १९९५ मध्ये स्थापन झालेल्या कर्जत तालुक्यातील डॉक्टरांच्या संघटनेला ३१ वर्षे पूर्ण झाली. सध्याचे अध्यक्ष डॉ. प्रशांत गांगल, सचिव डॉ. महेश शिरसाट, खजिनदार डॉ. राहुल ओसवाल, उपाध्याक्ष डॉ.रितेश जैन, डॉ. गणेश मेंगाळ, संपादक डॉ. कुमार ओसवाल, सहसंपादक डॉ. विकास गोमारे आणि सर्व कार्यकारिणी समितीने संस्थेच्या पूर्वीच्या १९ अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. स्थापनेपासून पहिली पाच वर्षे डॉ. मनोहर साबणे यांच्या अध्यक्षतेखाली ३६ सदस्यांना घेऊन सुरू झालेली ही संस्था आता जगभरात नावारूपाला आली आहे. कर्जत तालुका आणि पंचक्रोशीतील सर्व पॅथीचे डॉक्टर यामध्ये सहभागी झाले आहेत. सुरुवातीच्या स्थापनेच्या काळात सचिव असणारे डॉ. निळकंठ फडके, रायगडचे माजी अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी, डॉ. श्रीकांत डहाके, डॉ. बी.जी.लाड, डॉ. प्रेमचंद जैन, डॉ. सुहास शितुत, डॉ. शर्वाणी कुलकर्णी, डॉ. गणेश साळुंखे, डॉ. प्रभाकर काळे इत्यादी माजी अध्यक्ष आणि याबरोबर सर्व कर्जत, नेरळ, चौक, कशेळे, कडाव येथील इतर अनेक मान्यवर डॉक्टर यावेळी उपस्थित होते. कर्जतमधील युवा डॉक्टर सहभागी झाल्याने सदस्यांची संख्या आता १६०च्यावर गेली आहे. विविध समाजोपयोगी उपक्रम, संपूर्ण शाकाहारी जेवण, सभासदांसाठी वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक ज्ञान मिळण्यासाठी विविध सभांचे आयोजन, क्रीडा स्पर्धा असे अनेक उपक्रम राबविण्यात येतात. मागील वर्षी डॉ. आशुतोष कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण रायगडचे यजमानपद यशस्वीरित्या कर्जत मेडिकल असोसिएशनने राबविले. यापुढेही असेच अविरत काम करत राहू, असे आश्वासन अध्यक्ष डॉ. प्रशांत गांगल यांनी दिले.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**कु. अमोघ देवकर,**
**वाढदिवस अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी, मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सर्वे नं. २६/४ प्लॉट नं.१ वरील प्रज्योत गृहआरंभ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, या इमारतीतील चौथ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ४०३ जिचे चटई (कार्पेट) क्षेत्र ३७९.०५ चौरस फूट (३५.२१५ चौ.मी.) या मिळकतीचे चेंढरे ग्रामपंचायत दप्तरी मालमत्ता क्र. १७७७/७ असे वर्णन आहे, अधिक पार्किंग क्रमांक ३ क्षेत्र १०.३५ चौ.मी. सहची मिळकत तिचे विद्यमान मालक स्मिता सचिन जोशी, यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे ठरविले आहे व तसा नोंदणीकृत करार करणेत आला आहे. वर नमूद मिळकतीच्या विद्यमान मालकांनी ती मिळकत निर्वेध असल्याची खात्री दिली आहे. तरी, सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकाव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे, कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख : - १६.१०.२०२६.

**(अॅड. संदेश जगन्नाथ म्हात्रे)**
कार्या. अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा,
बीचरोड, अलिबाग, जिल्हा रायगड.

## पनवेल महानगरपालिका

**पाणी पुरवठा विभाग**
**जाहीर आवाहन**

दिनांक :- १५/१०/२०२६

गतवर्षी अल-निनोच्या प्रभावामुळे कमी प्रमाणात पाऊस झालेला आहे. पाऊस पुरेसा प्रमाणात न झाल्यामुळे पावसाळ्याच्या कालावधीमध्ये सुध्दा पाणी टंचाई निर्माण झालेली होती. या पार्श्वभूमीवर दिनांक ०५/१०/२०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने अल-निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील उपलब्ध जलसाठ्यांचे दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत काटकसरीने, प्राधन्यक्रमाने व नियोजनबध्द पध्दतीने व्यवस्थापन करून पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता निश्चित करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे दि.३१/०८/२०२७ पर्यंत नियोजन करण्याचा प्रस्ताव निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार महानगरपालिकेने उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करुन पाणी गळती कमी करण्यासाठी विशेष मोहिम राबवावी, असे नमूद आहे.

पनवेल महानगरपालिकेस विविध स्त्रोतातून पाणी पुरवठा होतो. त्यामधील उपलब्ध पाणीसाठा भविष्यात पाणी टंचाई निर्माण होऊ नये करिता काटकसरीने व जपून वापरण्याचे नियोजन आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना खालील प्रमाणे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

- पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर जपून व काटकसरीने करावा.
- पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळावा.
- वाहने धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करु नये. तसे आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- घरातील व संकुलामधील पाण्याच्या साठवण टाक्या भरुन वाहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.
- घरातील पाण्याच्या नळाची गळती असल्यास तातडीने दुरुस्त करुन घ्यावी. गरज नसताना पाण्याचे नळ चालू रहाणार नाही याची दक्षता घ्यावी.
- घरामध्ये साठवून ठेवलेले पाणी शिळे झाले असे समजून ओतून देण्यात येऊ नये.
- शहरातील तरण तलावासाठी पिण्याच्या वापर करण्यात येऊ नये, तसे आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- बांधकाम प्रकल्पाला कामगारांना पिण्यासाठी देण्यात आलेल्या नळजोडणींच्या पाण्याचा वापर फक्त कामगारांना पिण्यासाठी होईल याची काळजी घ्यावी. त्या व्यतिरिक्त बांधकामासाठी वापर आढळल्यास विनाकल्पना नळजोडणी खंडीत करुन दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- वरीलप्रमाणे शहरातील नागरिकांनी पिण्याचा पाण्याचा वापर करण्याच्या दृष्टीने दक्षता घेऊन पाण्याचा जपून व काटकसरीने वापर करावा आणि पनवेल महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

**(मंगेश चितळे)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे विचुंबे, ता. पनवेल, जि रायगड येथील खालील व्यक्तीचे नावे असलेले ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची खालील वर्णनाची बिनशेत जमिन आमचे आशिलांनी विकसन कराराने घेण्याचा विचार केलेला आहे.

**बिनशेत जमिन मिळकतीचे वर्णन मौजे विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड**

| कब्जेदाराचे/मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ चौ.मीटर | आकार रूपये |
|---|---|---|---|---|
| १. श्री.विकास जगन्नाथ मुंगाजी<br>२. श्री.ऋत्विक विकास मुंगाजी<br>३. श्री. हिमांशु विकास मुंगाजी | १४४ | ०२ | ३१० चौ.मी. | ३१.०० |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर सक्षम येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकती चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- १६/१०/२०२६ सही/-

**अॅड. प्रताप आर. पाटील,**
शॉप नं.०१, श्रीगणेश मुरारी,
प्लॉट नं.३५/१३१, सेक्टर - १०
नविन पनवेल पूर्व, जि.रायगड
मो. ९३२२०२७७५७

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने आमचे अशिल श्री. मनोहर पुंडलिक माळी, रा. कल्याण या जाहिर नोटिसाने कळवितात की, खालील वर्णनाची सदनिका मुळची महेंद्र महादेव पाटील व मंदाकिनी महेंद्र पाटील यांच्या मालकीची आहे. कै.महेंद्र महादेव पाटील यांच्या मृत्युपश्चात म्हात्रे हे त्यांचे वारस मंदाकिनी महेंद्र पाटील, निलिमा महेंद्र पाटील, पियुष महेंद्र पाटील, अ.पा.क. आई व आशा महादेव पाटील यांनी खाली नमुद केलेली सदनिका, विक्री व्यवहार काढली, सदरची सदनिका आमचे अशिलाने बँकेच्या तारणासहित खरेदी करण्याची इच्छा दर्शवुन उभयतांमध्ये दि.१५/१०/२०२६ रोजी साठेखत झालेला आहे व आमचे अशीलांनी मालकांना बयाणादेखील अदा केलेला आहे. व सदरचा संपुर्ण व्यवहार नोंदणीकृत दस्ताने प्रस्तुतीच्या जाहिर नोटिसीपासून ३१ डिसेंबर २०२६ पर्यत व्यवहार पुर्ण करण्याचे उभयतांनी निश्चित केलेले आहे. नोंदणीकृत दस्त नोंदवण्यापुर्वी खाली नमुद केलेल्या सदनिकेसंबंधी कोणाचेही कसलीही हरकत लेखी दस्ताऐवजासहित व पुराव्यासहित खाली नमुद केलेल्या वकिलांकडे प्रस्तुतीची नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या मुदतीत हरकतदाराने आपापल्या हरकती लेखी पुराव्यासहित हरकती वकिलांकडे नोंदवाव्या. मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदरची सदनिका ही पुर्णपणे निर्वेध, बोजाविरहित आहे असे गृहित धरून उभयते व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णनः पेण नगरपरिषदेच्या हद्दीतील मौजे पेण, ता. पेण येथील सि.स.नं. १८७८ या मिळकतीवर बांधीत असलेल्या आनंद तरंग या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील नकाशामध्ये दाखविल्याप्रमाणे निवासी गाळा नं. २०३, कारपेट क्षेत्र ९४.६६ चौ.मी., लागून बाल्कनी क्षेत्र १२.५३ चौ.मी., कपाटासाठी क्षेत्र १.८० चौ.मी., असे एकूण वापरायोग्य कारपेट क्षेत्र १०८.९९ चौ. मी. व निवासी गाळ्यालागून असलेला पोर्च/टेरेस ४.१० चौ.मी. त्यास पेण नगरपालिका घर नं. PEN00020188(11/नविन B.N-203 Ward No.11,Zone No.2) हा या जाहिर नोटिसीचा विषय आहे.

ठिकाण-पेण
दिनांक-१७/१०/२०२६

**अॅड.नरेंद्र हस्तीमल बाफणा**
c/o नरेंद्र क्लॉथ स्टोअर्स
लालबहाद्दुर शास्त्री मार्ग, पेण रायगड
मोबा. ९०२८६७६००३
adv bafna@yahoo.co.in

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळिवण्यात येत आहे की, मौजे-पळसदरी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील खालिलप्रमाणे वर्णन केलेली शेतीजमिन मिळकत या मिळकतीसमोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे आशिल हे सदरची मिळकत कायम खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- पळसदरी, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालक/कब्जेदारांचे नाव | भुमापन.क्रं उपविभाग | भुधारण पध्दती | क्षेत्र आर.चौ.मी | आकारणी |
|---|---|---|---|---|
| १) श्री.विजयबहादुर जयकरूण सिंग<br>२) श्रीमती रिता कृष्णाबहादुर सिंग | ३८/१/क/५/अ | १ | ०-६४-५०<br>पो.ख.०-१६-००<br>०-८०-५० | ०.६० |
| ३) श्रीमती सुजाता चंद्रबहादुर सिंग | ३८/१/क/६/अ | १ | ०-६५-७०<br>पो.ख ०-१५-८०<br>०-८१-५० | ०.६१ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची वर नमुद विद्यमान मालकांनी दिली आहे. तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीस, दावा वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसाच्या आत खालिल पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हिसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : १५/१०/२०२६

**अॅड.एम.एस.पवार**
अॅडव्होकेट हायकोर्ट
शॉप नं.२४, अमन सोसायटी सेक्टर
५ई कळंबोली नवी मुंबई

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आंदोशी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) डरायस नादिर पेडर, २) आरमाईटी डरायस पेडर व ३) मॅलकम डरायस पेडर रा.मुंबई यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| आंदोशी | ३८ | वरकस १७-३०-००<br>पो.ख. ०२-०९-००<br>**१९-३९-००** | २१.९९ |

**पैकी १) डरायस नादिर पेडर, २) आरमाईटी डरायस पेडर व ३) मॅलकम डरायस पेडर यांच्या मालकीचे पश्चिमेकडील ८ हे. ६५.०० आर वरकस व १ हे. ०४.५० आर पोट खराबा मिळून एकूण ९ हे. ६९.५० आर, आकार ११.०० रुपये एवढे क्षेत्र (सदर मिळकत).**

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अग्र हक्क, प्रथम नकार देण्याचा हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग सही/-
तारीख : १७/१०/२०२६

**अॅड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे लोणघर (जुना मौजे कामार्ले), ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ठ**
**मौजे लोणघर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील**

| विद्यमान मालकाचे नाव | गट क्रमांक /हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| वसंत रामा कडवे<br>अर्चना वसंत कडवे | ३७ (जुना मौजे कामार्ले गट नं.२१७) | ०-०२-०० | ०.०५ |
| वसंत रामा कडवे | ३८/२ (जुना मौजे कामार्ले गट नं.१८८/२) | ०-२४-९०<br>पो.ख. ०-०४-१०<br>एकूण ०-२९-०० | ६.२३ |
| वसंत रामा कडवे<br>अर्चना वसंत कडवे | ४१ (जुना मौजे कामार्ले गट नं. २२१) | ०-५५-६०<br>०-३४-००<br>**०-८९-६०**<br>पो.ख. ०-०४-८०<br>पो.ख. ०-०३-००<br>**एकूण ०-९७-४०** | १४.६२ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग सही/-
तारीख : १७/१०/२०२६

**अॅड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकाना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, गजाला सज्जाद सय्यद रा. कर्जत, हनुमान मंदिराच्या बाजूला, कर्जत तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांनी खालील वर्णनाची मिळकतीचे विद्यमान मालकीन लिलाबाई रमेश पिंगळे रा.रजपे,आंबिवली बुद्रूक तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे मिळकतीचे वर्णन

**मौजे लाडीवली तालुका. कर्जत जिल्हा. रायगड**

| मालमत्ता क्रमांक | क्षेत्रफळ (हे -आर-चौ-मी) |
|---|---|
| ४४९ | १००० चौ. फुट जोते |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तद्रभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशील विकत देण्याचे ठरविले आहे तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान, बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेहि प्रकारचा कायदेशिर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळावी मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल साठेकरार/खरेदीखताचा करार पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे

दिनांक : १७/१०/२०२६

अशिला तर्फे अॅडव्होकेट
**अॅड हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा. युको बँक शेजारी कर्जत ता.कर्जत जि.रायगड
मो.८९७६३७५५७०

## पनवेल महानगरपालिका

**दरपत्रके मागविण्याबाबत**

पनवेल शहरातील एकूण १२ राष्ट्रीय पुरुषांच्या पुतळ्यांना नियमितपणे पुष्पहार घालणे व आवश्यकतेनुसार शासकीय परिपत्रकानुसार जयंतीस, पुष्पतोरण, पुष्पमाळ नमुन्याप्रमाणे पुरविणेबाबतचा दरकरार करणेकामी अंदाजपत्रक तयार करण्याकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.panvelcorporation.com या वेबसाईटवर व भांडार विभागात उपलब्ध आहे.

जा.क्र.:पमपा/भांडार/२९२६/७४७/२०२६
दिनांक : १४/०८/२०२६ सही/-

**(अभिषेक पराडकर)**
**उप आयुक्त (भांडार)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांच्या सूचनेवरुन मी, श्री. मच्छिंद्रनाथ मऱ्या घासमारे यांच्या खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या स्थावर मिळकतीबाबत हक्क व अधिकारांची चौकशी आणि पडताळणी करीत आहे.

खालील नमुद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा अथवा कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्था किंवा प्राधिकरण यांचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अभिहस्तांतरण, वाटप, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, बोजा, लीन, एकाधिकार, करार, हक्कसोड, वारसा, उत्तराधिकार, सुविधाधिकार, न्यास, कुळाने, भाडे व पोट-भाडेदारी, भोगवटा, कब्जा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे, भागिदारी, विकास अधिकार, प्रकल्प व्यवस्थापन करारनामा, विकास व्यवस्थापन करारनामा, हक्कविलेख दस्तऐवज अनामत करण्याचे ज्ञापन, किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणत्याही स्वरुपाचे कोणतेही दावे, आक्षेप, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, शेअर किंवा मागणी असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना या जाहीर सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत त्याच्या दस्ताऐवजी पुराव्यासह लेखी स्वरुपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा माझे अशिल सदर मालमत्तेमधील असे अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि /किंवा मागणी यांचा अधित्याग, परित्याग, अधित्यजन आणि/किंवा परीत्यजन करण्यात आल्याचे आणि/किंवा सोडून देण्यात आल्याचे गृहीत धरुन मालमत्तेच्या प्रस्तावित खरेदीची कार्यवाही करतील आणि सदर मालमत्तेच्या संबंधातील अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि/किंवा मागणी अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल.

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट**
**(मिळकतीचे वर्णन)**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| अबीटघर ता.मुरुड जि.रायगड | ८ | एकूण क्षेत्र २.४६.०० | १.१२ | श्री.मच्छिंद्रनाथ मऱ्या घासमारे |

अलिबाग,
दि. १७-१०-२०२६ सही/-

**अॅड. अमित विष्णू राऊळ,**
मु.सातिर्जे, पो.मापगाव, अलिबाग-रायगड
मो.नं.८४३३७९५२५५/८६९८०००२३८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुनाडे, ता. उरण, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १३१/५९ | एकूण क्षेत्र ०-२३-८० हे.आर | १.३१ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :-१७/१०/२०२६ **अॅड.रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई
जुने सचिवालय, २ रा मजला, फोर्ट, मुंबई -४०००३२

दूरध्वनी क्रमांक-२२८४४६३४, २२८४३१२१ ईमेल -mrtregistrarmum@gmail.com
क्र.सदस्य(न्यायिक/टेनन्सी/रिव्ही/रायगड/२१३/२०२६
प्रति, दिनांक १३/१०/२०२६
आत्माराम जानू भगत

विरुद्ध

शरद गोपाळ कुंटे

**विषय :- सुनावणी नोटीसीबाबत**

वरील नांव धारण करणारा, अर्जदार यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील क्र. टेनन्सी/अपील क्र. २९/२०२४ दि.२२/०६/२०२६ च्या आदेशाबाबत केलेल्या उपनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी दिनांक २०/०१/२०२७ रोजी सकाळी ११-०० वाजता, सदस्य (न्यायिक) महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई न्यायाधिकरणापुढे खालील पत्त्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश देईल.

सही/-
**प्रबंधक**
**महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई**

**सुनावणीचे ठिकाण**
२/-महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२

नि-७१/ड

**पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

स्पे.मु.नं.५३६/२०१८
ने.ता. १८/११/२०२६

श्रीमती. रत्नकला रामचंद्र गोरी ...वादी
वि....
श्री. बळवंत रामकृष्ण जगे वगैरे प्रतिवादी

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या नोटीशीने असे कळविण्यात येते की, वादी श्रीमती. रत्नकला रामचंद्र गोरी रा. क्षमा अपार्टमेंट, दुसरा मजला, ब्लॉक नं. २०२, पेण, कंवडाळ तळे, मु.पो. पेण, जि. रायगड यांनी पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो., यांचे कोर्टात स्पे.मु.नं. ५३६/२०१८ असा दावा दि. ११/०२/२०१५ रोजीचे खरेदीखत बेकायदेशीर असल्याचे तसेच ते वादींवर बंधनकारक नाही असे जाहिर करून रद्द करून मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यात मौजे पनवेल, जि. रायगड येथील अंतिम भुखंड क्र. ७२बी, क्षेत्र १३०१ चौ.मी. पैकी स्वामी नित्यानंद मार्गाला लागून असलेला ६३० चौ.मी. चा भुखंड या मिळकतीबाबत सदर दावा दाखल केला आहे.

सदर दाव्यात प्र. वादी नं.५/२ गुलाब नरेंद्र साखरे, रा. शिळफाटा खोपोली, संगम हॉटेल, ता. खालापूर, जि. रायगड, प्र. वादी नं. ६ श्रीमती. मंदाकिनी वामन ठकेकर रा. यमुना सदन नं.१, विष्णु नगर, बाजीप्रभु देशपांडे मार्ग, नौपाडा, ठाणे-२, जि. ठाणे, प्र. वादी नं.७/१ श्रीहरी रामचंद्र गोरी रा.शशिकांत देव बिल्डींग, देवअळी, ता.पेण, जि.रायगड, प्र. वादी नं.७/२/२ सोनाली अमित चिपळुणकर रा. रावतळे, परांजपे स्किम, बंगला नं.३ मु. पो. चिपळुण, जि. रत्नागिरी, प्र.वादी नं.७/२/१ संजीवनी उर्फ स्मिता विनायक गोरी, रा. सचच्चीदानंद भुवन, कुंठे आळी, ता. पेण, जि. रायगड, प्र. वादी नं. ८/७ रश्मी राजेश शिंदे, रा. इजराईल आळी, पेण, जि. रायगड, प्र. वादी नं. ९ सौ. सुनिता पुरुषोत्तम पांडव रा. कुळगाव बदलापूर या प्र वादींना मे. कोर्टामार्फत अनेकदा नोटीस काढली. परंतु सदर प्र.वादी जाणुनबुजून सदर नोटीस स्वीकारीत नाहीत म्हणून दाव्यामध्ये जाहिर नोटीसने बजावणी होणेकरीता सदर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

सदर दाव्याच्या कामी प्र. वादी स्वतः अगर त्याचे वकील अगर त्याचे प्रतिनिधी अगर एजंट अगर अन्य कोणीही मे. कोर्टात ता. १८/११/२०२६ रोजी किंवा सदर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत हजर राहून आपले म्हणने मे. कोर्टात सादर करावे. तसे न केल्यास सदर दाव्याचे कामी वरील प्र.वादी यांना काहीही सांगावयाचे नाही किंवा वादीच्या लाभांत त्यांनी त्यांचे हक्क सोडलेले आहेत असे समजून मे. कोर्ट वरील प्र. वादी यांचे विरोधात एकतर्फी आदेश जाहिर करतील याची नोंद घ्यावी.


सही /- सही /-
**कनिष्ठ लिपिक** **सहाय्यक अधिक्षक**
**पनवेल, रायगड** **पनवेल, रायगड**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!** ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक. आकर्षक पगार मुलाखतीसाठी संपर्क साधा! ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८
- **अलिबागपासून जवळच असलेल्या फार्महाऊसमध्ये** वाडीत काम करणारे जोडपे हवे आहे. राहण्याची सोय आहे. संपर्क क्रमांक ९८२२९३८४४४
- **चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस डिड** झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क : ८१८०८६१२३४/८१८०८५१२३४ एजंट क्षमस्व.
- **ऑफिस कामासाठी मुलगी हवी आहे.** मो. ७४९८५५५७४०, ९३७३७५८८५०
- **अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग** ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५
- **प्लम्बिंग कामासाठी हेल्पर पाहिजेत.** वेळ ९ ते ७, पगार १०,०००/- संपर्क ९८२२००१८५३
- **कर्मचारी भरती बर्गर्स अँड बूच,** रांजणपाडा नवीन उमेदवारांचे स्वागत! हॉटेल व्यवसायात करिअर करण्याची उत्तम संधी. सुरुवातीचा पगार ₹१६,०००, ३ महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर ₹१८,०००. सर्व्हिस चार्जमधून अतिरिक्त उत्पन्न. ९ तासांची शिफ्ट. दर मंगळवारी सुट्टी. जेवण व राहण्याची सोय उपलब्ध. संपर्क/व्हॉट्सअॅप : ७५०६९५४६११
- **अलिबाग एसटी स्टँडजवळ दुकानगाळा** विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **दिशा पॅथॉलॉजी लॅब, अलिबाग,** महिला कर्मचारी पाहिजेत. रक्ताचे नमुने (Sample) पिकअप व ड्रॉप करण्यासाठी अट: स्वतःचे वाहन असणे आवश्यक. संपर्क: ८५५२८५५२८८

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**




## राशीभविष्य

- **मेष** : स्थापत्य, क्रीडा क्षेत्रात अनुकूलता राहील. परदेश प्रवासाचे बेत ठरतील. स्पर्धांमध्ये यश मिळू शकेल.
- **वृषभ** : व्यवसायात अडचणी येतील. नोकरीत सहकाऱ्यांची साथ लाभेल. स्थावर प्रश्न आहे तसे राहतील.
- **मिथुन** : कौटुंबिक स्वास्थ लाभेल. जोडीदाराच्या प्रकृतीकडे लक्ष द्या. नव्या ओळखीतून उत्तम लाभ होईल.
- **कर्क** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. उष्णतेच्या विकाराबाबत काळजी घ्या. अपत्याची चिंता भेडसावेल.
- **सिंह** : आर्थिक स्थिती उत्तम राहील. आपापल्या क्षेत्रात प्रगतीला वाव राहील. ताण-तणावातून बाहेर याल.
- **कन्या** : मनातील योजना आकाराला येतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. अनावश्यक ताण राहील.
- **तूळ** : अडचणींवर मात करू शकाल. खरेदीचे व्यवहार लाभदायक ठरतील. प्रवासात पुरेशी काळजी घ्यावी.
- **वृश्चिक** : दिवसाची सुरूवात उत्तम होईल. आत्मविश्वास वाढीस लागेल. कलाकारांना मानसन्मान लाभेल.
- **धनु** : हितशत्रूंच्या कारवायांवर मात कराल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. प्रवासाचे बेत पुढे ढकलावे.
- **मकर** : मनाविरूध्द घटना संभवतात. भावंडांशी मतभेद टाळायला हवेत. स्वमताग्रह हिताचा ठरणार नाही.
- **कुंभ** : आर्थिक बाबतीत ताण राहील. घरगुती व्यवसायात उलाढाल वाढेल. ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल.
- **मीन** : दिलासादायक घटना घडतील. अनुभवींचा सल्ला कामी येईल. स्वकर्तृत्त्वावर विश्वास ठेवायला हवा.

## १७ ऑक्टोबर — दिन विशेष

१९७० : भारतीय क्रिकेटपटू अनिल कुंबळेचा जन्म.
१९९६ : अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांना कालिदास सन्मान जाहीर.
२००३ : भारतात तृतीयपंथीयांनी 'जिती जितायी पॉलिटिक्स' हा राजकीय पक्ष सुरु केला.
२०१३ : आरुषी आणि हेमराजच्या खुनासाठी राजेश आणि नूपुर तलवार यांनी चाकूचा वापर केल्याचं सीबीआयने युक्तिवादात सांगितलं.

## टेक फन — आलं इलेक्ट्रॉनिक ब्लँकेट

दोस्तांनो, लवकरच थंडी सुरू होईल. हुडहुडी भरायला लागली की स्वेटर, ब्लँकेट बाहेर पडतील. थंडीत जाड पांघरूण किंवा ब्लँकेट घेऊन गुडुप झोपावंसं वाटतं. अंगावरचं ब्लँकेट बाजूलाही करावंसं वाटत नाही. थंडीसाठीचं ब्लँकेट लोकर किंवा जाड कापडापासून तयार केलं जातं. मात्र आता तुम्ही ई ब्लँकेट अंगावर घेऊ शकाल. श्याओमी या कंपनीने ई ब्लँकेट सादर केलं आहे. या ब्लँकेटचा वापर सहजपणे करता यावा यासाठी कंपनीने ॲपही तयार केलं आहे. आता हे ई ब्लँकेट अंगावर कसं घ्यायचं असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. पण कंपनीने ग्राहकांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली आहे.

यात स्मार्ट स्लीप मोड आहे. त्यामुळे ब्लँकेट घेतल्यावर शांत झोप लागेल. या अनोख्या ब्लँकेटमुळे शरीराचं तापमान नियंत्रणात रहातं. थंडीत तुम्हाला पुरेशी ऊब देण्याचं काम हे ब्लँकेट करतं. ब्लँकेटमध्ये व्हॉईस असिस्टंटचीही सोय आहे. व्हॉईस असिस्टंटमुळे ब्लँकेटला तोंडी सूचना देता येतील. या ई ब्लँकेटमुळे आता थंडी दूर पळून जाईल.

## आरोग्यमंत्र — धोका 'हेपिटायटिस ए'चा

विषाणूयुक्त पाणी वा अन्नाच्या सेवनामुळे उद्भवणारा एक विकार म्हणजे 'हेपिटायटिस ए'. या विकारामध्ये यकृतावर दुष्परिणाम होतो. हा संसर्गजन्य आजार आहे. म्हणूनच त्याचा प्रादूर्भाव टाळण्यासाठी काही काळजी घ्यायला हवी.

दूषित पाणी, स्वच्छतेच्या अपुऱ्या सोयी तसंच वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव यामुळे हेपिटायटिस ए चा फैलाव होतो. हेपिटायटिसचा विषाणू असणारे अन्नपदार्थ खाल्ल्याने किंवा पेयं प्यायल्यानेही याची बाधा होऊ शकते. हा विकार लहान मुलांमध्ये अधिक प्रमाणात आढळतो. वयाची दहा वर्षं पूर्ण होईपर्यंत विकसनशील देशांमधील जवळपास ९० टक्के मुलं या विकाराने बाधित होतात, असं जागतिक आरोग्य संघटनेची आकडेवारी सांगते. त्यामुळेच हा धोका टाळण्यासाठी रस्त्यावरचे उघडे पदार्थ खाऊ नका, स्वच्छतेची काळजी घ्या. जेवण्याआधी हात स्वच्छ धुवून घ्या. पावसात भिजल्यानंतर घरी येऊन स्वच्छ आंघोळ करा. भरपूर पाणी प्या. मद्यपान करू नका. 'हेपिटायटिस ए' मुळे यकृतावर विपरीत परिणाम होतो. मद्यपान केल्यामुळे तुम्हाला थकवा जाणवू शकतो तसंच यकृताचं आरोग्य अधिक बिघडू शकतं. त्यामुळे मद्यपान टाळा. थोड्या वेळाने थोडं थोडं खा. यामुळे ऊर्जा मिळेल. नियमित व्यायाम करा. व्यायामामुळे प्रतिकारशक्ती वाढेल. हेपिटायटिसची लक्षणं दिसल्यानंतर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्या.




## ब्युटी टॉक — अँटी एजिंग उत्पादनं वापरताना...

वाढत्या वयाच्या खुणा चेहऱ्यावर दिसू लागतात. चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. त्वचा निस्तेज दिसू लागते. वाढतं वय लपवण्यासाठी महिला अँटी एजिंग क्रीम्स, सीरम्सचा वापर करतात. या उत्पादनांमुळे एजिंगची प्रक्रिया मंदावते. तुमची त्वचा अधिक काळपर्यंत तरुण आणि तजेलदार दिसते. मात्र या उत्पादनांचा वापर योग्य पद्धतीने व्हायला हवा. एंटी एजिंग उत्पादनांचा वापर कसा करता येईल याविषयी...

* अँटी एंजिंग उत्पादनांचा वापर तरुण वयापासूनच करायला हवा. सुरुवातीपासून त्वचेची काळजी घेतल्याने ती बराच काळपर्यंत तरुण आणि तजेलदार दिसते. अर्थात प्रत्येक वयात त्वचेच्या गरजा बदलतात. त्यामुळे त्यानुसार उत्पादनांची निवड करा. म्हणजे विसाव्या वर्षी त्वचा तजेलदार असते. त्यामुळे या दिवसात त्वचेचा ओलावा टिकवून ठेवणारी आणि सूर्याच्या अतिनील किरणांपासून त्वचेचं रक्षण करणारी उत्पादनं वापरायला हवीत. चाळीशीत त्वचेवर सुरकुत्या पडतात. त्यामुळे या काळात अँटी ऑक्सिडंटयुक्त मॉईश्चरायझर वापरणं गरजेचं असतं. (क्रमश:)

## पंचांग

**शनिवार, १७ ऑक्टोबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अश्विन शु. ७, चंद्रराशी : धनु,
नक्षत्र : मूळ, योग : अतिगंड,
सूर्योदय ६.३५, सूर्यास्त ६.१३

## फॉरवर्डस

**क़ोई क़सूर नहीं इसमें हमारें मिज़ाज क़ा...**

**सामनें वालें क़ा सलूक़ हमारा लहज़ा बदल देता हैं...!**

## भटकंती

मोल्लेमचं निसर्गसौंदर्य आपल्या नजरेत भरतं. दोन दिवसांच्या छोट्या ट्रिपसाठी हे स्थान अगदी योग्य आहे. इथे खूप धमाल करता येतो. वीकेंडला कुठे जायचं हा प्रश्न पडला असेल तर मोल्लेमची निवड करता येईल. या ठिकाणी कोकण रेल्वेने जाता येईल. मडगाव रेल्वे स्थानकावरून मोल्लेम ५० किलोमीटर अंतरावर आहे. स्वत:च्या वाहनानेही या ठिकाणी जाता येईल. या प्रवासादरम्यान सुंदर निसर्ग अनुभवता येईल. तरुणाई नेहमीच हटके ठिकाणांच्या शोधात असते. अशा कलंदरांसाठी मोल्लेम हे ठिकाण योग्य ठरेल.

## करिअरवाटा — तणावग्रस्तता नको

तणावग्रस्त अवस्था असेल तर मुलाखत अयशस्वी होण्याची शक्यता असते. हे लक्षात घेता मुलाखतीची तयारी करताना कोणताही ताण निर्माण होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. प्रत्येक क्षेत्रासाठी मुलाखतीचं तंत्र वेगळं असतं. म्हणून त्या त्या क्षेत्रात मुलाखतीसाठी कोणत्या तंत्राचा वापर केला जातो याचा अभ्यास करून मुलाखतीला सामोरं जाणं योग्य ठरतं. साधारणपणे मुलाखतीत उमेदवाराच्या बौध्दिक, मानसिक क्षमता तसंच आचार-विचारांबाबत जाणून घेतलं जातं. परंतु अलीकडे शारीरिक क्षमता आणि नेतृत्त्वगुणही पाहिले जातात. त्यामुळे वेगवेगळ्या अंगांनी मुलाखतीची तयारी करायला हवी. मुलाखतीच्या वेळी संबंधित पदासाठी आवश्यक व्यावसायिक अर्हता माहीत असणं गरजेचं आहे. त्या व्यवसायाबाबत आधुनिक आणि नव्या तंत्रज्ञानाची जाण असणंही आवश्यक ठरतं. मुलाखतीमध्ये प्रश्नोत्तरं तसंच संभाषणाचा समावेश असतो. त्यामुळे त्या त्या भाषेवर उमेदवाराचं प्रभुत्व असायला हवं. बोलणं स्पष्ट आणि मुद्देसूद असायला हवं. उत्तम संभाषणकला मुलाखत घेणाऱ्यांवर छाप पाडते. मुलाखतीत सगळ्यात महत्त्वाचा ठरतो तो तुमचा आत्मविश्वास. तो चालण्यातून, उभं राहण्याच्या, बसण्याच्या पध्दतीतूनही व्यक्त व्हावा.



## खेचाखेची — ट्रेनर

एका फोटोग्राफरला जंगलात लागलेल्या आगीचा फोटो काढायचा होता. त्याने संपादकांना विमानाची व्यवस्था करायला सांगितली. त्यानुसार तो एका लहान विमानात जाऊन बसला. पायलटने विमान आगीच्या दिशेने वळवले. **फोटोग्राफर:** विमान जरा खाली घे. **पायलट:** का? **फोटोग्राफर:** मला या आगीचे जवळून फोटो काढायचे आहेत. **पायलट:** अरे बापरे! मला वाटले, तुम्ही नवीन ट्रेनर आहात आणि मला विमान कसे उतरवायचे, ते शिकवणार आहात.

## वेगळं काही

मँचेस्टरमध्ये एक हेअर बँक सुरू करण्यात आली आहे. सध्या केस गळण्याचं प्रमाण वाढत चालल्यामुळे बऱ्याच लोकांना टक्कल पडतं. टक्कल पडल्यानंतर अनेक जण केशरोपण करून घेतात. या हेअर बँकेत आपण आपले केस फ्रीज करून ठेऊ शकतो. टक्कल पडू लागल्यावर हेच केस केशरोपणासाठी वापरता येऊ शकतात. केस फ्रीज करण्यासाठी भारतीय चलनात दोन लाख ३० हजार रुपये खर्च येईल. पुरुषांमध्ये टक्कल पडण्याच्या समस्येत वाढ होत चालली आहे. या ब्लड बँकेमुळे टक्कल पडू लागल्यानंतर पुरुष मंडळी अगदी सहज केशरोपण करून घेऊ शकतील. ब्रिटनमध्ये जवळपास ६५ लाख पुरुषांना टक्कल पडलं आहे.

## रुचिरा — रुचकर गुलगुले

सणासुदीच्या या दिवसांमध्ये घरात विविध प्रकारची मिष्टान्नं तयार केली जातात. मात्र नेहमी एकसारखे पदार्थ बनवण्यापेक्षा परप्रातांतली पक्वान्नं करुन पहायला हरकत नाही. जसं की उत्तर भारतात सणासुदीला किंवा विशेष प्रसंगी केला जाणारा गुलगुले हा पदार्थ सगळ्यांना आवडू शकेल. करुन तर पहा.

साहित्य : अडीच वाटी गव्हाचं पीठ. सव्वा वाटी गूळ, एक चमचा बडिशेप, तीन मोठे चमचे तूप, सुक्या खोबऱ्याचा किस, वेलची पूड, अर्धा टी स्पून बेकिंग सोडा, थोडंसं मीठ, तेल इत्यादी.



कृती: सर्वप्रथम पाणी गरम करून त्यात गूळ घाला आणि पाक करून घ्या. आता एका भांड्यात गव्हाचं पीठ, तूप, मीठ आणि बेकिंग सोडा एकत्र करा. या मिश्रणात गुळाचा किंवा साखरेचा पाक घालून एकजीव करून घ्या. यात वेलची पूड, खोबऱ्याचे तुकडे किंवा किस आणि बडिशेप घाला. आता कढईत तेल टाकून ते तापल्यावर मिश्रणाचे मध्यम आकाराचे गोळे त्यात सोडा. ब्राउन रंगावर तळून घ्या. गरम गरम खायला द्या. सजावटीसाठी वरुन कुटलेला सुका मेवा घालता येईल. संध्याकाळचं खाणं म्हणूनही तुम्ही गुलगुले बनवू शकता.

## सुडोकू १६२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ८ | | | | ९ | | |
| | | ६ | | ५ | | | ४ | |
| २ | ५ | ४ | | ९ | | | | |
| ८ | | ७ | ६ | ३ | ५ | | ९ | |
| | २ | | ७ | | ४ | | ६ | |
| | ४ | | २ | १ | ९ | ३ | | ७ |
| | | | | ७ | | २ | ५ | ४ |
| | ६ | | | २ | | ८ | | |
| | | २ | | | | ६ | १ | ९ |


**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १६१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ७ | ९ | २ | ५ | ४ | १ | ८ |
| २ | १ | ५ | ८ | ६ | ४ | ७ | ९ | ३ |
| ८ | ४ | ९ | १ | ७ | ३ | २ | ५ | ६ |
| ३ | ६ | ४ | २ | ९ | ७ | १ | ८ | ५ |
| ५ | ७ | ८ | ६ | ४ | १ | ३ | २ | ९ |
| ९ | २ | १ | ५ | ३ | ८ | ६ | ७ | ४ |
| १ | ८ | २ | ३ | ५ | ६ | ९ | ४ | ७ |
| ४ | ५ | ६ | ७ | १ | ९ | ८ | ३ | २ |
| ७ | ९ | ३ | ४ | ८ | २ | ५ | ६ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १६२



**आडवे शब्द :-**

१) जमिनीपासून मिळणारे सरकारचे उत्पन्न
६) संदेश
८) जिंकणारा
१०) संगीतातील एक राग
११) धक्का
१२) प्रजा
१३) मृत्यू
१५) नूतन
१७) धैर्य, हिंमत
१८) ठराविक पैसे
१९) दृढता, सोशिकपणा
२१) रसाळ
२३) पोते शिवण्याची सुई
२५) राबता, जाणेयेणे
२७) पराजय
२८) संगीतातील एक राग
२९) ओढा पण मनाचा
३०) बारदान
३१) मुसलमानांचा उपवासाचा महिना
३२) शपथ
३३) ढग
३६) कुराणातील वचने
३८) चामखीळ
४०) प्रसिद्धी, गप्पांचे आगर
४४) एक तारवाद्य
४६) कर्ज
४७) ताठा, गुर्मी, जोर
४८) ओझी वाहणारा
४९) सुसर
५०) कमीतकमी व जास्तीतजास्त
५३) आश्रय
५६) मोहरी
५७) पाणी वाहण्याची कातडी पिशवी
५८) बडबड
६०) बोटाच्या टोकावरील आवरण
६२) मणका
६३) दूध वा दुधाचे पदार्थ
६४) मडके
६५) पुरुष

**उभे शब्द :-**

१) जलाशय, समुद्र
२) नेत्र
३) माझे
४) हत्या, खून
५) बारीक सारीक
६) आधार नसलेला
७) घराचा मागचा दरवाजा
८) वापर
९) आग्रा येथील ऐतिहासिक वास्तू
१४) पावसाचे साठवून ठेवलेले पाणी
१६) पराक्रमी
२२) दरवाजा
२४) महाराष्ट्राची देवता
२६) घोड्याची गाडी,
२८) मारणारा
२९) पाऊल
३०) गाईचे घर
३४) चंद्र,
३५) स्नानगृह
३७) हावरटपणा
३९) किरकोळ सामान
४०) कडक
४१) पत्र
४२) मवाळ धोरण
४३) आकाश
४५) खरकट्याचा ढीग
४८) नक्की, खात्रीने
५१) फक्त, केवळ
५२) संगीतातील एक घराणे
५४) हावरट,
५५) अवधान, लक्ष
५७) अनुमती
५९) जंगलात राहणारे प्राणी
६१) अफूचे बीज
६२) किंचित कडू चव
६३) मधुर
६४) गावातील जुनी वस्ती
६७) मोजणी करणारा
६८) मीठाची चव
७०) पोपट
७३) दुनिया
७५) मलई

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | शि | ब | वा | न | | वा | क | डा | ति | क | डा | | कृ | पा |
| र | वा | ना | | ग | ज | रा | | | र | ट्टा | | पा | | च |
| | जी | व | न | | र | | ग | वं | डी | | डा | क | घ | र |
| को | म | ट | | पा | क | ळी | | द | | पा | को | ळी | | ठो |
| स | हा | | न | वा | ब | | म | न | क | व | डा | | बे | क |
| | रा | स | भ | | र | वा | ळ | | ण | | क | लं | ड | णे |
| गा | ज | र | | च | क | म | क | | व | सा | | ग | र | |
| य | | दा | द | र | | ना | ट | की | | प | क | डा | | क |
| क | स | र | | क | ण | व | | र | मा | | व | | पा | वा |
| | र | | मा | | | ता | स | | का | प | ड | चो | प | ड |
| आ | ते | भा | ऊ | | वी | र | मा | ता | | र | सा | | भि | |
| | शे | | ली | ला | | | धा | ड | स | | | अ | रु | ण |
| स | व | ड | | ज | न | म | न | | ला | ग | व | ड | | |
| पा | टी | | प | रा | ज | य | | अ | म | र | | कि | सा | न |
| ट | | दा | द | | र | त | न | | त | | ब | त्ता | | ट |

# कलासक्त

## बिप्सचा दमदार कमबॅक

का ही कलाकार पडद्यावरून अचानक दूर जातात, पण त्यांच्या पुनरागमनाची प्रतीक्षा चाहत्यांच्या मनात कायम असते. ग्लॅमरस व्यक्तिमत्त्व, दमदार अभिनय आणि वेगळी छाप यांमुळे ओळखली जाणारी 'बिप्स' अर्थात बिपाशा बसू आता पुन्हा अभिनयाच्या मैदानात उतरण्यास सज्ज झाली आहे. तब्बल सहा वर्षांच्या विरामानंतर ती नव्या भूमिकेत दिसणार असून, यावेळी तिची साथ लाभणार आहे दिग्दर्शक हंसल मेहता यांच्या आगामी वेब सीरिजची! या सीरिजच्या चित्रीकरणालाही सुरुवात झाली आहे. सनी कौशल आणि विशाल जेठवा यांच्यासोबत बिपाशा दिसणार असल्याने तिच्या चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. मात्र, तिची भूमिका नेमकी काय असेल, याबाबत अद्याप गुप्तता कायम आहे.

'ऑलमाइटी मोशन पिक्चर्स'च्या बॅनरखाली प्रभलीन संधू या सीरिजची निर्मिती करत आहेत. कश्यप कपूर आणि राघव राज कक्कड यांनी तिचे लेखन केले आहे. प्राइम व्हिडीओने चित्रीकरण सुरू झाल्याची घोषणा केली आहे. कथानक एका छोट्या, अनामिक शहराभोवती फिरते. हे शहर अमली पदार्थांच्या व्यापाराचे मोठे केंद्र बनण्याच्या उंबरठ्यावर आहे. अशा वातावरणात सनी कौशल एका प्रामाणिक पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारणार आहे. प्रभावशाली शक्तींशी संघर्ष करताना आपली प्रामाणिकता आणि माणुसकी टिकवून ठेवण्याचे आव्हान त्याच्यासमोर असेल. या गुंतागुंतीच्या कथेत बिपाशा आणि विशाल जेठवा यांच्या व्यक्तिरेखा कोणते वळण आणतील, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे सीरिजच्या कथानकाबद्दलचे कुतूहल आणखी वाढले आहे.



बिपाशा गेल्या काही वर्षांपासून अभिनयापासून दूर होती. एप्रिल २०१६ मध्ये तिने करणसिंह ग्रोव्हरशी विवाह केला, तर नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांच्या घरी कन्या देवीचा जन्म झाला. २०२० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'डेंजरस' या गुन्हेगारी थरारक सीरिजमध्ये ती करणसोबत दिसली होती. त्याआधी 'अलोन' या २०१५ मधील भयपटात तिने जुळ्या बहिणींची दुहेरी भूमिका साकारली होती. आता हंसल मेहता यांच्या सीरिजमधून ती पुन्हा प्रेक्षकांसमोर येणार आहे. गूढ कथानक, सनी कौशलची पोलिस अधिकाऱ्याची भूमिका आणि 'बिप्स'चे पुनरागमन या तिन्ही गोष्टींमुळे या प्रकल्पाकडे लक्ष लागले आहे. तिच्या नव्या भूमिकेचा पडदा उघडण्यासाठी मात्र प्रेक्षकांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## 'धकधक' वाढवणारा कातील लूक



का ही कलाकारांची लोकप्रियता त्यांच्या अभिनयापुरती मर्यादित राहत नाही. त्यांचे हास्य, नृत्य, चेहऱ्यावरचे हावभाव आणि खास अंदाजही चाहत्यांच्या मनात घर करून राहतात. माधुरी दीक्षित ही अशीच एक अभिनेत्री! तिच्या नृत्याने कधीकाळी रुपेरी पडद्यावर 'धकधक' वाढवली आणि आजही तिच्या प्रत्येक नव्या लूकची चर्चा होते. आता हीच 'धकधक गर्ल' छोट्या पडद्यावर मराठी प्रेक्षकांना भेटायला सज्ज झाली आहे. 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर तिच्या आगमनाची उत्सुकता असतानाच हिरव्या साडीतील तिच्या देखण्या रूपाने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. तिच्या या अंदाजामुळे कार्यक्रमाच्या नव्या पर्वात मनोरंजनासोबत फॅशनचीही रंगत पाहायला मिळणार आहे.

'कोण होणार करोडपती' या लोकप्रिय कार्यक्रमाचे नवे पर्व १२ ऑक्टोबरपासून सोनी मराठी वाहिनीवर सुरू झाले आहे. या पर्वाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी माधुरी दीक्षित सांभाळणार आहे. अभिनय आणि नृत्याच्या जोरावर अनेक वर्षे प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणाऱ्या माधुरीसाठी ही भूमिका मराठी प्रेक्षकांशी संवाद साधण्याची नवी संधी आहे. या कार्यक्रमात स्पर्धकांना आपल्या ज्ञानाच्या बळावर स्वप्ने पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे प्रश्नोत्तरांच्या रंगतदार खेळासोबत माधुरीची खास शैली आणि तिचा सहज संवादही प्रेक्षकांसाठी आकर्षण ठरणार आहे.

या कार्यक्रमासाठी माधुरीने हिरव्या रंगाची सुंदर साडी निवडली आहे. आकर्षक डिझाइनचा ब्लाऊज आणि साडीला साजेसे दागिने यांमुळे तिच्या पारंपरिक लूकला उठाव मिळाला आहे. तिच्या वेशभूषेत दिसणारा डौल आणि चेहऱ्यावरचे मोहक हास्य यांमुळे तिच्या सौंदर्याची चर्चा रंगली आहे. 'धकधक गर्ल'चा हा अंदाज चाहत्यांना भावला असून, तिच्या रूपाने पुन्हा एकदा लक्ष वेधून घेतले आहे. आता 'मराठी करोडपती'च्या मंचावर माधुरी आपल्या खास अदांनी आणि संवादशैलीने किती रंगत आणते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. तिच्या कातील लूकसोबतच कार्यक्रमातील तिची उपस्थितीही प्रेक्षकांची 'धकधक' वाढवणार का, याची उत्सुकता आहे.

## दसऱ्याला मनोरंजनाचे सीमोल्लंघन

द सरा म्हणजे सीमोल्लंघनाचा सण! नव्या गोष्टींची सुरुवात करण्याचा आणि आनंदाची देवाण-घेवाण करण्याचा हा दिवस. यंदा चित्रपटप्रेमींसाठीही दसरा खास ठरण्याची शक्यता आहे. रणबीर कपूरच्या बहुचर्चित 'रामायण'च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर झाली आहे, तर दुसऱ्या ट्रेलरच्या संभाव्य प्रदर्शनाबाबतही चर्चा रंगली आहे. त्यामुळे यंदाच्या सणासुदीच्या वातावरणात चित्रपटांची उत्सुकताही भर घालत आहे. पडद्यावर रामायणाचा भव्य पट पाहण्याची चाहत्यांची प्रतीक्षा आता अधिकच उत्कंठावर्धक झाली आहे.

'रामायण : पार्ट १' हा चित्रपट ५ नोव्हेंबर २०२६ रोजी भारतासह जगभरात प्रदर्शित होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने निर्मात्यांनी नव्या पोस्टरसह ही घोषणा केली. रणबीर कपूर श्रीराम, साई पल्लवी सीता, रवि दुबे लक्ष्मण आणि यश रावणाच्या भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाच्या आगाऊ तिकीटविक्रीला २० ऑक्टोबरपासून, म्हणजेच दसऱ्याच्या दिवशी सुरुवात होणार आहे. चित्रपटाचा दुसरा भाग दिवाळी २०२७ मध्ये प्रदर्शित करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे यंदाच्या दसऱ्याला चाहत्यांना चित्रपटाच्या तिकिटांसाठी उत्साहाने सीमोल्लंघन करण्याची संधी मिळणार आहे! दरम्यान, 'रामायण'च्या दुसऱ्या ट्रेलरच्या इंग्रजी आवृत्तीबाबतही उत्सुकता वाढली आहे. ती १५ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडेसात वाजता प्रदर्शित होण्याची शक्यता सोशल मीडियावरील एका दाव्यात व्यक्त करण्यात आली आहे. काही चाहत्यांना मात्र दसऱ्याच्या दिवशी ट्रेलर प्रदर्शित होईल, असे वाटते. निर्मात्यांकडून अधिकृत घोषणा झालेली नसल्याने या चर्चांमधील सस्पेन्स कायम आहे. दुसरीकडे, अजय देवगणने 'चौहान' चित्रपटाच्या चित्रीकरणाला कारगिलमध्ये सुरुवात केली आहे. २३ वर्षांनंतर तो लडाखमध्ये चित्रीकरणासाठी परतला असून हा चित्रपट १ ऑक्टोबर २०२७ रोजी प्रदर्शित होणार आहे.



## घारगे पुन्हा मैदानात

ए खाद्या खुनाचा तपास रंगमंचावर सुरू झाला, तर रहस्याचा उलगडा होईपर्यंत प्रेक्षकांची नजर हटणार तरी कशी? संशय, अनपेक्षित वळणे आणि प्रत्येक क्षणी बदलणारे अंदाज यांची मेजवानी देणारे 'अ परफेक्ट मर्डर' हे नाटक पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. यावेळी या चर्चेला आणखी एक खास कारण आहे. प्रेक्षकांच्या परिचयाचे अभिनेते सतीश राजवाडे पुन्हा इन्स्पेक्टर घारगेच्या भूमिकेत रंगभूमीवर परतत आहेत. त्यामुळे रहस्याच्या थरारासोबतच त्यांच्या अभिनयाची झलक अनुभवण्याची संधीही रसिकांना मिळणार आहे.

सर अल्फ्रेड हिचकॉक यांच्या क्लासिक कथानकावर आधारित आणि नीरज शिरवईकर यांनी लिहिलेल्या या नाटकाचे दिग्दर्शन विजय केंकरे यांनी केले आहे. नाटकाचे आतापर्यंत ३५० हून अधिक प्रयोग झाले असून, त्यापैकी जवळपास १२० प्रयोगांमध्ये सतीश राजवाडे यांनी इन्स्पेक्टर घारगेची भूमिका साकारली आहे. तब्बल १९ वर्षांनंतर मराठी रंगभूमीवर परतताना याच नाटकाने त्यांना साथ दिली होती. या भूमिकेसाठी त्या वर्षी त्यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचे सर्व पुरस्कार मिळाले होते. त्यामुळे घारगे हे पात्र त्यांच्या मनाशी कायमचे जोडले गेले आहे, असे त्यांनी सांगितले.



## 'राम-सीता' पुन्हा एकत्र

'रा मायण' मालिकेत प्रभू श्रीराम आणि सीतेच्या भूमिकेतून घराघरांत पोहोचलेली जोडी तब्बल ३९ वर्षांनंतर पुन्हा एकत्र येणार आहे. अभिनेता अरुण गोविल आणि अभिनेत्री दीपिका चिखलिया यांना आजही अनेक प्रेक्षक 'राम' आणि 'सीता' याच रूपात ओळखतात. मात्र, यावेळी त्यांची जोडी पौराणिक कथेत नव्हे, तर एका सामाजिक विषयावर आधारित चित्रपटामध्ये पाहायला मिळणार आहे. 'नोटिस' असे या चित्रपटाचे नाव असून, त्यामध्ये अरुण गोविल आणि दीपिका चिखलिया पती-पत्नीची भूमिका साकारणार आहेत. विशेष म्हणजे, या चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी प्रेक्षकांना चित्रपटगृहामध्ये जाण्याची गरज नाही. 'रामायण'च्या या लोकप्रिय जोडीचा नवा चित्रपट थेट ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. 'नोटिस'मध्ये अरुण गोविल एका सामान्य माणसाची भूमिका साकारत आहेत. विकासकामामुळे त्याचे अनेक वर्षांपासूनचे दुकान गमावले जाते. त्यानंतर हे दुकान वाचवण्यासाठी आणि न्याय मिळवण्यासाठी तो भ्रष्ट व्यवस्थेविरोधात लढा उभारतो. या संघर्षमध्ये दीपिका चिखलिया त्याच्या पत्नीच्या भूमिकेत दिसणार असून, प्रत्येक कठीण प्रसंगात ती पतीच्या पाठीशी ठामपणे उभी राहते. त्यामुळे चित्रपटामध्ये केवळ अन्यायाविरोधातील लढाच नाही, तर संकटाच्या काळात एकमेकांना साथ देणाऱ्या पती-पत्नीच्या नात्याचीही कहाणी पाहायला मिळणार आहे. निर्माता आणि अभिनेता आदित्य प्रताप सिंह रघुवंशी यांच्या या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि कथानक याबाबत अधिक तपशील दिलेला नसला, तरी अरुण आणि दीपिका यांची पुन्हा एकत्र दिसणारी जोडी चाहत्यांसाठी खास आकर्षण ठरणार आहे.

'नोटिस' हा चित्रपट ६ नोव्हेंबरला 'वेव्हज' या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. त्यानंतर तो दूरचित्रवाणीवरही दाखवला जाणार आहे. विशेष म्हणजे, रणबीर कपूरची प्रमुख भूमिका असलेल्या 'रामायण'च्या पहिल्या भागाच्या प्रदर्शनाच्या आधीच अरुण गोविल आणि दीपिका चिखलिया यांची ही नवी जोडी प्रेक्षकांसमोर येणार आहे. या नव्या 'रामायण'मध्ये अरुण गोविल राजा दशरथ यांची भूमिका साकारणार आहेत. त्यामुळे एकीकडे जुन्या 'रामायण'मधील राम-सीतेची आठवण ताजी होणार, तर दुसरीकडे अरुण गोविल यांचा दशरथाच्या रूपातील नवा अवतारही पाहायला मिळणार आहे. पडद्यावर राम-सीता म्हणून मनात घर केलेल्या या जोडीला एका वेगळ्या नात्यात पाहण्याची चाहत्यांची उत्सुकता आता वाढली आहे.



## सनी पाजीचा 'घायल' लूक

ए खादे रहस्य उलगडण्यासाठी भूतकाळात डोकावावे लागले, तर सत्याचा शोध आणखी गुंतागुंतीचा होतो! जुन्या घटनांचे धागेदोरे वर्तमानाशी जोडले गेले, की प्रत्येक वळणावर नवे प्रश्न उभे राहतात. अशाच एका रहस्यमय प्रवासाची झलक सनी देओलच्या आगामी चित्रपटातून समोर आली आहे. चेहऱ्यावर वाढलेली दाढी, डोळ्यांत दडलेला संताप आणि न बोलताही बरंचकाही सांगणारी नजर! सनी देओलचा हा अंदाज पाहिला, की त्याच्या जुन्या 'घायल' चित्रपटाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. पडद्यावर अन्यायाविरुद्ध पेटून उठणारा आणि आपल्या दमदार संवादांनी प्रेक्षकांना टाळ्या वाजवायला लावणारा सनी पुन्हा एकदा त्याच्या 'घायल' या चित्रपटाचे पहिले मोशन पोस्टर प्रदर्शित झाले आहे. पोस्टरमध्ये सनीचा गंभीर आणि भारदस्त अंदाज पाहायला मिळत असून, त्यातील गंभीर आणि रांगडा लूक चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहे. 'गदर २'मधून बॉक्स ऑफिसवर जोरदार पुनरागमन केलेल्या सनीचा हा नवा अवतार पाहून त्याच्या चाहत्यांमध्ये चित्रपटाविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.

सनीने स्वतः सोशल मीडियावर या चित्रपटाचे मोशन पोस्टर शेअर केले. पांढरा टी-शर्ट, वाढलेली दाढी, खाली झुकलेली नजर आणि चेहऱ्यावरचे तीव्र भाव, अशा रूपात तो दिसतो. हातात सिगारेट असलेला त्याचा हा लूक त्याच्या नेहमीच्या पडद्यावरील प्रतिमेपेक्षा वेगळा आहे. चित्रपटाचे नाव 'सूर्या : अंत से आरंभ तक' असे असून, ही कथा गुन्हेगारी आणि रहस्याच्या पार्श्वभूमीवर घडते. सनीची व्यक्तिरेखा भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांच्या गुंत्यात अडकलेली आहे. सत्याचा शोध घेताना त्याला कोणत्या संघर्षांना सामोरे जावे लागते, हे चित्रपटातून उलगडणार आहे. मात्र, कथानकाचे अधिक तपशील अद्याप समोर आलेले नाहीत. एम. पद्मकुमार या चित्रपटाचे दिग्दर्शन करत असून, कमल मुकुट हे चित्रपट सादर करत आहेत. सनीसोबत प्रज्ञा जैस्वाल आणि रवी किशन हे कलाकारही दिसणार आहेत. पोस्टरमधील सनीचा गंभीर चेहरा आणि रांगडा अंदाज पाहून चाहत्यांनी त्याचे कौतुक केले आहे. त्याच्या या रूपात अनेकांना जुन्या ॲक्शनपटांची झलक दिसत आहे.




## थलैवाची प्रदर्शनापूर्वीच जादू

ए खाद्या चित्रपटाची जादू किती मोठी आहे, हे त्याच्या प्रदर्शनानंतरच्या गर्दीवरून समजते; पण काही कलाकारांच्या बाबतीत चित्रपटगृहांचे दरवाजे उघडण्याआधीच चाहत्यांचा उत्साह दिसू लागतो. पडद्यावरची त्यांची एंट्री, खास शैली आणि संवादांची लकब यांची प्रेक्षकांना आधीपासूनच ओढ असते. दक्षिणेचे सुपरस्टार रजनीकांत यांच्याबाबतीतही असेच चित्र पाहायला मिळत आहे. त्यांच्या 'जेलर २' या चित्रपटाच्या प्रदर्शनाआधीच आगाऊ तिकीटविक्रीने जोरदार सुरुवात केली आहे. त्यामुळे चित्रपटगृहांमध्ये दाखल होण्यापूर्वीच या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर लक्ष वेधून घेतले आहे.

रजनीकांत यांचा 'जेलर २' हा २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जेलर'चा पुढील भाग आहे. पहिल्या चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता १५ ऑक्टोबरला प्रदर्शित होणाऱ्या दुसऱ्या भागाकडूनही चाहत्यांना मोठ्या अपेक्षा आहेत. उपलब्ध आकडेवारीनुसार, चित्रपटाने आगाऊ तिकीटविक्रीतून ब्लॉक केलेल्या आसनांसह सुमारे ३९.४२ कोटींची कमाई केली आहे. ब्लॉक केलेली आसने वगळल्यास हा आकडा ३४.३३ कोटी रुपये आहे. पहिल्या दिवसासाठीच्या आगाऊ तिकीटविक्रीतूनच सुमारे २२.४२ कोटी रुपयांची केल्याचे वृत्त आहे. या आकड्यांमुळे चित्रपटाच्या पहिल्या दिवसाच्या कमाईबाबत उत्सुकता वाढली आहे. पहिल्या दीर्घ सप्ताहअखेरपर्यंत चित्रपट १०० कोटी रुपयांचा टप्पा पार करेल, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

या चित्रपटात रजनीकांत यांच्यासोबत राम्या कृष्णन, योगी बाबू, मिर्ना, एस. जे. सूर्या, मिथुन चक्रवर्ती आणि विद्या बालन यांसारखे कलाकार दिसणार आहेत. याशिवाय मोहनलाल, शिवराजकुमार, जॅकी श्रॉफ आणि विजय सेतुपती यांच्यासह हृतिक रोशनच्या पाहुण्या भूमिकेचीही चर्चा आहे. पहिल्या 'जेलर'ने भारतात ३४८.५५ कोटी रुपये, तर जगभरात ६०४.५० कोटी रुपयांची कमाई केली होती.

त्यामुळे दुसऱ्या भागाकडून निर्मात्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. मात्र, आगाऊ तिकीटविक्रीचे आकडे प्रत्यक्ष कमाईत किती उतरतात, हे प्रदर्शनानंतरच स्पष्ट होईल. रजनीकांत यांची पडद्यावरची जादू यंदाही बॉक्स ऑफिसवर तितकाच प्रभाव दाखवणार का, याकडे आता चाहत्यांचे लक्ष लागले आहे.





# बालांगण

## जलप्रलयातील रक्षक

नेपाळच्या हिमालयीन भागात आलेल्या भीषण पुराचा लोंढा भारताच्या दिशेने सरकत असताना बिहारसमोर मोठे संकट उभे राहिले होते. त्रिशुली आणि नारायणी नदीतून आलेली प्रचंड जलराशी पुढे गंडक नदीत उतरली आणि बिहारच्या मैदानी भागाला पुराचा धोका निर्माण झाला. अशा वेळी वाल्मीकीनगर येथे उभा असलेला ५७ वर्षे जुना गंडक बंधारा महत्त्वाचा ठरला. अभियंत्यांनी बंधाऱ्याची सर्व ३६ दारे उघडून जवळपास १.५ लाख क्युसेक पाणी नियंत्रित पद्धतीने सोडले. हिमालयातून वेगाने आलेल्या पाण्याला अचानक मोकळा मार्ग देण्याऐवजी त्याचा प्रवाह नियोजनबद्ध पद्धतीने हाताळण्यात आला. त्यामुळे प्रचंड पाण्याचा झोत एकाच वेळी बिहारच्या मैदानी भागावर आदळण्याचा धोका काही प्रमाणात कमी करण्यास मदत झाली.


संकटाच्या वेळी अनुभवी खेळाडू मैदानात उतरून डाव सावरतो, तशीच या जुन्या बंधाऱ्याची भूमिका ठरली.

या जलनियोजनामुळे पूरस्थिती पूर्णपणे टळली नसली, तरी पाण्याचा अनियंत्रित लोंढा हाताळण्यात बंधाऱ्याची भूमिका महत्त्वाची ठरली. १९५९ मधील भारत–नेपाळ गंडक कराराच्या पार्श्वभूमीवर गंडक नदीच्या पाण्याचे नियमन आणि सिंचनासाठी या नदीप्रणालीचा विकास करण्यात आला. गेल्या साडेपाच दशकांहून अधिक काळात या बंधाऱ्याने अनेकदा पाण्याचा प्रवाह नियंत्रित केला आहे. हिमालयीन पुराच्या

**जाणून घ्या**

या प्रसंगामुळे त्याचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले. अनियंत्रित जलप्रवाह आला असता तर बिहारच्या आणखी मोठ्या भूभागात पूर शिरण्याबरोबरच शेतीचे नुकसान आणि मोठ्या प्रमाणात गाळ साचण्याचा धोका वाढला असता.

गंडक बंधाऱ्याची ही घटना जुन्या पायाभूत सुविधांचे महत्त्व अधोरेखित करते. आज आपत्ती व्यवस्थापनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि यंत्रणांचा वापर होत असला, तरी अनेक दशकांपूर्वी उभारलेल्या मजबूत रचनांची भूमिकाही संकटाच्या वेळी महत्त्वाची ठरते. वाल्मीकनगरच्या दिशेने धावणारे पाणी, उघडलेली ३६ दारे आणि त्यातून नियंत्रित पद्धतीने सोडले जाणारे जवळपास १.५ लाख क्युसेक पाणी, यामागे अभियंत्यांचे नियोजन आणि परिस्थितीनुसार घेतलेले निर्णय होते. नेपाळमधील पुराचा परिणाम बिहारपर्यंत पोहोचला; मात्र त्या प्रवाहाला सामोरे जाण्यासाठी दशकांपूर्वी उभारलेला हा जलरक्षक सज्ज होता. नैसर्गिक आपत्ती रोखता येत नसली, तरी सक्षम पायाभूत व्यवस्था आणि योग्य नियोजनामुळे तिची तीव्रता कमी करता येते, हे या घटनेने दाखवून दिले.



## जिम ऑन व्हील्स

बंगळुरूमधील ऋत्विक राधाकृष्णन आणि भूमिका जयन्ना या तरुण प्रशिक्षकांनी व्यायामाची संकल्पनाच घराजवळ आणली आहे. जानेवारी २०२६ मध्ये त्यांनी 'अनलीश ४५' ही फिरती व्यायामशाळा सुरू केली. जुन्या मारुती ईकोमधील सीट्स काढून त्यात डंबेल, केटलबेल, स्लॅम बॉल, मेडिसिन बॉल, बॅटल रोप आणि रेसिस्टन्स बँड अशी साधने ठेवण्यात आली. ही गाडी थेट निवासी संकुलांच्या सामाईक जागेत पोहोचते आणि तिथेच प्रशिक्षणाचे सत्र सुरू होते. या कल्पनेमागे एक साधी अडचण होती. विविध संकुलांमध्ये बाहेरून येणाऱ्या प्रशिक्षकांना तेथील व्यायामाचे साहित्य वापरण्यावरून रहिवाशांमध्ये वाद होत असत. त्यामुळे स्वत:चीच साधने घेऊन सदस्यांपर्यंत जाण्याचा मार्ग या दोघांनी निवडला. गाडी खरेदी, तिचे रूपांतर आणि व्यायामाचे साहित्य यासाठी सुमारे ४ ते ५ लाख रुपये खर्च आला असून हा खर्च त्यांनी स्वतः केला.







या फिरत्या व्यायामशाळेचा विशेष पैलू म्हणजे तिचे वयस्कर सदस्य. ७० वर्षीय उषा शेखर यांना स्वयंपाकघरात प्रेशर कुकर उचलतानाही हातात अचानक अशक्तपणा जाणवू लागला होता. त्यानंतर त्यांनी प्रथमच वजन उचलण्याचे प्रशिक्षण सुरू केले. सुरुवातीला २.५ किलो वजनाने सुरुवात करणाऱ्या उषा आता ७.५ किलोपर्यंत वजन उचलतात आणि पुश–अप्सही करतात. त्यांच्या संकुलातील आणखी एक सदस्य निरुपा हिने महामारीनंतर धावणे बंद केले होते. मात्र या प्रशिक्षणात सहभागी झाल्यानंतर ७ महिन्यांत एकही वर्ग चुकविला नसल्याचे ती सांगते. सुरुवातीला ४ किलोची केटलबेल हाताळणारी निरुपा ३ महिन्यांत २० किलोची केटलबेल झुलवू लागली. प्रशिक्षक मात्र प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतेनुसार व्यायाम बदलतात. गुडघ्यांचा त्रास असलेल्या उषांसाठीही त्याच पद्धतीने व्यायामात बदल करण्यात आला.

**वेगळे काही**

सुरुवातीला केवळ ५ सदस्यांपासून सुरू झालेल्या या उपक्रमात आता ८० ते १०० सक्रिय सदस्य आहेत. गटप्रशिक्षण आणि वैयक्तिक प्रशिक्षणासाठी ८ ते ९ प्रशिक्षक कार्यरत असून, प्रत्येक प्रशिक्षकाला स्वतंत्र सत्र घेण्यापूर्वी संस्थेच्या अंतर्गत प्रशिक्षणातून जावे लागते. ऋत्विक आणि भूमिका यांच्या मते, व्यायामाची भीती कमी करून तो सर्वांना सहज करता येईल असा बनवणे हे त्यांच्या कामाचे मुख्य उद्दिष्ट आहे. पारंपरिक व्यायामशाळेत जावे लागण्याऐवजी साहित्य आणि प्रशिक्षकच दाराशी येत असल्याने नियमित व्यायामाची सुरुवात करणे अनेकांसाठी सोपे झाले आहे. आता दुसरे, अधिक मोठे वाहन घेण्याचा, तसेच केरळ आणि कोलकाता येथे विस्तार करण्याचा त्यांचा विचार आहे. दरम्यान, उषा यांची नजर आपल्या नातवंडांकडेही आहे. या फिरत्या व्यायामशाळेच्या पुढील पिढीतील सदस्याला त्या आताच शोधत आहेत.



## कुतूहलजनक गोरिला

गोरिला हा माणसांशी साधर्म्य साधणारा प्राणी आहे. माणूस आणि गोरिला यांच्या जनुकांमध्ये फक्त तीन टक्के फरक आहे. गोरिला हसू शकतात. त्यांना दु:ख होतं. तसंच ते इतर भावभावनाही व्यक्त करू शकतात. प्रत्येक गोरिलाच्या बोटांचे ठसेही वेगवेगळे असतात. गंमत म्हणजे प्राणीसंग्रहालयातलेच नाही तर जंगलात राहणारे गोरिलाही सांकेतिक आणि बोली भाषा आत्मसात करतात. गोरिला जवळपास दोन हजार शब्द शिकू शकतात. म्हणूनच त्यांची गणना जगातल्या बुद्धिवान प्राण्यांमध्ये केली जाते. गोरिलाच्या हातांची लांबी पायांच्या लांबीपेक्षा जास्त असते. म्हणूनच गोरिला चार पायांवर चालणं पसंत करतात. हा प्राणी माणसांप्रमाणे दोन पायांवरही चालू शकतो. पण हात आणि पाय या दोहोंचा वापर करून चालल्यामुळे त्यांना शरीराचं संतुलन साधता येतं. शिवाय झाडावर किंवा उंचवट्यावर चढणं सोपं जातं. गोरिला समूहात राहतात. एका समूहात साधारणपणे दहा गोरिला असतात. गोरिलांच्या समूहाला 'ट्रूप्स' म्हटलं जातं. माणसाच्या गर्भातल्या बाळची पूर्ण वाढ व्हायला नऊ महिने लागतात तर गोरिलाची मादी ८.५ महिन्यांनी बाळाला जन्म देते. प्रौढ गोरिला दिवसाला साधारणपणे ४० पाउंड अन्न खातो. गोरिला आणि माणसांच्या जनुकांमध्ये साम्य असल्यामुळे माणसांना होणारे बरेचसे विकार गोरिलानाही जडू शकतात. म्हणूनच गोरिला सफारीमध्ये गोरिला आसपास असतील तर तोंडावर हात ठेऊन खोकण्याचा किंवा शिंकण्याचा सल्ला दिला जातो. गोरिलाची मादी पिल्लू तीन वर्षांचं होईपर्यंत काळजी घेते.

**रंजक ज्ञान**

## 'जेन–झी'ची भन्नाट भाषा

सोशल मीडियावर सतत फिरणाऱ्या नव्या शब्दांमुळे 'जेन–झी' म्हणजेच १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेल्या पिढीची भाषा अनेकदा मोठ्या पिढ्यांना कोड्यासारखी वाटते. मात्र, हे शब्द केवळ गंमत म्हणून तयार झालेले नाहीत. इंटरनेट, समाजमाध्यमे, मीम्स, संगीत आणि तरुणांच्या परस्पर संवादातून त्यांचा वेगाने प्रसार झाला आहे. 'रिझ' म्हणजे एखाद्याला आकर्षित करण्याची शैली किंवा मोहकपणा, 'स्ले' म्हणजे एखादी गोष्ट उत्तम प्रकारे करणे, तर 'गोएटेड' म्हणजे अत्यंत उत्कृष्ट किंवा सर्वश्रेष्ठ मानले जाणे. 'नो कॅप' म्हणजे खरे बोलणे, तर 'कॅप' म्हणजे खोटे किंवा अतिशयोक्तीचे विधान. एखादी गोष्ट संशयास्पद वाटली तर 'सस' म्हटले जाते. अशा शब्दांमधून कमी शब्दांत भावना, प्रतिक्रिया किंवा मत व्यक्त करण्याची पद्धत दिसते.




**अजब–गजब**

या भाषेत गंमत, अतिशयोक्ती आणि स्वत:वरही विनोद करण्याची वृत्ती दिसते. 'डेलुलु' हा शब्द अवास्तव अपेक्षा किंवा कल्पनांमध्ये रमण्याबद्दल विनोदी पद्धतीने वापरला जातो. 'बेट' म्हणजे होकार किंवा खात्री दर्शवणारी प्रतिक्रिया, तर 'मूड' एखादी परिस्थिती स्वत:च्या भावनेशी जुळते असे सांगण्यासाठी वापरले जाते. 'घोस्टिंग' म्हणजे कोणतेही स्पष्टीकरण न देता संदेश किंवा संपर्क अचानक थांबवणे. 'फ्लेक्स' म्हणजे स्वत:ची कामगिरी, वस्तू किंवा शैली दाखवून मिरवणे. 'ग्लो अप' म्हणजे व्यक्तिमत्त्व, रूप किंवा जीवनशैलीत झालेला लक्षणीय सकारात्मक बदल. 'फोमो' म्हणजे काहीतरी गमावल्याची किंवा आपण मागे पडल्याची भीती. मात्र हे शब्द सर्वत्र एकाच अर्थाने वापरले जातील असे नाही. देश, संस्कृती, मित्रांचा समूह आणि समाजमाध्यमांनुसार त्यांचा अर्थ किंवा वापर बदलू शकतो.

जेन–झीच्या बोलीतील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तिचा वेग. आज लोकप्रिय झालेला शब्द काही महिन्यांतच जुना वाटू शकतो आणि नवा शब्द त्याची जागा घेऊ शकतो. त्यामुळे या शब्दांना कायमस्वरूपी भाषिक नियम मानण्यापेक्षा डिजिटल संस्कृतीतील बदलते संकेत म्हणून पाहणे अधिक योग्य ठरते. काही शब्द अमेरिकन कृष्णवर्णीय समुदायांच्या भाषिक परंपरांमधून व्यापक इंटरनेट संस्कृतीत पोहोचले आहेत, त्यामुळे त्यांचा वापर करताना त्यांच्या सांस्कृतिक संदर्भाची जाणीव ठेवणे महत्त्वाचे आहे. जेन–झीची ही शब्दसंपदा अखेरीस औपचारिक भाषेत किती टिकेल, हे सांगणे कठीण असले, तरी एक गोष्ट स्पष्ट आहे– भाषा जिवंत असेल, तर ती बदलत राहणारच. आजचा विचित्र वाटणारा शब्द उद्याच्या दैनंदिन संभाषणाचा भाग होऊ शकतो.

## करीअर वेगळ्या वाटांवरचं

**कोण होणार?**

मोठं झाल्यावर कोण होणार? असं विचारल्यावर तुमच्यातले बरेचजण डॉक्टर, इंजिनिअर, बँक अधिकारी, सीए, एमबीए असं काही तरी सांगतात. पण मुलांनो, आज करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. तुम्हाला या नेहमीच्या वाटेवर न चालता वेगळं काही करायचं आहे का? मग या पर्यायांचा नक्की विचार करा.

▶ तुम्हाला राजकारणात रस असेल तर पॉलिटिकल कॅम्पेन मॅनेजर म्हणून काम करता येईल. हे काम वाटतं तितकं सोपं नाही. यासाठी तुम्हाला बरंच डोकं चालवावं लागतं. एखाद्या पक्षाची राजकीय मोहीम यशस्वी करून दाखवण्यासाठी निरनिराळ्या कल्पना लढवाव्या लागतात. अनेकदा तणावाची परिस्थिती हाताळावी लागते. या क्षेत्रात काम करण्यासाठी तुम च्याकडे संवादकौशल्य असायला हवं. तसंच पॉलिटिकल सायन्स या विषयाचा अभ्यास करता येईल.

▶ इमोशनल इंटेलिजन्स डिझायनर म्हणूनही काम करता येईल. कॉम्प्युटर सायन्स किंवा सायकॉलॉजी या विषयाचं ज्ञान घेऊन तुम्हाला पुढे जाता येईल. सायकॉलॉजी हा विषय घेऊन पदवी घेता येईल. तसंच या विषयात उच्च शिक्षणही घेता येईल.

▶ सध्याच्या काळात प्रत्येकालाच स्मार्ट घरं हवी असतात. म्हणूनच गृहसजावटीला प्रचंड महत्त्व आलं आहे. तुमच्यात कल्पकता, कलात्मकता असेल, घराच्या सजावटीच्या विविध कल्पना असतील तर क्रिएटिव्ह होम डेकोर क्षेत्राकडे वळता येईल. या क्षेत्रात काम करण्यासाठी विशिष्ट पदवीची गरज नसते. अंगभूत कौशल्यांच्या बळावर तुम्ही या क्षेत्रात पुढे जाऊ शकता.

## नवाबांचं शहर लखनऊ

**सफर शहरांची**

लखनऊ ही उत्तर प्रदेशची राजधानी. या शहराला खूप मोठा इतिहास आहे. लखनऊ नवाबांचं शहर म्हणूनही ओळखलं जातं. इथले लोक पाहुण्यांचं खूप छान स्वागत करतात. चला तर, मग लखनऊची सफर करू या. लखनऊ हे सीसीटीव्हींचं भारतातलं पहिलं शहर आहे. या शहरात अनेक सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. संपूर्ण शहरात जवळपास चार हजार सीसीटीव्ही आहेत. लखनऊ शहर १८५७ च्या उठावाच्या प्रमुख केंद्रांपैकी एक. ब्रिटिशांविरुद्धचा हा उठाव लखनऊपासून कानपूरपर्यंत आणि नंतर पुढे बंगालपर्यंत पसरला. लखनऊमध्ये खाण्यापिण्याची चंगळ असते. माखन मलई, शाही तुकडा, मलई की गिल्लोरी, गुलाबी चाय आणि लखनवी पान हे पदार्थ खूपच प्रसिद्ध आहेत. त्यामुळे खवय्यांसाठी लखनऊला जाणं ही खूप मोठी पर्वणी ठरते. या शहरात अनेक ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळं आहेत. शाही बावली ही राजेशाही विहिर इथे आहे. गुजरात आणि राजस्थानमध्ये अशा असंख्य विहिरी पहायला मिळतात. शाही बावली हे लखनऊचं खास आकर्षण आहे. इथल्या विविध इमारतींवरची स्थापत्य कला बघण्यासारखी आहे.



## वीणा

**वाद्यांची ओळख**


भारतीय संगीतपरंपरेत वीणा या वाद्याला खूप सन्मान दिला जातो. देवी सरस्वतीच्या हातात वीणा असते. त्यामुळेतिलासांस्कृतिक आणि धार्मिक महत्व आहे. वीणा हे अत्यंत प्राचीन वाद्य आहे. वीणेचे विविध प्रकार आहेत. सारंगी वीणा, रवि वीणा, तात वीणा आणि रास वीणा. प्रत्येक प्रकाराची लांबी, स्वर आणि वाजवण्याची पद्धत वेगळी असते. वीणा वाजवण्यासाठी तारांना बोटांनी किंवा सुईसार'या साधनांनी स्पर्श केला जातो.मंदिरांमध्ये आणि संगीत मैफलीत वीणेचा वापर केला जातो. अनेक महान संगीतज्ञांनी वीणेसह संगीताच्या उत्कृष्टरचना सादर केल्या आहेत.

वीणेचे सारस्वती वीणा आणि रुद्र वीणा असे दोन महत्वाचे प्रकार आहेत. देवी सरस्वती यांच्या हातातील वाद्य म्हणून यालासारस्वती वीणाम्हणतात.ही वीणा मोठी आणि लाकडी असते. एका टोकाला मोठा भोपळ्यासारखा भागअसतो.त्याला तुंबा म्हणतात.या वीणेला ४ मु'य आणि ३झंकारासाठी अशा ७धातूच्या तारा असतात.वीणा बसून मांडीवर ठेवून वाजवली जाते. रागांची अभिव्यक्ती गोड, मृदू आणि लयबद्ध असते.डॉ. जयंती कुमारेश, राजेश वैद्य, डी. बालकृष्ण हे सारस्वती वीणावादक आहेत. भगवान शंकरांनीरुद्र वीणानिम र्ण केल्याची आ'यायिका आहे. लांबबांबू किंवा लाकडी दांड्यालादोन मोठे भोपळे म्हणजेच तुम्बेजोडलेले असतात. साधारण२४ पट्ट्या आणि७ ताराअसतात.आकाराने मोठी व जड असते.ही वीणा गळ्यात अडकवून किंवा पायावर ठेवून वाजवली जाते. बहाऊद्दीन डागर, झियामोईनुद्दीन डागर, असद अली खान हे प्रसिद्ध रुद्रवीणा वादक आहेत.



## आल्प्स पर्वतरांगा

आल्प्स ही युरोपातील सर्वात मोठी पर्वतरांग आहे. ही सुमारे १२०० किलोमीटर लांब पसरलेली आहे. फ्रान्स, स्वित्झर्लंड, इटली, जर्मनी, ऑस्ट्रिया, स्लोव्हेनिया आणि लिक्टेंस्टाईन या देशांमध्ये आल्प्स पर्वतरांगा पसरलेल्या आहेत. नैसर्गिक सुंदरता, उंच शिखरे, हिरवीगार मैदाने, धबधबे, हिमनद आणि तलाव यामुळे ही पर्वतरांग अत्यंत सुंदर आहे. उंचीच्या दृष्टीने आल्प्स पर्वतरांग विविध स्तरांमध्ये विभागली जाते. सपाट आणि झुडुपांनी भरलेली पठारे, मध्यम उंचीची पर्वतरांग, आणि बर्फाने झाकलेलीउच्च शिखरे.



आल्प्स पर्वतरांगांमध्ये विविध प्राणी आणि वनस्पती आढळतात. आइबेक्स, मार्मोट्स, आणि अनेक प्रकारचे दुर्मिळ पक्षी आणि प्राणीया भागात आढळतात. आल्प्समध्ये पर्वतीय फुलझाडे, झुडुपे, आणि अल्पाइनची जंगले आढळतात. लोक ट्रेकिंग, हायकिंग, स्कीइंग, आणि पर्वतारोहण आणि पर्यंटन यासाठी आल्प्स पर्वतरांगाना भेट देतात.

आल्प्स पर्वतरांगआर्थिक दृष्ट्या देखील महत्त्वाची आहे. येथे शेतकऱ्यांसाठी पठारावर शेती केली जाते. विशेषत: दुग्धजन्य प्राणी, गवत आणि काही फळांचे उत्पादन केले जाते. पर्यटनामुळे आल्प्स प्रदेशांमध्ये रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. याशिवाय, आल्प्सच्या नदी आणि तलावांपासून जलऊर्जेचा स्त्रोत देखील मिळतो. या पर्वतामुळे हवामान शीत, समशीतोष्ण आणि बर्फाळ भागांमध्ये विभागलेले आहे.त्याचा युरोपातील नद्या, जंगले आणि शेतीवर परिणाम होतो.नैसर्गिक सौंदर्य, विविध प्रकारच्या जीवसृष्टी आणि पर्वतीय जीवनशैली यामुळे जगभरातील लोकांनाया पर्वतरांगेचे आकर्षण वाटते. विशेष म्हणजे या पर्वतरांगेचा युरोपाच्या इतिहास, कला, पर्यटन, आणि आर्थिक जीवनावर मोठा प्रभाव आहे.

**दोस्त हे मस्त**

### भीतीदायक कोमोडो ड्रॅगन



कोमोडो ड्रॅगन नावाचा एक प्राणी आहे. इंडोनेशियातल्या कोमोडो, रिंका, फ्लोर्स आणि गिल मोतांग या बेटांवर तो आढळतो. कोमोडो ड्रॅगन हा पालीच्या प्रजातीचा प्राणी आहे. या प्राण्याची लांबी जवळपास १० मीटर असते. त्याचं वजन १३६ किलोपर्यंत असू शकतं. कोमोडो ड्रॅगन ही जगातली सर्वात वजनदार पालीची प्रजाती आहे. हा प्राणी खूप भयानक दिसतो. तो वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी खातो. एका वेळी तो भरपूर खाऊ शकतो. कोमोडो ड्रॅगन भीतीदायक असले तरी प्रत्यक्षात खूप खेळकर असतात.

**खादाडी**

### मस्त मसाला इडली



संध्याकाळची किंवा सकाळी केलेली इडली उरली असेल तर त्यापासून मस्तपैकी मसाला इडली बनवता येईल. इडलीचे छोटे तुकडे करा. थोडा कांदा चिरून घ्या. हिरवी मिरची, लसूण, आलं, तिखट, मीठ असं साहित्य घ्या. आता एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर थोडी मोहरी(राई) घाला. राई तडतडली की त्यात कांदा घालून परता. आलं आणि लसूण कुटून घ्या. ते घाला. हिरवी मिरची, तिखट, मीठ घाला. मग इडलीचे तुकडे घालून नीट मिक्स करा. वरून कोथिंबिर घाला. तुमची मसाला इडली तयार आहे!

**स्टडी टिप्स**

### आता सरावावर भर द्या...



परीक्षा जवळ येऊ लागली की खूप ताण येतो. पण या दिवसात नवं काही तरी शिकण्याच्या फंदात पडू नका. आधी केलेल्या अभ्यासाची उजळणी करा. म हत्त्वाच्या धड्यांवर भर द्या. नव्या विषयांचा अभ्यास करताना जास्त ताण येऊ शकतो. अखेरच्या टप्प्यात सरावावर भर द्या.

**योगा टाईम**

### चेहरा ठेवा मस्त!



काहीजणांचा चेहरा खूप फुगीर किंवा जाड दिसतो. त्यांना दोन हनुवट्या असल्यासारखं वाटतं. गळ्यालगतही फॅट्स असतात. यामुळे आपलं व्यक्तिमत्त्व चांगलं दिसत नाही. काही योगासनं करून चेहऱ्यावरचे फॅट्स कमी करता येतील. 'सिंहाच्या चेहऱ्यासारखा' व्यायाम केल्यामुळे तुमचा चेहरा बारीक दिसू शकतो. यासाठी मोठा 'आ' करा. जीभ बाहेर काढा. श्वास बाहेर सोडत रहा. डोळे मोठे करा. दोन ते तीन मिनिटं याच स्थितीत थांबा. मग मांडी घालून बसा आणि दीर्घ श्वास घ्या. हा व्यायाम नियमितपणे करा.

# क्रीडा मंत्रालयाचे त्रुटींवर बोट

## एशियाडमधील पदक संख्या घटली; स्पर्धांसाठी नियोजन करण्याचे निर्देश

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या गेल्या आवृत्तीच्या तुलनेत यंदा भारताची पदकसंख्या घटली. याबाबत गुरुवारी झालेल्या आढावा बैठकीत क्रीडा मंत्रालयाने नाराजी व्यक्त करतानाच ॲथलेटिक्स आणि बॅडमिंटनमधील घसरण, तसेच स्पर्धापूर्व तयारीतील त्रुटींवर प्रश्न उपस्थित केले. काही प्रमुख खेळाडू जायबंदी असतानाही त्यांना स्पर्धेसाठी पाठवण्यात आल्याच्या मुद्द्यावरही बोट ठेवण्यात आले. आगामी लॉस एंजलिस ऑलिम्पिक आणि आशियाई स्पर्धांसाठी आतापासून नियोजन करण्याचे निर्देशही राष्ट्रीय क्रीडा महासंघांना देण्यात आल्याचे समजते.

केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा, क्रीडा सचिव हरी रंजन राव, लक्ष्य ऑलम्पिक व्यासपीठ योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एन. एस. जोहल, तसेच विविध राष्ट्रीय क्रीडा महासंघांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जपानमधील आइची-नागोया येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने २१ सुवर्णपदकांसह एकूण ८५ पदके मिळवली. मात्र, हांगझो येथे झालेल्या गेल्या स्पर्धेत भारताने १०६ पदकांची कमाई केली होती. त्या तुलनेत यंदाच्या पदकसंख्येत झालेली घट भारतीय क्रीडाक्षेत्रासाठी चिंतेचा विषय ठरली आहे. सरकारकडून निधी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असताना महासंघांनी प्रत्यक्ष कामगिरीतून परिणाम दाखवावेत, असे मांडविया यांनी स्पष्ट केले.

अडथळ्यांच्या शर्यतीतील ज्योती याराजी आणि तिहेरी उडीतील प्रवीण चित्रवेल यांच्या दुखापतींचा मुद्दा बैठकीत उपस्थित झाला. आयओएच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांनी ॲथलेटिक्स महासंघाच्या कामगिरीच्या आढाव्यादरम्यान हा प्रश्न मांडल्याचे समजते. मात्र, विशिष्ट खेळाडूंच्या प्रकरणांऐवजी एकूण कामगिरीचे विश्लेषण करण्यावर क्रीडामंत्र्यांनी भर दिला. दुखापतींचे अधिक चांगल्या पद्धतीने व्यवस्थापन आवश्यक असल्याचे मत यावेळी मांडण्यात आले. लांब पल्ल्याचा धावपटू अविनाश साबळे याच्या तंदुरुस्तीबाबतही प्रश्न उपस्थित झाले. ३००० मीटर स्टीपलचेस शर्यतीत चौथे स्थान मिळवल्यानंतर त्याने ५००० मीटर शर्यतीतून माघार घेतली.

### ॲथलेटिक्स, बॅडमिंटनमध्ये निराशा

ॲथलेटिक्समधील भारताची सुवर्णपदकांची संख्या सहावरून एकावर घसरली, तर एकूण पदके २४ मिळाली. बॅडमिंटनमध्ये भारताला केवळ पुरुषांच्या सांघिक प्रकारात कांस्यपदक मिळाले. कमी कालावधीत अनेक सामने खेळावे लागल्याने खेळाडूंवर परिणाम झाल्याचे आढावा बैठकीत सांगण्यात आले. नेमबाजीतील अपयश आणि आवश्यक सुधारणा याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली.

### आणखी दहा मीराबाई चानू घडवा

खेळाडूंची नवी पिढी घडवण्यावर भर देताना क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांनी प्रत्येक राष्ट्रीय क्रीडा महासंघाला युवा गुणवान खेळाडू शोधण्याची आणि त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन केले. मीराबाई चानू एकटी किती काळ आपल्यासाठी पदके जिंकत राहणार? आपल्याला आणखी दहा मीराबाई चानू घडवण्याची गरज आहे. प्रत्येक महासंघाने ही जबाबदारी घेतली पाहिजे, असे मांडविया यांनी स्पष्ट केले.

### ७०० कोटींपेक्षा अधिक खर्च

आशियाई स्पर्धेपूर्वी खेळाडूंच्या तयारीसाठी तीन वर्षांच्या कालावधीत ७०० कोटी रुपयांहून अधिक खर्च केल्याचे क्रीडा मंत्रालयाने सांगितले होते. सरकारकडून आवश्यक निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असताना त्याचे रूपांतर प्रत्यक्ष मैदानावरील यशात झाले पाहिजे, अशी भूमिका एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. भारताने २०२८च्या लॉस एंजलिस ऑलिम्पिकसाठी आतापासूनच नियोजन सुरू करावे, असे निर्देश बैठकीत देण्यात आले. त्याच बरोबर २०३०मध्ये दोहा येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने पहिल्या तीन देशांमध्ये स्थान मिळवण्याचे लक्ष्य ठेवावे, असे क्रीडा सचिव हरी रंजन राव यांनी सांगितले.

## निवडक

### अंध बुद्धिबळपटू मृणाली पांडेंचा सत्कार!

**पुणे :** कोकणस्थ परिवार पुणेच्या वतीने १५ ऑक्टोबर जागतिक अंध दिन निमित्त बुद्धिबळातील आंतरराष्ट्रीय अंध क्रीडापटू मृणाली पांडे हिचा खास सत्कार संस्थेचे क्रीडा समिती अध्यक्ष राजेंद्र आवारे यांच्या हस्ते पंडित नेहरू स्टेडियम पुणे येथे करण्यात आला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ क्रीडा संघटक सुनील नवरेकर होते. दिनेश पाडळे यांनी स्वागत केले. श्रीनाथ हगवणे यांनी प्रस्तावित केले तर अमोल करचे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शुभम प्रजापती यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. आंतरराष्ट्रीय अंध बुद्धिबळपटू मृणाली पांडे ही सध्या महाराष्ट्र शासनाची सेवेत असून क्लास वन ऑफिसर आहे सध्या पुणे येथे पोस्टिंग आहे आजपर्यंत.




इंडोनेशिया चायना आदी देशात तिने भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. समारंभास कला, क्रीडा, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील क्रीडाप्रेमी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रज्वल बिरे, अनिता नवगिरे, भगवान सुतार, विजय उत्तेकर, गणेश निकम आदींनी कार्यक्रमाचे विशेष परिश्रम घेतले.

### टेनिस कोर्टवर युवा खेळाडूंचा जलवा

**पुणे :** ऐम टेनिस अकादमी यांच्या तर्फे आयोजित व एआयटीए, एमएसएलटीए, पीएमडीटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एमएसएलटीए पीएमडीटीए नवसह्याद्री क्रीडा संकूल चॅम्पियनशीप सिरीज टेनिस स्पर्धेत मुलांच्या गटात रेयांश जगताप, समरवीर सिद्धू यांनी मानांकित खेळाडूंना पराभूत करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. नवसह्याद्री क्रीडा संकूल टेनिस कोर्ट येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये मुलांच्या गटात उपांत्यपूर्व फेरीत रेयांश जगताप याने सातव्या मानांकित देवांश चव्हाणचा पराभव करून आपली अनपेक्षित निकालाची मालिका कायम ठेवली. समरवीर सिद्धू याने चौथा मानांकित कबीर पंचमतियाचा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. अव्वल मानांकित पलाश रुचंदानी याने पाचव्या मानांकित कियान पेंडुरकरवर विजय मिळवला. मुलींच्या गटात अव्वल मानांकित इशिता पाटीलने सातव्या मानांकित हृदवी लिमकरला पराभूत केले.



### ओम पावशेची शिबिरासाठी निवड

**खांब :** जय बजरंग क्रीडा मंडळ, रोहा येथील अष्टपैलू कबड्डीपटू कॐम रविंद्र पावशे याची रायगड जिल्ह्यातून महाराष्ट्र कुमार गट कबड्डी संघाच्या निवड शिबिरासाठी निवड झाली आहे. या निवडीमुळे रोहा तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. बिहारमधील पटणा येथे दि. १ ते ४ नोव्हेंबर २०२६ दरम्यान होणाऱ्या ५२ व्या कुमार गट राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर हे निवड शिबीर आयोजित करण्यात आले आहे. ओमच्या या यशाबद्दल जय बजरंग क्रीडा मंडळ, रोहाचे अध्यक्ष अमर सलागरे यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. निवड शिबिरात उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्र संघात स्थान मिळवावे आणि राष्ट्रीय स्तरावर रोहा तालुक्याचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ओमच्या निवडीबद्दल जय बजरंग क्रीडा मंडळाचे पदाधिकारी, प्रशिक्षक, खेळाडू आणि क्रीडाप्रेमींकडून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.



### पूनम राऊतची क्रिकेटमधून निवृत्ती

**मुंबई :** मुंबईकर फलंदाज पूनम राऊत हिने गुरुवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. २०१७ साली झालेल्या महिला विश्वचषक स्पर्धेतील धडाकेबाज कामगिरीसाठी विशेष ओळखल्या जाणाऱ्या पूनम राऊत हिने २००९ साली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर सुमारे १२ वर्षांच्या कारकिर्दीत तिने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारात भारतीय महिला क्रिकेट संघाचं प्रतिनिधित्व केलं होतं. बऱ्याच काळापासून भारतीय संघाबाहेर असलेल्या पूनमने तिचा शेवटचा आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना २०२१ मध्ये इंग्लंडविरुद्ध खेळला होता.२०१७ साली इंग्लंडमध्ये झालेल्या महिलांच्या क्रिकेट विश्वषक स्पर्धेवेळी जबरदस्त फॉर्ममध्ये असलेल्या पूनम राऊत हिने त्या स्पर्धेत ३८१ धावा काढल्या होता. या स्पर्धेत आयर्लंडविरुद्ध झालेल्या सामन्यात तिने शतकी खेळी करताना दीप्ती शर्मासोबत विक्रमी ३२० धावांची भागीदारी केली होती. तसेच इंग्लंडविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात तिने ८६ धावांची झुंजार खेळी करत भारतीय संघाला विजया समीप पोहोचवले होते. मात्र तो सामना अवघ्या ९ धावांनी हरला होता.

### शिखर धवनचा कारवाईचा इशारा

**नवी दिल्ली :** भारताचा माजी सलामीवीर शिखर धवनने वर्ल्ड टी-२० कॉन्टिनेंट कपच्या आयोजकांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. आपली परवानगी न घेता स्पर्धेतील सहभागी खेळाडूंच्या यादीत नाव समाविष्ट करण्यात आल्याचे धवनने म्हटले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपण कोणतीही संमती दिलेली नाही किंवा आपल्या नावाच्या वापरास परवानगी दिलेली नाही, असे धवनने स्पष्ट केले. तसेच, आपल्या सहभागाबाबत आयोजकांनी केलेल्या अनधिकृत घोषणांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्याने केले आहे. वर्ल्ड टी-२० कॉन्टिनेंट कपमध्ये सहभागी खेळाडू म्हणून माझे नाव असल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. माझ्या माहितीशिवाय किंवा परवानगीशिवाय आयोजकांनी माझ्या नावाचा वापर केला आहे. या प्रकरणी योग्य ती कायदेशीर पावले माझी टीम उचलणार आहे, असा इशारा त्याने दिला.



# आयसीसी वर्ल्ड कपचा दक्षिण आफ्रिकेत थरार!

## ।। तिकीट खरेदी करण्यासाठी झुंबड ।। आयसीसीने नुकतेच जाहीर केले वेळापत्रक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पुढील वर्षी आयसीसी वर्ल्डकप होणार आहे. या स्पर्धेचे वेळापत्रक आणि पूर्ण नियोजन आयसीसीने नुकतेच एक मोठा कार्यक्रम घेत जाहीर केले आहे. दक्षिण आफ्रिका, नामीबिया, झिम्बॉबे या ठिकाणी आयसीसी वर्ल्डकप २०२७ स्पर्धा होणार आहे. चाहत्यांनी तिकीटांसाठी आतापासूनच गर्दी केल्याचे दिसून येत आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने जाहीर केले आहे की, स्पर्धेच्या तिकिटांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसांच्या आतच जगभरातून १.५ कोटींहून अधिक तिकिटांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार, आयसीसी वर्ल्डकप २०२७ साठी तब्बल १४२ वेगवेगळ्या देशांमधून क्रिकेटप्रेमींनी अर्ज केले आहेत. मोजक्याच दिवसांत मिळालेल्या या अफाट प्रतिसादाने मागील अनेक विक्रम मोडीत काढले आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या अर्जांना आणि चाहत्यांच्या मागणीला न्याय देण्यासाठी आयसीसीने अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक तिकीट सिस्टिम सुरू केल्याचे समोर येत आहे. त्यामुळे आता पूर्ण व्हेरीफीकेशन करूनच तिकीट दिले जाणार आहे.

### भारतीय संघात कोणाची वर्णी लागणार?

प्लेइंग इलेव्हनबाबत विचार करता रोहित शर्मा, विराट कोहली व शुभमन गिल यांची जागा पक्की आहे. वनडे संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यरने फलंदाजीत चौथ्या क्रमांकावरील जागा निश्चित केली आहे. वेगवान गोलंदाज अष्टपैलू नितीशकुमार रेड्डी व हार्दिक पंड्या या दोघांनी विश्वचषक पथकातील आपली जागा पक्की केली आहे. तसेच रविंद्र जडेजा विश्वचषक खेळू शकतो. वॉशिंग्टन सुंदरला बॅकअप अष्टपैलूच्या रुपात आफ्रिकेसाठी संघात जागा मिळेल.

# कुमार गटात जय भारतची आगेकूच



**। शिवनेरी । वृत्तसंस्था ।**

शिवनेरी सेवा मंडळाच्या कबड्डी महोत्सवात अमर हिंद मंडळाने महिला गटात भारतमाता महिला संघाचा पराभव करत दणदणीत विजय नोंदवला. सेजल कांबळेच्या आक्रमक चढायांनी अमर हिंदच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. कुमार गटात जय भारत सेवा मंडळ आणि यश क्रीडा मंडळाने, तर महिला गटात विश्वशांती क्रीडा मंडळाने विजय मिळवला. व्यावसायिक गटात बेस्ट, पी. डी. हिंदुजा आणि मुंबई पोस्टल संघांनीही प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

महिला गटात अमर हिंद मंडळाने भारतमाता महिला संघाचा ४५-३० असा १५ गुणांनी पराभव केला. अमर हिंदकडून सेजल कांबळेने चढाईत, तर सलोनी नाक्तीने पकडीत प्रभावी कामगिरी केली. भारतमातेकडून पायल कांचनने चढाईत, तर दृष्टी कुंभारने पकडीत चांगला खेळ केला. मात्र, अमर हिंदने सामन्यावर वर्चस्व राखत विजय साकारला.

कुमार गटात जय भारत सेवा मंडळाने आकांक्षा क्रीडा मंडळाचा ३६-२४ असा १२ गुणांनी पराभव केला. जय भारतकडून आर्यन बावडेकरने चढाईत, तर तन्मय बावकरने पकडीत चमक दाखवली. आकांक्षाकडून ओमकार पवार आणि स्वप्निल पाटील यांनी अनुक्रमे चढाई व पकडीत योगदान दिले. याच गटात यश क्रीडा मंडळाने पंचगंगा सेवा मंडळावर ३५-३१ अशी चार गुणांनी मात केली. महिला गटातील दुसऱ्या सामन्यात विश्वशांती क्रीडा मंडळाने गोल्फादेवी प्रतिष्ठानचा सात गुणांनी पराभव केला. विश्वशांतीकडून रोझी डिसोझाने चढाईत, तर शितल मेरांडेने पकडीत चांगली कामगिरी केली.

# नवरात्र उत्सवात गीतगायन स्पर्धा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

बोरखार येथील जय भवानी नवरात्रौत्सव मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कराओके गीत गायन स्पर्धेत चिरनेरचे सुप्रसिद्ध गायक अनिल कातकरी या प्रख्यात गायकाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत आपल्या गाण्याच्या सुरावटी सादर करत रसिकांचे कान तृप्त केले.

त्यांच्या गाण्याच्या सुरावटी ऐकून अरसिक प्रेक्षकदेखील थिरकू लागले. त्यांना आयोजकांच्या वतीने सात हजार रुपयांचे रोख रकमेचे पारितोषिक व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. चिरनेरचे आकाश गोंधळी यांना द्वितीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. त्यांना पाच हजार रुपयांचे रोख रक्कमेचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर स्पर्धेत गायिका प्रांजल पाटील व प्राजक्ता कडू यांना विभागून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. त्यांना तीन हजार रुपये रोख रक्कमेचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



### विनू मांकड ट्रॉफीत वीरूच्या लेकाचं वादळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विस्फोटक सलामीवीर असा लौकिक असलेल्या वीरेंद्र सेहवागचा थोरला मुलगा आर्यवीर सेहवाग आता वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत क्रिकेटचं मैदान गाजवण्यास सज्ज झाला आहे. दरम्यान, सध्या सुरू असलेल्या विनू मांकड करंडक स्पर्धेत आर्यवीर सेहवागने विस्फोटक फलंदाजीचं प्रदर्शन केलं. या सामन्यात आर्यवीरने १४३ चेंडूत १९ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने १७३ धावांची झंझावाती खेळी केली.

# पार्थिव पटेलची माघार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बीसीसीआयच्या वरिष्ठ पुरुष निवड समितीमधील पश्चिम विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी माजी यष्टीरक्षक पार्थिव पटेल यांच्या नावावर बरीच चर्चा होती, परंतु त्यांनी या पदासाठी अर्ज न केल्याचे समोर आले आहे. यामुळे प्रज्ञान ओझा यांना त्यांच्या उर्वरित कार्यकाळात समितीचे अध्यक्ष म्हणून कायम राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पार्थिव यांनी या निवड प्रक्रियेपासून लांब राहणे पसंत केले.

१४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत पार्थिवने अर्ज केलेला नव्हता. बीसीसीआयने अर्ज करण्याची मुदत वाढवली किंवा पार्थिवने आपला निर्णय बदलला, तर परिस्थितीत बदल होऊ शकतो.दक्षिण विभागाचे प्रतिनिधित्व करणारे ओझा हे विद्यमान निवडकर्त्यांमध्ये सर्वाधिक कसोटी सामने खेळल्यामुळे अध्यक्षपदाच्या शर्यतीमध्ये आघाडीवर आहेत.



# कोंडाळा महालीच्या मुलींची बाजी; जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत प्रथम

**। वाशिम । वृत्तसंस्था ।**

कोडा क्षेत्रात आपले कौशल्य, जिद्द आणि सांघिक भावनेचा प्रभावी ठस्य उमटवत श्री ज्ञानेश्वर माऊली विद्यालय व कोंडाळा महाली येथील मनोहरराव नाईक विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात १९ वर्षांखालील मुलींच्या क्रिकेट संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत उत्तलेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत संघाने प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी दिमाखात पात्रता मिळवली, त्यामुळे संपूर्ण संस्थेच्याशिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

मंगरूळपीर येथील वाय. सी. महाविद्यालयात मंगळवारी आयोजित जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत कारंजा तालुक्यातील प्रतिस्पर्धी संघाविरुद्ध खेळताना विद्यालयाच्या मुलीनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. मैदानावरील चपळता, अचूक नियोजन, जिद्द, चिकाटी आणि एकजुटीच्या बळावर खेळाडूंनी विजयश्री खेचून आणली.

या विजयामुळे मुलींच्या क्रोडागुणांना नवी दिशा मिळाली असून विभागीय स्तरावरही यशाची परंपरा कायम राखण्याचा आत्मविश्वास संघाने निर्माण केला. यशस्वी खेळाडूंची नावे पवित्रा देशमुख, कोमल आमदरे, गौरी शिंदे, खुशी महाले, रुपाली महाले, तेजस्विनी गावंडे, संस्कृती कांबळे, आर्या गाडेकर, अनुष्का कदम, दिव्या महाले, वैष्णवी राऊत, वेदिका डाखोरे, अंजली आवगण, शामल चव्हाण, श्रुती गायकवाड, मनीषा नालेगावकर यांनी यश खेचुन आणले. यशस्वीतेसाठी संघाला मार्गदर्शन करणारे व्ही. डी. सरकटे, के. एस. जाधव यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. घवघवीत यशाबद्दल संस्थेचे सचिव प्रा. व्ही एस चव्हाण, प्राचार्य कवार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व खेळाडूंचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले. या यशामुळे विद्यालयातील क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन मिळाले असून विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासातही वाढ झाली आहे. खेळाडूंनी नियमित सराव, शिस्त आणि सांघिक समन्वयाच्या जोरावर हे यश मिळवले. आता विभागीय स्तरावरील स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी संघाकडून विशेष तयारी केली जाणार आहे.



## हाँगकाँग सुपर सिक्सेस स्पर्धेचे अनोखे नियम सहा खेळाडूंचा असणार संघ

# ५ षटकांचा सामना, एका षटकात ८ चेंडू!

**। हाँगकाँग । वृत्तसंस्था ।**

हाँगकाँगमध्ये हाँगकाँग सुपर सिक्सेस ही स्पर्धा खेळवली जाते. छोटं मैदान, ११ ऐवजी ६ खेळाडू आणि चौकार- षटकारांचा पाऊस. आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा भाग नसलेले काही खेळाडू आणि निवृत्ती जाहीर केलेले काही माजी खेळाडू या स्पर्धेत सहभाग घेतात. आगामी हाँगकाँग सुपर सिक्सेस २०२६ स्पर्धेत वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार भारतीय संघाचं नेतृत्व करताना दिसून येणार आहे.

क्रिकेटमध्ये सहसा एका संघाकडून ११ खेळाडू खेळतात. पण या स्पर्धेत एका संघात यष्टीरक्षकासह ६ खेळाडूंचा समावेश असतो.या स्पर्धेत प्रत्येकी ५-५ षटकांचे सामने खेळवले जातात. प्रत्येक षटकात ६ चेंडू टाकले जातात. पण फायनलमध्ये प्रत्येक षटकात ६ ऐवजी ८ चेंडू टाकले जातात.सामना ५ षटकांचा असला तरीदेखील यष्टीरक्षक वगळता इतर पाचही खेळाडूंनी गोलंदाजी करणं अनिवार्य असतं.

एखादा फलंदाज जर ५० धावांवर पोहोचला, तर तो रिटायर्ड होतो. त्यानंतर तो पुन्हा एकदा फलंदाजीसाठी येऊ शकतो. वाईड आणि नो चेंडूचा नियमजर गोलंदाजी करणाऱ्या संघातील गोलंदाजाने वाईड किंवा नो चेंडू टाकला, तर फलंदाजी करत असलेल्या संघाला १ ऐवजी २ धावा मिळतात. या स्पर्धेतील आणखी एक आगळावेगळा नियम म्हणजे, जर सर्व फलंदाज बाद झाले आणि एकमेव फलंदाज शिल्लक राहिला असेल, तर तो रनर घेऊन एकटा फलंदाजी करू शकतो

या स्पर्धेत एकूण १२ संघ सहभाग घेतात या १२ संघांना ४ गटात विभागलं जातं. हा क्रिकेटचा झटपट फॉरमॅट आहे. एक सामना हा केवळ ४५ मिनिटात समाप्त होतो. स्पर्धेतील अधिकृत नियमानुसार सामना पूर्ण होऊ शकला नाही, तर निकाल आणि गुणतालिकेतील स्थान निश्चित करण्यासाठी एकूण रनरेटचा वापर केला जात होता.




### असे आहेत ४ गट

अ गट- ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, हाँगकाँग चीन
ब गट- श्रीलंका, बांगलादेश, स्कॉटलँड
क गट- टीम इंडिया, पाकिस्तान, यूएइ
ड गट- दक्षिण आफ्रिका, ओमान, अफगाणिस्तान

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)